१००८
स. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. २०

# रामजोशीकृत लावण्या.

हें पुस्तक

रा. रा. शंकर तुकाराम शालिग्राम यांनीं

पुणें येथें

चित्रशाळा छापखान्यांत छापिलें.

आवृत्ति तिसरी.

REFBK-0000453
REFBK-0000453

…०८ इसवी.

किंमत दहा आणे.

मराठी ग्रंथ संग्रहालय
क्रमांक २८२१९

# रामजोशीकृत लावण्या.

हें पुस्तक

रा. रा. शंकर तुकाराम शालिग्राम यांनीं

पुणें येथें

'चित्रशाळा' छापखान्यांत छापिलें.

आवृत्ति तिसरी.

सन १९०८ इसवी.

REFBK-0000453
REFBK-0000453

किंमत दहा आणे.

मुद्रक व प्रकाशक,
शंकर नरहर जोशी, म्यानेजर चित्रशाळा प्रेस,
१०२६ सदाशिव पेठ, पुणें—शहर.

# रामजोशी.

जैशी जनकें दिधली सच्चिद्घन राम जो सिता त्याला ॥
तैशी दिधली मयुरें स्वार्या ती रामजोशि तात्याला ॥ १ ॥

रामजोशी यांची योग्यता सर्व आबालवृद्धांस माहीत असून त्यांच्या चुट-क्यांची वाखाणणी चोहोंकडे होऊन चुकली आहे. म्हणून त्याविषयीं नवीन कांहींच सांगणें उरलें नाहीं. पूर्वी अशा थोर पुरुषांची हकीकत लिहून ठेवण्याची चाल नव्हती; युरोपांतील इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी आदिकरून सुधारलेल्या देशांत सुप्रसिद्ध पुरुषांची हकीकत त्यांचे मागें तर काय, परंतु ते जिवंत असतां लिहून ठेवण्याची चाल आहे; तशी आजपर्यंत इकडे कधींच चालू नाहीं, यामुळें थोर पुरुषांचे मागें त्यांचें नांव राहण्यास फारशी जागा राहिली नाहीं; या उपेक्षेमुळें यथातथ्य चरित्र, आमच्या देशांतील प्राचीन आणि अर्वाचिन कवींचें व राजकारणी पुरुषांचें आजला लोपून जाऊन त्यांचे कीर्तिध्वज मात्र फडकत आहेत.

रामजोशी सोलापूरचे राहणारे असून देशस्थ जातीचे ब्राह्मण. यांचा जन्म शके १६८४ म्हणजे सन १७६२ इसवीस होऊन ते आपल्या वयाच्या पन्नासावे वर्षी शके १७३४ म्हणजे सन १८१२ इसवींत मृत्यु पावले. यांचा शरीरवर्ण फारच काळसर होता. " दुसरे बाजीरावाचे वेळीं जोशीबावा होते." कविचरित्रांत मराठी कवीविषयीं जो वृत्तांत लिहिला आहे तो नवनीतांतून घेतला आहे म्हणून चरित्रकारांनीं प्रस्तावनेंत लिहिलें आहे. ' नवनीत ' प्रसिद्ध करणारांचें नांव सर्व रसिक जनांस विदित आहेच. त्यांनीं महाराष्ट्र भाषेंतील कवींची नुसती ओळख सामान्य जनांस करून दिली इतकेंच नाहीं; तर त्यांच्या विलक्षण उद्योगेंकरून त्या कवींचा व महाराष्ट्र भाषेंतील कवितेचाही परिचय सर्व लोकांस ' सर्वसंग्रह ' नामक पुस्तकाचे रूपानें करून दिला असो; मराठी कवींविषयीं जो थोडा वृत्तांत नवनीताचे पुढील आवृत्तीचे वेळीं जोडला आहे, तो रा० ब० भास्कर दामोदर पाळंदे यांनीं शोध करवून जोडला. तो लेख व्हावा तसा पूर्ण झाला नाहीं, असें त्यांनीं

लिहिलें आहे. हा शोध त्यांस बाहेरील लोकांनीं उदार बुद्धीनें पाठविला म्हणूनच मिळाला !

सोलापूर येथें यजुःशाखी ब्राह्मण दोघे बंधु पूर्वी राहत असत. एकाचें नांव पुतळेजोशी व दुसऱ्याचें नांव धोंडभटजोशी असें होतें. यांस सोलापूरची जोशीपणाची वृत्ति मुसलमानी राजापासून मिळाली होती. त्या वेळचे मुसलमान, यांस विनोदानें फत्तर जोशी असेंही म्हणत असत. ही वृत्ति त्यांच्या वंशजांकडे अद्यापपर्यंत चालू आहे. रामजोशी यांचें मूळ पुरुष हेच होत. यांचा वंशवृक्ष हल्लीं बराच फैलावला असल्यामुळें जोशीपणाचें साल सात आठ वर्षांनीं रामजोशी यांचे घराण्यांतील पुरुषाकडे येत असतें. रामजोशी यांचे बापाचें नांव जगन्नाथ जोशी, आईचें नांव माहीत नाहीं. जगन्नाथजोशी यांस दोन पुत्र होते. वडील मुद्गलजोशी आणि धाकटे हे रामजोशी. यांचे घराण्यांत संस्कृत भाषेची अभिरुचि सर्वांसच होती. त्यांतून मुद्गलजोशी यांची संस्कृत भाषेच्या ज्ञानाविषयीं ख्याती होती. त्यांनीं यदुवंशनामक काव्य संस्कृत भाषेंत रचिलें आहे. कालिदासाच्या रघुवंश महाकाव्याप्रमाणेंच या काव्याचे एकुणवीस सर्ग केले आहेत. हें अजून फारसें कोठें उपलब्ध झालेलें नाहीं. रामजोशी यांस मात्र संस्कृत भाषा शिकण्याची बुद्धि झाली नाहीं.

रामजोशी यांनीं आपल्या वयाचीं वीस वर्षें तमाशा पाहण्यांत व कडें वाजविण्यांत घालविलीं. हा थोर झाला तरी यास संस्कृत भाषेचा गंध नाहीं, हें पाहून मुद्गलजोशी हे रामजोशी यांजवर भारी राग करीत. यांस ते नेहेमीं कुलांगार, कुलघातक असें क्रोधानें म्हणत असत. मुद्गलजोशी यांनीं एक दिवस त्रासामुळें रामजोशी यांस घरांतून काढून दिलें; आणि अशा तोंडानें तुझें मुखावलोकन करणार नाहीं, अशी आण वाहिली. मनुष्याचे गुण प्रकट होण्यास कांहीं विशेष प्रसंग घडून यावे लागतात, तोच प्रत्यय येथेंही आला. रामजोशी प्रसंगास न जुमानता आपल्या आंगच्या धैर्यामुळें एका आंगवस्त्रानिशीं स्वारी घराबाहेर पडली. केल्या कर्माचा पश्चात्ताप झाला म्हणा कीं, काय झालें नकळे. स्वारींनीं पंढरपूरचा रस्ता धरिला. पंढरपूर येथें गेल्यावर वेदशास्त्रसंपन्न बावा पाध्ये यांचे घरीं जाऊन त्यांचे शिष्यत्व

करून राहिले. गुरुकृपा जबरदस्त व शिष्याची बुद्धिही विलक्षण-
ान वर्षांतच रामजोशी यांनीं अध्ययन करून बंधूच्या भेटीची इच्छा
धरिली. वेदशा० सं० पाध्ये यांची आज्ञा घेऊन हे सोलापुरी आले. हे
सोलापुरीं आले त्या सुमारास मुद्गल जोशी हे सोलापुरांतील एका देवालयांत
भारतग्रंथ ( पुराण ) सांगत होते; परंतु त्यांस मध्यंतरी ज्वर येऊं लागला;
यामुळें कांहीं दिवस पुराण सांगण्यांत खंड पडला होता. ही गोष्ट राम-
जोशी यांस सोलापुरीं जातांच समजली; बंधूचे भेटीसाठीं घरीं जाऊन थड-
कले नाहींत तोंच बंधु आजारी असल्याची खबर कळली. मुद्गल जोशांनीं
रामजोशांस पहातांच त्यांजवर शिव्यांची वृष्टि केली. आणि म्हणाले कीं, तूं
आमच्या कुळांत बट्टा लावण्यास उत्पन्न झाला आहेस. संस्कृत भाषेचीं
दोन अक्षरें शिकतास तर बोलण्याचा प्रसंग आला नसता; वडील बंधूचें
बोलणें रामजोशांनीं मुकाट्यानें ऐकून घेतल्यावर म्हणाले कीं, पोथी कोठें
आहे ? मला आज पुराण सांगावयाचें आहे. मुद्गलजोशी मूळचे रागीट
असून तापानें कावलेले, त्यांतून रामजोशांचें बोलणें ऐकून ( रामजोशांनीं
पंढरपुरीं राहून गीर्वाण भाषेचा व्यासंग केला; ही गोष्ट मुद्गल जोशांस
समजली नाहीं असें दिसतें. ) संतापानें पोथी आंगावर टाकून म्हणाले कीं,
डफ वाजविण्यामध्यें आणि पुराण सांगण्यामध्यें महदंतर आहे. रामजोशांनीं
बोलण्याकडे लक्ष न देतां पोथी उचलून पुराणाची वेळ झाल्यावर पोथी घेऊन
देवळांत गेले. नंतर व्यासपीठावर बसून पोथी सोडली. ग्रामस्थ मंडळी
पुराणश्रवणासाठीं जी आली होती त्यांनीं ही पंदी मूर्ति पुराण सांग-
ण्याचा आव घालून बसलेली पाहून विनोद करितीं झाली. या स्वारीनीं वीणा
लावून " या कुंदेंदु " या अक्षरांस प्रारंभ करितांच गोड लकेऱ्यांत मंडळी
थिजून गेली ! सर्व गोष्टींची सामुग्री मिळाल्यावर मग काय पाहिजे ! !
पुराणांत बहार करून दिली. मुद्गलजोशी पुराण सांगत असत त्या दिवसापेक्षां
त्रिगुणित श्रोते मंडळी त्या दिवशीं जमली ! त्या सर्वांनीं वाहवा ! शाबास ! !
असे उद्गार तोंडांतून काढले ! ! ही पुराण सांगण्याची शैली पाहून सर्वांस कौतुक
वाटून जे ते स्तुति करीत चालते झाले. हा लौकिक मुद्गलजोशी यांचे कानावर
गेला. त्यांनीं प्रकृतीस आराम झाल्यावर चोरून येऊन तो स्वारीचा थाट

पाहिला. त्यांसही या अलौकिक गुणाचा विलक्षण अचंबा वाटला. त्या दिवसापासून मुद्गलजोशी हे रामजोशांवर प्रेम करूं लागले, व मागील राग सोडून दिला. जोशीबोवा कीर्तन करण्याची कलाही पंढरपुरींच शिकून आले होते. तिचा प्रसार त्यांचे ठिकाणीं फारच झाला. हे घरचे गरीब असल्यामुळें त्यांस गोसाव्याच्या धंद्यावर उपजीविका करणें भाग पडलें. देशोदेशीं हिंडून हे कीर्तन करीत असत. गांवोगांव यांस पैसाही पुष्कळ मिळत असे; कारण हे आपल्या वाक्चातुर्यानें श्रोत्यांचीं मनें मोहित करून आपला मनःकल्पित हेतु तडीस नेत. यांचा स्वभाव मूळचा उधळा असल्यामुळें पैशास यांच्या जवळ थारा नसे. कितीही पैसा मिळाला तरी हे सदां लखलखीत! उचापत काढल्याशिवाय यांचा दिवस जात नसे. यांची स्वारी गांवोगांव कथा करण्यासाठीं फिरूं लागली म्हणजे एक चिमा-नायकीण म्हणून राख बरोबर घेत असत. ही रूपानें फारच सुंदर होती. तिला व आपल्याला बसण्यासाठीं एक रेशमी काढण्यांचा झोंपाळा स्वारींत घेत असत. बरोबरीची शिष्य मंडळी, मोठा घोडा, दोन कुत्रीं, दोन माकडें, दोन राघु, दुसरेही विलासी पदार्थ बरोबर घेत असत. यामुळें त्यांस उचापत काढावी लागे. ऋणकरी होण्यास त्यांस अवघड वाटत नसे. याविषयीं पुढें एक दोन कथा सांगितल्या आहेत हे शाक्त होते, म्हणून मद्यही पीत असत. गांजा ओढणें, तंबाखू खाणें हें त्यांचें नित्याचें कर्तव्य असे. हीं व्यसनें त्यांस पूर्ववयींच असावींत.

जोशीबावा लावणी किंवा कोणताही छंद प्रातः शौचविधीसमयीं योजीत. नंतर मुखमार्जन आटपल्यावर त्याचें टिप्पण करून ठेवावें, असा त्यांचा क्रम असे. त्यांचा शौचकूप मोडकळीस आलेला सोलापूरकर अझून दाखवीत असतात.

रामजोशांनीं विचकट लावण्या अगदीं रचल्या नाहींत शृंगारयुक्त ज्या लावण्या केल्या त्या भागवतांतील कृष्णाच्या लीलावर्णनाच्या रचल्या आहेत, व कांहीं वैराग्यपरही केल्या आहेत यांपैकीं शृंगारपर ज्या आहेत त्या पूर्ववयीं म्हणजे ऐन तारुण्याच्या बाहारींत केल्यावर उतारवयीं वैराग्यपर केल्या असें सांगतात.

रामजोशी हे पूर्ववयांत तमाशा घेऊन पुण्यास आले होते. शिमग्याच्या पांचो दिवसांत पेशव्यांच्या वाड्यांत त्यांचा तमाशा झाला. तमाशा चांगला म्हणून एक हजार रुपये त्यांस बिदागी वाड्यांतून मिळाली. बिदागी देणारानें रामजोशांस म्हटलें कीं, "तुम्ही ब्राह्मण असून तमाशा करतां; त्यापेक्षां ईश्वर गुणानुवाद करण्यांत कालक्षेप केला तर चांगलें होईल." हें ऐकून रामजोशांस अनुताप होऊन विचारांचें काहूर त्यांच्या मनांत आलें. सद्गुरु कोणास करावें याची योजना चालली. मोरोपंत कवी हे त्या वेळीं बारामतीस राहत असत. त्यांस शरण जाण्याचा विचार त्यांनीं करून पुणें सोडून बारामतीचा रस्ता तत्काळ धरला. रामजोशी बरोबरच्या तमासगिरांसह गुढीच्या पाडव्याच्या आदले दिवशीं बारामतीस जाऊन पोहोंचले. बाबूजी नायकांचे चिरंजीव पांडोबा नाईक हे कर्ते होते. त्यांनीं आपल्या वाड्यांत गुढीच्या पाडव्यास तमाशा करविण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें तमाशाची सुरवात झाली बाबूजी नायकांच्या वाड्याशेजारीं लगतच बाबूजी नायकांनीं बांधून दिलेल्या वाड्यांत मोरोपंत हे राहत असत. ते तमाशा पाहत नसत; म्हणून तमाशास न येतां ते आपल्या वाड्यांतील माडींत दशमाच्या आर्या लिहीत बसले शेजारच्या वाड्यांत मोरोपंत बसले आहेत ही गोष्ट तमाशाचे आरंभीं रामजोशांस कळलेली होती. तमाशास आरंभ झाल्यावर "भला जन्म हा तुला लाधला" ही लावणी म्हणण्यास रामजोशांनीं सुरवात केली. ती लावणी ऐकत असतां मोरोपंत मनांतल्या मनांत विस्मित होऊन चांगलें ऐकूं येण्यासाठीं, आपल्या वाड्यांतील माडींतून बापूजी नायकांच्या माडींत म्हणजे तमाशाच्या समोरच्या माडींत येऊन बसले! रामजोशांस जी गोष्ट पाहिजे होती ती झाली. नंतर "दो दिवसांची तनु हे साची" ही लावणी म्हणण्यास सुरुवात केली. ती ऐकतां ऐकतां मोरोपंत हे तमाशासमोरच्या मंडळींत खालीं येऊन बसले. मोरोपंतास समोर बसलेले पाहून रामजोशांस अत्यंत आनंद होऊन त्यांच्या जवळ जाऊन पायाशीं डफ आपटून फोडून टाकला; व मोरोपंताचे पाय धरून म्हणाले, "पायापाशीं आलों आहे अनुग्रह करावा."।

रामजोशी पुण्यास वारंवार येत असत. शेवटल्या वेळीं पुण्यास आल्यावर त्यांनीं कोणकोणाच्या भेटी घेतल्या व कोणत्या गुणी जनाचीं दर्शनें घेतलीं याच-

द्दल कटाव रचिले आहेत. याच प्रसंगीं ' आलों रावबाजीपाशीं, या कवीस घडावी काशी ' हाही पण कटाव केला.

वर जी नुकती रामजोशी यांची शेवटची खेप सांगितली त्याच खेपेस जोशीबावांचा येथें अंत झाला. ज्या खेपेस वरील प्रकार घडून आला त्या वेळीं रामजोशीबावा आपल्या कुटुंबासुद्धां येथें आले होते. ती वेळ त्यांच्या उतारवयाची असल्यानें त्यांस काशीक्षेत्रीं यात्रेस जाण्याची उत्कट इच्छा झाली होती आणि त्याच उद्देशानें स्वारी घराबाहेर पडली; पण जवळ पैसा नाहीं! व त्या समयीं आतांच्या प्रमाणें आगगाडीचा मार्ग नसल्यामुळें महायात्रेस जाणें म्हणजे दुर्घट व द्रव्याचें काम; असें सर्व जाणत असत. आतां गरीबागुरिबास देखील १८ रुपये काशीस जाण्याचे व १८ रुपये येण्याचे पडून सातवे दिवशीं यात्रा करून घरीं परत! तसें त्या वेळीं कोठून असावयाचें? रामजोशी जन्माचे खर्चीक असल्यामुळें त्यांजपाशीं द्रव्य नसे. त्यांनीं द्रव्य पुष्कळ कमाविलें यांत संशय नाहीं. शेवटीं आपला महायात्रेस जाण्याचा हेतु पुण्यास मित्रमंडळी होती तीस कळविला. त्यांनीं द्रव्यद्वारा मदत करण्यासारखी होती तितकी केली, आणि त्यास सल्ला दिली कीं, तुमचा उद्देश येथील थोर थोर लोकांस कळवून त्यांच्या घरोघर याद फिरवावी म्हणजे कांहीं पैसा मिळाला तर मिळेल. ती गोष्ट रामजोशांनीं कबूल करून बहुतेक थोर लोक जमवून एक सभा करविली; आणि त्यांच्या पुढें याद टाकिली. ही याद कशाची आहे हें श्रीनामा वाचतांच लोकांस कळून यावें यासाठीं प्रथमच त्यांनीं असें लिहून ठेविलें:—

**वर्षें तीन पुण्यांत जो मिरवला तो रामजोशी पहा।**
**यात्रोद्देश धरूनियां तनुमुळें घेतो निरोपासि हा॥**
**या मार्गें न कधीं पुढेंहि न कधीं मागावयाचा गुणी।**
**ऐसें समजुनि द्या यशासह तुम्ही ही याद ही लेखणी॥१॥**

ही याद पाहून तेथें जमलेल्या थोर थोर लोकांनीं भराभर आंकडे टाकिले. एकंदर १४ हजारांची रक्कम तात्काळ जमली. असे धर्मात्मे- गुणपरीक्षक पुरुष पुण्यनगरींत होऊन गेले याचें भूषण वाटतें. अखेरीस रामजोशी यांचे महा-यात्रेस जाणें झालें नाहीं. त्यांची प्रकृति क्षीण झाली होती. यामुळें येथेंच

शेवट झाला ! सुदैवेंकरून कुटुंब उमाबाई जवळ होतें; त्यांनीं जोशीबावांची सद्गति करून बरोबर नेण्यासाठीं आणलेले ग्रंथ व द्रव्य घेऊन त्या आपल्या बापाचे घरीं गेल्या. त्यांचे माहेर बार्शी तालुक्यांत वाशीनामक गांवीं आहे. तेथें रामजोशांचे कांहीं ग्रंथ असावेत, असा तर्क आहे. कांहीं संग्रह सोलापुरींही आहे. यांचा तूर्त मिळण्यासारखा संग्रह इतका आहे कीं, आम्हीं छापल्याखेरीज कांहीं लावण्या, दुसरे प्रसंगानुसार रचलेले फटके, कटिबंध, आर्या, श्लोक, पदें, छंदोमंजरी ( छंदावरील ग्रंथ ) तसेंच मदालसा चंपू म्हणून संस्कृत ग्रंथ आणि रामाष्टक म्हणून स्तुतिपर केलें आहे; इतका आहे.

रामजोशी यांस पुष्कळजणांकडून देणग्या मिळाल्या; त्याचें थोडें दिग्दर्शन केलेंच आहे. पेशव्यांकडून सवाशें रुपयांचें वर्षासन रेणुकादेवी प्रीत्यर्थ मिळालें तें अद्यापपर्यंत त्यांचें वंशाकडे चालूं आहे. रामजोशी यांच्या अनुपम गुणावर बहाल झाल्या कारणानें बारलोणी म्हणून गांव परांड तालुक्यांत पेशव्यांकडून इनाम मिळालें होतें. त्याचें उत्पन्न सालिना बाराशें रुपयांचें होतें, परंतु त्याची व्यवस्था या फंदीस नीट ठेवतां न आल्यमुळें गांव रावबाजीस परत घेणें प्राप्त झालें.

रामजोशीं यांच्या कुटुंबाचें नांव उमाबाई, यांस संतान झालें नाहीं मुद्गलजोशी यांस रंगनाथ नांवाचा एक पुत्र झाला होता. त्यांचे पुत्र राधाकृष्ण नांवाचे सोलापुरीं राहत होते. हे उत्कृष्ट गवई म्हणून तेथें त्यांचा चरितार्थ त्याच गुणावर चालत असे. येथपर्यंत जोशीबावांविषयीं कांहीं लिहिलें; त्यांचा मुख्य गुण कवित्वस्फूर्ति त्याविषयीं लिहिणें राहिलें आहे. पेशवाईचे भरमराटींत अनंतफंदी, होनाजीबाळ, सगन भाऊ, बाळा कारंजकर, बहिरू मल्हारी यांचा जसा उदय होऊन लौकिक झाला; त्यापेक्षां जोशीबावांचा वेगळ्या तऱ्हेचा झाला. वरील मंडळी एकापेक्षां एक अधिक अशी होती तरी रामजोशी यांची बरोबरी करण्याची योग्यता यांतून कोणाचेही ठायीं नव्हती, यांचे स्वभावाविषयीं व कवित्वगुणाविषयीं एक दोन ठिकाणीं लेख प्रसिद्ध होऊन चुकले आहेत एक रा० ब० दादोबा पांडुरंग यांनीं आपल्या ‘ यशोदा पांडुरंगी ’ नामक केकावलीवरील

टीकेच्या पुस्तकांत रामजोशांविषयीं तारीफ केली आहे; म्हणजे यांच्या गुणाची योग्यता कायम केली आहे. ती मोरोपंताच्या काव्याविषयीं विचार करितांना दिली आहे. दुसरा लेख ' निबंधमाला ' या मासिक पुस्तकांत फारच चांगला लिहिला आहे. यापुढें त्याच विख्यात मासिक पुस्तकांतील उतारा देऊन नंतर त्यांच्या प्रसिद्ध गोष्टी लिहूं.

" यांच्या विषयींच्या लोक ज्या गोष्टी सांगतात त्यावरून हे पहिल्यानें मोठे फक्कड, रंगेल व फंदी होते आणि ही वृत्ति यांच्या शृंगारपर लावण्यावरून स्पष्ट दिसते. पण पुढें मोरोपंताच्या आर्यांनीं यांची मनोवृत्ति तन्मय करून टाकून परमार्थाकडे ओढली. ती इतकी कीं, जो वाग्विलासाचा भर प्रस्तुत कवीनें असभ्य काव्यरचना रंगेल लोकांस अधिकच व्यसननिमग्न करण्याच्या अनुचित कार्याकडे योजिला होता, तोच पुढें जनांचें मन विषयपराङ्मुख करून आपल्या खऱ्या हिताकडे वळविण्यास त्यानें योजला व ज्यानें विषयासक्त होऊन स्त्रियांच्या लावण्यांचें व विलासांचें मनोवेधक वर्णन करावें-त्याचीच परमार्थाची वृत्ति इतकी दृढ व्हावी कीं, त्यानें विषयसुखाची अनर्थावहता व असारत्व हीं वाचकांच्या किंवा श्रोत्यांच्या हृदयावर ठाम उठवून द्यावी हें सकृद्दर्शनीं विरोधात्मक दिसतें आणि सामान्य प्राकृत जनाचे ठायीं वरील दोन्ही गोष्टींचा मेळ कधींही दृष्टीस पडत नाहीं हें खरें. जे एकदा विषयलंपट होऊन बसले व ज्यांची चित्तवृत्ति केवळ तदाकार बनून राहिली त्यांस वैराग्याच्या स्थितीची कल्पनाही होत नसते; पण विशाल मनाचे जे असतात त्यांचा प्रकार निराळा तो वर सांगितलेल्या कवीच्या सारखा असतो. अशीं उदाहरणें आणखीही कांहीं कवींचीं देतां येतील. भर्तृहरीचीं तीन शतकें आमच्या वाचकांपैकीं बहुधा सर्वांस ऐकून तरी माहित असतीलच त्यांतील चमत्कारही असाच आहे. जो भर्तृहरी ' शृंगारशतकां ' त स्त्रियांची एवढी वाखाणणी करितो तोच पुढें ' वैराग्यशतकांत ' त्यांस केवळ तुच्छ मानतो व त्यांचा तिरस्कार करितो. जगन्नाथ पंडितांच्या ' भामिनीविलासा ' चीही अशीच गोष्ट आहे. पहिला भाग शृंगारात्मक असतां शेवटल्यांत त्याच्याविरुद्ध विषय आहे. फार तर काय, पण ज्या विलासी पुरुषानें यवनीच्या पायांशीं आपलें सर्वस्व वाहिलें त्यानेंच आपल्या नातवास ' अश्वधाटी ' नामक

प्रसिद्ध काव्यांत विरक्तीचा उपदेश करून भक्तिमार्ग सांगितला आहे. पण नवलें काय कीं, शृंगार जसा साधला तसाच शांतरसही वरील काव्यांत उत्कृष्ट उतरला आहे. तेव्हां ह्या सर्व उदाहरणांवरून काय दिसतें कीं, कवीच्या मनांत मानवी प्रकृतींच्या सर्व वृत्तींचा समावेश होऊन साऱ्याच अतिशयित प्रबल असतात; आणि जिचा ज्या वेळेस पगडा असेल ती त्या समयीं त्यांचे कृतींत पुरतेपणीं उठते. यास दृष्टांत असा कीं, ज्याप्रमाणें स्वच्छ तेजस्वी हिऱ्या समोर जो जो रंग असेल तो तो त्यांत अगदीं पूर्णपणें प्रतिबिंबित होतो."

"असो; तर वर सांगितल्याप्रमाणें रामजोशांच्या लावण्यांत शृंगारवर्णन जसें उत्तम आहे त्याप्रमाणेंच वैराग्यही हृदयावर टळटळीत ठसण्यासारखें आहे. या कवीनें कीर्तनांत संस्कृत लावण्यांचा प्रवेश करून दिला हें सांगितलेंच आहे. या गोष्टीवरून व वरील लावण्यांत त्यानें याज्ञिकांवर, धर्मानें दंभ माजविणारांवर, जो खूप भडिमार करून दिला आहे त्यावरून कवीच्या अंगचा धीटपणा, उद्दामपणा व आवेश हे सर्व गुण व्यक्त होतात. प्रस्तुत स्वरचित कवनें तो जेव्हां कथेंत म्हणत असेल तेव्हां सामाजिकांच्या मनावर त्यांचा प्रभाव कांहीं विलक्षण होत असेल यांत संदेह नाहीं; शिवाय तो चतुर वक्ता असल्यामुळें त्याची त्या वेळच्या कीर्तनकारांत मोठीच कीर्ति असेल असें अनुमान होतें." जोशीबावांची 'कोण्याग सुभगाची मदन मंजरी। सांग सखे सुंदरी॥' इ० ही लावणी आणि कोणीकडे 'दों दिवसाची तनु हे साची सुरत रसाची करुनि मजा' इ० ही लावणी कोणीकडे !! पहिलींत पूर्ण शृंगाराची कमाल केली आहे. "मराठी भाषेच्या खऱ्या कवितेचा वरचा मासला आहे. आह्मांस खचित वाटतें कीं, जोशीबावांनीं आणखीही कवनें रचलीं नसती तर ग्रीक लोकांत पुरातनकालीं होऊन गेलेल्या स्याफो नामक कवयित्रीची जशी एकाच चुटक्यावर आजपर्यंत प्रसिद्धि चालत आलेली आहे तशीच यांची कीर्तिही एवढ्यावरच खुशाल राहीली असती. वर्णमाधुर्याची ज्याच्या कानास कांहीं लेश म्हणून ओळख असेल, शब्दांचा सुंदरपणा व खुमारी हीं ज्यास यत्किंचित् कळत असतील, तसाच त्यांचा झोंक व प्रौढपणाही ज्यास थोडासा तरी समजत असेल, स्त्रियांच्या लावण्याचा डोळ्यांवर व हृदयावर कसा व्यापार घडतो याचा ज्यास लवलेश अनुभव असेल त्यास वरील कवन केवळ शहारून

ळकील, यांत संशय नाहीं. संस्कृत कवितेंत स्त्रियांच्या. वर्णनांत ज्या उप
वगैरे असतात त्याच साऱ्या यांत आल्या आहेत; पण पदरचनेची जी
अतिशय बहार केली आहे तीमुळें त्या साऱ्या नव्यासारख्या शोभून जाताहे-
दुसरी अशी खुबी आहे-तीं या कवीच्या साऱ्या कृतींतून आढळते,-
कीं, अभियुक्त संस्कृत कवींनीं योजलेल्या प्रौढ शब्दांची व अर्थाची शुद्ध लौकि
मराठी भाषणांतील केवळ व्यावहारिक अशा शब्दांशीं व अर्थांशीं भेसळ इता
बेमालूम केलेली असते कीं, त्यांच्या त्या मिश्रणचातुर्यानें तें सर्व एक
दिसून त्यापासून एक जातीचा विशेष आनंद उत्पन्न होतो. सारांश; सरस
प्रौढ, झोंकदार आणि आवेशयुक्त असें आपल्या भाषेचें रूप ज्यास पाहि
असेल त्यास तें या कवीच्या लावण्यांत सांपडेल. शेवटीं आणखी ही ए
गोष्ट सांगितली पाहिजे कीं, वरील लावणीची चाल समजून ती जो गाई
किंवा गाइलेली ऐकेल त्यासच तिचा रस पुरतेपणीं समजेल एरवीं नुस
शब्द वाचून त्याची कल्पनाही त्यास व्हावयाची नाहीं."

दुसरींत पूर्ण विरक्ति बाणेल असा बोध छान उतरून दिला आहे. *
विशाळ कल्पना मोठमोठ्या प्राचीन कवींपासून जोशीबावांनीं उचलली आ
भर्तृहरीच्या एकंदर कृतीशीं यांची कृति सारखी मिळते. यांच्या ति
शतकांप्रमाणें यांच्या लावण्या शृंगारपर व नीतिपर आहेत. वैराग्यपराविष
तर बोलणेंच नको. त्याविषयींचा त्यांचा लौकिक तर चोहोंकडे गा
जुन्या लोकांच्या तोंडांतून व कीर्तनांतून नेहमीं या लावण्या गोड स्वरांत
येतात. वैराग्य बाणणें हा विषय फार गहन असून तो सुबोध करणेंही अवघ
असें असून यांच्या लावण्यांनीं जितका सुबोध झाला आहे तितका दुस
कडे कोठेंच झाला नाहीं. यांनीं सर्व जनांस अत्यंत प्रिय जो लावणी छं

---

* वरील सर्व उतारा ' निबंधमाला ' नामक पुस्तकांतील सहाव्या अंकांत
घेतला आहे, या कवीच्या पुष्कळ लावण्या सरळ आहेत; तरी कांहीं कां
फार चांगल्या चमत्कारिक चमत्कारिक चालीच्या आहेत त्या चालीच्या
माहितगार म्हणणाराचे तोंडांतून ऐकल्यास फारच आनंद होतो पन्हळक
हरदास म्हणून नामांकित गोसावी नऊ दहा वर्षांपूर्वीं या पुणें शहरीं भाहे
होते. त्यांचा या लावण्या म्हणण्याविषयीं फारच लौकिक असे.

त्यास तमासगिरांच्या डफांवरून काढून हरदासांच्या मृदंगावर आणून बीभत्स शृंगारास जो उद्दीपक व्हावयाचा त्यासच आपल्या वाक्प्रभावानें श्रोते जनांच्या हृदयांत वैराग्यवृत्ति बाणविण्यास लालनभूत केला. भर्तृहरीप्रमाणें यांस व्यवहारज्ञानाची फारच माहिती होती हें स्पष्ट दिसतें. त्यांचें ज्ञान अनुभविक असल्यावांचून लावण्या अशा आवेशयुक्त बनल्या गेल्या नसत्या. वाचकांस, श्रोतेजनांस त्यांच्या वैराग्यपर लावण्या ऐकून वृत्ति पालटल्याचा अनुभव येतो तेव्हां कवीस विशेष अनुभव असेल यांत संशय नाहीं. यांनीं भर्तृहरीचे ग्रंथ वाचले असून त्यांचा अनुभवही घेतला असावा असें दिसतें. गीर्वाण भाषेचें यांनीं चांगलेंच अध्ययन केलें होतें असें दिसतें. ' भागवत ' दशम स्कंधांतील कृष्णलीला संस्कृतांतील आपल्या लावण्यांतून यांनीं फारच चांगली वर्णन केली आहे. ' छेकापन्हुति ' अलंकार म्हणून एक संस्कृत भाषेंत प्रकार आहे त्याची बहार यांनीं " राधा सखी संवादे छेकापन्हुति हे आयका " या लावणींत फारच उत्कृष्ट तऱ्हेची केली आहे. म्हणून मन:पूर्वक व चालीवर वाचण्याविषयीं किंवा सवड असल्यास ऐकण्याविषयीं आमची रसिकांस फार फार शिफारस आहे. त्यांनीं कांहीं संस्कृत लावण्या केल्या आहेत त्यावरून व ' छंदोमंजरी ' म्हणून वृत्तावर एक ग्रंथ संस्कृत ग्रंथाचेच आधारानें फार उत्तम रचिला आहे त्यावरून संस्कृत भाषेचें पूर्ण ज्ञान यांचे ठिकाणीं असावें असें समजून येतें. वरील कृष्णलीलेच्या लावण्या व ' छेकापन्हुती ' अलंकाराची लावणी. तसेंच संस्कृत एक दोन लावण्या यांचा संग्रह पुढें केलेला आहेच. छंदोमंजरी ग्रंथ आमचे जवळ असून त्याचे विस्तृतपणामुळें तो येथें घेतला नाहीं. संस्कृत भाषेविषयीं हा जो प्रकार जोशीबावांचे ठिकाणीं आढळतो तो इतर लावण्या करणाऱ्या मंडळीचे ठिकाणीं मुळींच नाहीं ही गोष्ट विशेष आहे यासाठीं शास्त्री, पंडित यांनीं नाक मुरडण्याजोगा हा कवि नव्हता हें उघड आहे. याविषयीं एक गोष्टही पुढें सांगण्यांत येईल. यांच्या लावण्या साध्या चालीच्या असल्यामुळें या म्हणण्यासही जाचत नाहींत. याकरितां कोणास लावण्या वगैरे शिकण्याचा छंद असेल तर त्यांनीं ह्या लावण्यांचें अध्ययन करावें, म्हणजे त्यापासून करमणूक होऊन त्यांस पुढें परमार्थमार्गही सोपा होईल आणखी अध्ययन करणारास एक फायदा विशेष आहे तो असा कीं, भाषेचें अति उत्कृष्ट रूप त्यास

समजूं लागेल. कारण, त्यांच्या लावण्यांत संस्कृत व मराठी भाषेचें मिश्रण इतकें बेमालूम आणि सुंदर केलेलें असतें कीं, तें पाहून फारच आनंद होतो. ही कला त्यांस मोरोपंतांच्या काव्यावरून उचलितां आली. मोरोपंतांच्या काव्याचें मनन यांनीं फारच केलें होतें हें सर्वांस माहीत आहे. मोरोपंतांचें अर्थें प्रसिद्धीस यांनींच आणिलें म्हणून वर लिहिलें आहे. यास अनुलक्षून, वरील दोघांविषयीं कोणी आर्या केलेली मूळारंभीं सादर केली आहे. याप्रमाणें मोरोपंताचा कित्ता घेऊन यांनीं आपल्या कवनांतही तशीच बहार करून दिली होती. त्यांची कीर्तन करण्यांत जी एवढी प्रसिद्धी झाली ती मयूरकृत आर्यांमुळें त्यांस लावण्या वगैरेची अनुकूलता असल्यामुळें त्यांची फारच योग्यता वाढली. जोंपर्यंत म्हणून कीर्तनकला आमच्या देशांत आहे तोंपर्यंत रामजोशी यांचें नांव आबालवृद्धांच्या मुखीं आतां आहे असेंच अबाधित राहील अशी खात्री आहे. कारण ज्या वेळीं छापण्याची वगैरे कांहींच सोय नव्हती त्या वेळीं हे कवि निपजले असून त्यांची कीर्ति आजपर्यंत टिकली हेंच काय थोडें झालें ?

केव्हां केव्हां असा चमत्कार दृष्टीस पडतो कीं, जुन्या कवींच्या लावण्या, अभंग, पदें, फारच बहारदार म्हणून श्रोत्यांचीं मनें तल्लीन करून टाकण्याची एखाद्याचे ठायीं अपूर्व कला असते. तो अलौकिक गुण पाहून मूळ कवी-विषयीं पूज्य बुद्धि उत्पन्न होतेच, परंतु त्याहून विशेष आनंद असा होतो कीं, त्या कवीचे हातून ही अशी लावणी किंवा अभंग म्हटला जात असेल किंवा नसेल याचा संशय वाटतो. तुकाराम महाराज तात्काळ अभंग करून साध्या चालीवर म्हणत असतील ते कोणीकडे ! व येथें नुकते कैलासवासी झालेले राघोबा भिंगारकर आपल्या वीस पंचवीस शिष्यशाखेसह म्हणत होते ते कोणीकडे ! यांची म्हणण्याची अप्रतिम चारु, मनांत भरवून देण्याची अलौकिक व सुबोध तऱ्हा व त्यांतून उत्कृष्ट वाद्यांचा मन लुब्ध करून टाकणारा मधुर स्वर; या सर्वांचा एकच थाट जेव्हां होऊन जाई तेव्हां श्रोत्यांची स्थिती कशी होत होती हें कित्येकांचे अनुभवास आलें असेल ! असाच प्रकार पन्हाळगडकर गोसाव्यांचा होता. त्यांचा खडा व मधुर स्वर व अप्रतिम लावण्यांच्या चाली पाहून अंतःकरण सुप्रसन्न होऊन जाई, यांत नवल काय.

ाडकर हरदासाचें कीर्तन पुण्यास मेहुणपुऱ्यांतील परांजप्यांच्या वाड्यांत असतां छेकापन्हुती अलंकाराच्या लावणीवर विवेचन चालू होतें. ोवांची म्हणणी अप्रतिम व गोड. मग काय ? श्रोतेमंडळी श्रवणांत इतकी ं गुग होऊन गेली कीं, कोपऱ्यावरील नातूंच्या वाड्याच्या दक्षिण बाजू- ेल बंगल्यास आग लागून डोंब झाला तरी कीर्तनरंगांत श्रोत्यांना पडून आगीची वार्ता कोणासच कळली नाहीं! कीर्तन आटपून आणली तेव्हां हा इतका प्रकाश कशाचा ? तो पाहूं लागलें तों शेजारच्या ्वर आगीचा लोळ! इतकी श्रोतृवृंदाची एकाग्रता होऊन गेली होती. ाऊनें लावण्या केल्या, परंतु त्यांची योग्यता रामा गोंधळी उत्पन्न होई- ाशेष झाली नाहीं. 'लावणी करावी सगन भाऊनें व ती वाजवून म्हणावी ामा गोंधळी यानें' असा रसिक लोकांचा ग्रह आम्हीं कितीदां ऐकिला अनंतफंदीचे नातु यांचे तोंडून आम्हीं फंदीनीं केलेली कवनें म्हणजे ळ' 'सवाईमाधवरावाचा पोवाडा' 'नानाफडणवीसाचा पोवाडा' कवनें ऐकिलीं आहेत. ती त्यांची चाल फंदीपासूनच त्यांस मिळालेली . ती सरळ असून आवेशयुक्त आहे. पण तीच चंद्रावळ व यांची चाल गोंधळ्यांचे तोंडून ऐकिल्यावर विलक्षण आनंद त्याजप्रमाणें रामजोशी यांचेही अनुभवास आलें होतें. 'बयाबाई कोणी एक स्त्री होती. ती यांच्या लावण्या फारच सुरस चा णत असे असें सांगतात. 'दैवें गांठ पडली बयाबाईची' अशी एक तिला उद्देशून जोशीबावांनी केली आहे.) ती आम्ही दाखल केलीच ती पाहून तिची योग्यता व रामजोशांचें मत रसिकांस समजून येईल. ाप्रमाणे मोरोपंताच्या आर्यांस लोकप्रीतिपात्र करण्यास रामजोशीबावाच ीभूत झाले ही गोष्ट सर्वांस माहीत आहे.

ानांतांत रामजोशांबद्दलचा लेख असा आहे:—"रामजोशी हा सोला- ाहणारा, जातीचा देशस्थ ब्राह्मण होता तो कथा कीर्तन करून आपलें कीत असे. हा प्रथमतः चैनी असून तमाशा करीत असे; व या आपण केलेल्या लावण्या म्हणत असे. एके प्रसंगीं मोरोपंत कवीनें उत्स-रचना पाहून तिची फार तारिफ केली. व तमाशा करण्याचे

सोडून हरिकीर्तन करीत जा, असा उपदेश त्याला केला. त्यामुळें तो कीर्तन करूं लागला. ह्याच्या आंगीं वक्तृत्व, बहुश्रुतपणा व समयसूचकता गुण चांगले होते, ह्याच्या समयसूचकतेसंबंधानें पुढील आख्यायिका सांगता एके वेळीं सरदार घोरपडे ह्यांच्या घरीं कथा करीत असतां ह्यांना बिदागी द्यावी ह्यासंबंधानें घोरपडे ह्यांचे कारकून विचारांत पडून त्यांच्यांत कुजबुज सुरू झाली, ती जोशीबावांच्या ध्यानीं येऊन त्यांनीं तत्काळ एक समयोचित आर्या रचून तेथेंच म्हटली. ती अशी:—

" **भोजासम कविताप्रिय, कर्णासम दानशूर घोरपडे ॥**
**ऐसें असतां माझ्या देणगीचा कां तुम्हास घोर पडे ?॥** '

ही समयोचितता पाहून घोरपड्यांनीं आंगावरील शालजोडी जोशीबावां आंगावर टाकली. ह्याची कविता प्रायः लावण्यांच्या चालीवर असून आहे. तो कथेंत बहुतकरून आपलीच कविता म्हणत असे. तथापि कधीं मोरोपंतांच्या आर्याही म्हणत असे. मोरोपंताची कविता ह्यानें फार प्र केली असें सांगतात. हा आपल्या वयाच्या पन्नासाव्या वर्षी वारला. ''

या आवृत्तींत आबासाहेब दिगांबर वैद्य यांनीं आपल्या संग्रहांतील जोशांच्या लावण्या मेहेरबानीनें दिलेल्या घातल्या आहेत. यांच्या जवळ प्रकारचा लेखसंग्रह आहे तो त्यांनीं दाखविला, याबद्दल आम्ही त्यांचे अ आहों. पूर्वींच्या आवृत्तींत सत्तर लावण्या होत्या व हल्लीं त्याच्या दुपटी जवळ लावण्या आल्या आहेत. चाली देण्याची योजनाही या आ केली आहे

**ग्रंथकर्ता.**

# रामजोशांविषयीं महदाख्यायिका.

१ सांयरोबानाथ आंबिये म्हणून एक साधु सोलापुरीं राहत असत, यांनीं हिं कविताही केलेली आहे. यांच्या मठांत रामजोशी यांची कथा व्हावी असा कांहीं मंडळींनीं हेतु प्रगट केला. त्याप्रमाणें कथा करण्याविषयीं जोशी-बावांनीं कबूलही केलें, पण सांयरोबानाथ यांस जोशीबावांची रंगेल व फक्कड वृत्ति सहन न होऊन यांनीं कथा होऊं दिली नाहीं! मंडळीचा झालेला विरस मनांत ठेवून मठाचेच बाजूस पाल देऊन तेथें कथा आरंभिली. कथेचा रंग काय पहावा! तेथें लोकांची दाटी जमली. कथा रंगांत आल्यावर पुढील लावणी तात्काल करून म्हटली:—

**चराचरीं गुरु तरावयाला नरा शिरावरी हरी ॥ जरा तरी समज धर अंतरीं ॥ हटातटानें पटा रंगवून जटा धरिशि कां शिरीं ॥ मठाची उठाठेव कां तरी ॥ वनांत अथवा जनांत हो कां मनांत व्हावें परी ॥ हरीचें नाम भवांबुधि तरी ॥ चाल ॥ काय गळ्यांत घालुनि तुळशीचीं लांकडें? हीं काय भवाचें दुर करतील सांकडें। बाहेर मिरविशी अंत हरीशीं वांकडे ॥ चाल पहि० ॥ अशा भक्तिच्या रसारहित तूं कसा म्हणविशी सुधा ॥ हरिरस सांडुन घेशी दुधा ॥ १ ॥ भला जन्म हा तुला लाधला खुला हृदयीं क्षुधा ॥ धरसी तरि हरिचा सेवक सुधा ॥ ध्रु० ॥ इत्यादि ॥**

या लावणींत मठाधिपतीची निर्भर्त्सना केली आहे. ही लावणी या पुस्तकांत घेतली आहे. ती सर्वच फार चांगली आहे; ती म्हणून पाहण्याची संधी वाचकांनीं दवडुं नये. या लावणीवरुन जोशीबोवांची मानसिक भक्ति व मानसिक वैराग्य उघड दिसुन येतें.

२ रामजोशाकडे एका सावकाराचें पांच सहा हजार रुपये येणें होतें. त्या सावकाराचे घरीं आश्विन शुद्ध प्रतिपदेपासून नऊ दिवसपर्यंत नवचंडीचा उत्साह दरसाल होत असुन रात्रीं कीर्तन होत असे. रामजोशी यांजकडून

पैसा येत नाही म्हणून किंवा त्यांची कथा फार नामी म्हणून "तुम्ही नऊ दिवस कीर्तन करा; आणि आपली सर्व खतें फाडून घ्या." असा निरोप जोशीबावांकडे पाठविला. पण ही असामी फटिंग! यांनीं कर्जा ऐवजी कथा करण्याचें नाकारिलें. पुढें "पांच दिवस तरी कथा करा" असा साव-कारानें आग्रहपूर्वक निरोप पाठविला. तोही त्यांनीं मान्य केला नाहीं. शेवटीं "एक दिवस कथा केली तरी ऋणमुक्त व्हाल." असें सांगून पाठ-विलें; तरी स्वारी आग्रह धरून बसली. निरोप सांगणारा गृहस्थ शहाणा चतुर व जोशीबावांचे कळवळ्याचा होता त्यानें विचार केला कीं, एका कथेंत पांच सहा हजार रुपये कर्ज फिटून जातें, तरी हे ऐकत नाहींत, यांस काय म्हणावें? मग त्यानीं सांगितलें कीं देवीपुढें कथा कराव-याची आहे; त्यास आपण नकार देऊं नये. असा आग्रह करून कशी तरी स्वारी वळविली. कथेचें निमंत्रण घेतलें. नेमलेले दिवशीं रात्रीं जाऊन कथा सुरू केली. कथेस मंडळीही पुष्कळ जमली. रात्र बरीच झाल्यावर कथेस असा रंग भरला कीं सर्व मंडळी जागचे जागींच तटस्थ होऊन गेली. जोशीबोवांनीं इतकी कमाल करून सोडली कीं, हीं दृष्टीसमोर वैराग्यमूर्तिच आहे कीं काय? असें प्रत्येकास वाटून देहभाव विसरून गेले. तितक्यांतून जोशीबावांचे सावकार तर कांहीं बोलूंच नये!! ते प्रसन्न होऊन म्हणाले कीं, "या कथेपुढें पांच हजार रुपये म्हणजे कांहींच नाहींत." असा थाट उजाडेपर्यंत चालला; कथा आटपावी असें कोणासच वाटेना. दिवस उगवल्यावर बोवांनीं आरती केली. मंडळी तर काय पण तें मंदीरच आनंदानें भरून गेलें होतें. कथा संपतांच सर्व रोखे व दोन हजार रुपये रोख आणून त्या सावकारानें जोशी-बाबांस विनयानें अर्पण केले. नंतर झालेल्या व्रहारीचा अन्वंबा करीत लोक आपापले घरोघर चालते झाले.

३. जोशीबोवा शक्तिपूजा करीत; त्यांत ते मद्यपान करितात असा दोष ठेवून सोलापूर येथील ब्रम्हवृंदांनीं त्यांस बहिष्कृत केलें होतें. कांहीं दिवसांनी श्रीशंकराचार्य यांची स्वारी सोलापुरी गेली, त्या वेळीं रामजोशी यांजजवळून मोठा दंड घेतल्यावांचून त्यांस पंक्तींत घ्यावयाचें नाहीं, असा

वेत तेथील मंडळीनें करून तो त्यांनीं स्वामींस कळविला. स्वामींची स्वारी रामजोशी यांचे घराजवळ विठ्ठलमंदिरांत उतरली होती. त्याच मंदिराचे ओटीवर बटवा सोडून बसण्याचा जोशीबावांचा क्रम असे. एके दिवशीं असें झालें कीं, रामजोशी सकाळपासून दुपारपर्यंत ओटीवर बसलेले राहिले. मंडळीनें ही स्वारी अशा गुणांची आहे म्हणून स्वामींस निवेदन केलेंच होतें. दुपार झाल्यावर स्वामींनी जोशीबावास विचारलें कीं, स्नान करण्यास उठला कां नाहीं? जोशीबावांनीं मोठ्या विनयानें म्हटलें कीं, जगाचे गुरूंनीं ज्याचा तिटकारा केला त्यास या जगांत राहून तरी काय करावयाचें? असें म्हणून एक संस्कृत लावणी स्वामी शंकराचार्यांवर करून म्हटली. ती ऐकतांच स्वामींची मर्जी बहाल होऊन शागिर्दास पाणी उपसण्यास सांगून पंक्तीस भोजन करण्याविषयीं जोशीबावांस सांगितलें!

४ दुसरे बाजीरावाचे वेळीं पुण्यांत निळकंठ शास्त्री थत्ते हे शास्त्री मंडळांत प्रमुख असत. त्यांस याज्ञिक कर्मांची भारी आवड. ते असतां जोशीबावांची स्वारी पुण्यनगरींत आली. त्यांच्या या शहरांत पुष्कळ कथा होऊन त्यांची कीर्तिही पसरली. ती कुटिल मंडळीस सहन न होऊन त्यांची फजिती करण्याची वाट पहातच ती राहिली. बुधवारांतील खासगीवाले यांच्या वाड्यांतील दिवाणखान्यांत जोशीबावांची कथा आहे हें प्रसिद्ध झालें, ती संधि पाहून पुण्यांतील शास्त्री पंडित यांस कुटिल मंडळींनीं बोलावणीं केली. दिवाणखान्यांत विद्वान् मंडळीचा थाट जमला! बोवांनीं कीर्तनास आरंभ केला. जमलेल्या मंडळांस लावण्या म्हणणारे हरदास म्हणून माहीत होतें. त्यांनीं त्यांस पाहून नाक तोंड मुरडण्यास आरंभ केला. हे जोशीबावा जाणत होते. त्यांनीं पूर्वरंगांतच बहार करून दिली. प्रथम याज्ञिक प्रकरण सर्व कथेंत गोवून त्यांतील सर्व बारीक सारीक माहितीची जशी एक याद द्यावी, त्याप्रमाणें उत्कृष्ट लावण्या नवीन करून कटिबंधाच्या चालीवर म्हटल्या. त्या इतक्या उत्तम म्हटल्या कीं, मंडळी तटस्थ होऊन गेली. सर्वांचे अग्रभागीं निळकंठ शास्त्री थत्ते * यांची स्वारी बसली होती, त्यांनीं आंगावरील शाल काढून बोवांस

---

* निळकंठ शास्त्री थत्ते ही स्वारी सामान्य नव्हती. यांच्या विद्वत्तेचा लौकिक या पुणें शहरांत तर काय पण काशी रामेश्वरापर्यंत गाजत होता. यांची मान्यता इतकी असे कीं, हे राजाच्या सभेंत आले तर यांस सर्व अभ्युत्थान देत. शास्त्री पंडित तसेच गृहस्थ यांनीं उत्थापन दिलें कीं, राजे ( बाजीराव साहेब ) ही ताजीम घेत असत. इतका मान त्या वेळेस कोणासही नव्हता. मोरशास्त्री साठे म्हणून जे येथील पाठशाळेंत विद्वान् होऊन गेले ते निळकंठशास्त्री यांचे शिष्य होत.

इनाम दिली त्यावरून जोवांची फारच वाहवा होऊन पुष्कळ लोकांकडून त्या दिवशीं शाली मिळाल्या व एकंदर वरील कुटिल लोकांची खूपच फजिती उडाली.

५. रेणुका भवानी म्हणून तांदळा जोशीबावांनीं आपल्या देवांत स्थापन केला. त्या देवीचे अर्चनासाठीं रामचंद्र शिवाजी साठ्ये सोलापूर येथें माम-लेदार होते, त्यांनीं सवाशें रुपयांची नेमणूक दरसाल करुन दिली आहे ती त्यांचे वंशजाकडे चालत असल्याचे ऐकतों. हे रामचंद्र शिवाजी साठ्ये, नारायण-राव पेशवे यांचे शालक असून जोशीबावांचे वेळीं सोलापुरीं मामलतीच्या हूद्यावर होते.

६. जोशीबावा दरसाल तुळजापुरी नवरात्रांत कीर्तन करण्यासाठीं जात असत. त्याबद्दल त्यांस सरकारांतून २५ रु. ची दरसालची नेमणूक असे. जोशी-बावांचा प्रेमा पंढरपूर क्षेत्रावर जन्मतः होता; म्हणून " क्षमातळीं इज समान नाहीं उमामहेश्वरपुरी " ही गोड लावणी केलीं आहे. त्याचप्रमाणें तुळजापूरचे देवीवरही एक उत्कृष्ट लावणी केली आहे. ह्या दोन्ही लावण्या पुस्तकांत सादर केल्या आहेत. तुळजापुरीं एके वर्षीं दरसालप्रमाणें गेल्यावर तेथील वाण्याकडून पासष्ट रुपयांची उचापत आणून खर्च केली. निघते वेळीं वाणी यानें रुपयांचा तगादा लावला. मग ती हकीकत आपल्या बंधूस खालील श्लोकाच्या द्वारानें कळविली:—

**येथें येउनि आज दीड महिना पासष्ट मुद्रा पहा ।**
**झाली शुद्ध उचापत प्रभुवरें केली बिदागी दहा ॥**
**येथें वार्षिक पंचवीस मजला देउनिया तोडितो ॥**
**दादा तीस दिल्याशिवाय मजला वाणी कसा सोडितो ॥ १ ॥**

७. एके प्रसंगीं रामजोशी मोहोळ मुक्कामीं आपल्या नेहेमींच्या क्रमाप्रमाणें कीर्तन करण्यास गेले. तेथें कथेची माळ लागली. मोहोळचा मामलेदार यास कथा, पुराण, भजन इत्यादि मार्गांचा तिटकारा असे. नाच, तमाशे, बैठका यांची फार प्रीति असे. रामजोशी हरदास गांवांत आल्याची खबर कळली, त्यावरून त्यास भारी राग येऊन कथेंत जाणें नाहीं असा निश्चय केला. ही गोष्ट रामजोशी यांस कळल्यावर पाटील, कुळकर्णी यांस यांनीं

सांगितलें कीं, मामलेदार यांस एकवेळ कीर्तन ऐकण्यासाठीं आणिलें तर चांगलें होईल. पाटील कुळकर्णी यांनीं भीड खर्चून मामलेदार यांजकडून दोन घटिका कथेच्या जागीं येण्याची कबुलायत घेतली. नेमाप्रमाणें कथेंत मामलेदारांची स्वारी आली. हें पाहून जोशीबावांनीं कथेचा रंग फिरविला. मामलेदार हा रंगेल आहे हें हरिदास बोवा जाणत होते. त्यांनीं कृष्णावतारांतील रासक्रीडा, राधाविलास इत्यादि गोष्टींच्या आख्यानांत आपल्या स्वरचित लावण्यांची अशी सरणी लावून दिली कीं, मामलेदार साहेबांची वृत्ति बदलून टाकली ! त्यांनीं आपले अंगावरील जवाहीर एकामागून एक बोवांच्या अंगावर घातलें आणि अनुपम शृंगाररसांत तटस्थ होऊन गेले.

८. रामजोशीबावा आपल्या सर्व थाटमाटानें नायकीण बरोबर घेऊन स्वारी संस्थान सांगली येथें जाऊन धडकली; सांगलीस गेल्यावर एका देवालयांत बिऱ्हाड लावण्याची योजना केली. त्या वेळीं सांगली संस्थानची मालकी चिंतामणराव आप्पा यांच्याकडेस होती. हे स्वभावानें कडक होते. त्यांची स्वारी देवदर्शनासाठीं सायंकाळीं वाड्यासमोर पडली. रामजोशी येथें आले आहेत ही वार्ता त्यांस कळली होती व जोशीबावांचे कीर्तनाची प्रशंसाही ऐकली होती. त्यामुळें देवळांत जाऊन बोवांची भेट घेऊन त्यांस वाड्यांत घेऊन यावें असा निश्चय करून देवळांत स्वारी आली. देवदर्शन झाल्यावर जोशीबावांस मनांतला हेतु कळवावा अशा बेतांत आहेत; तों कनाथी आड एक स्त्री आहे, असें चिंतामणराव आप्पांच्या मनांत आलें. मग त्यांनीं आपला बेत गुप्त ठेविला आणि ती स्त्री कोण होती ? अशी चौकशी करतां ती राख आहे असें समजलें. हें समजल्यापासून जोशीबावाविषयीं त्यांच्या मनांत अढी बसली. हा प्रकार रामजोशांनीं जाणिला. त्यांस आपल्या गुणाची खात्री होती कीं, प्रसंग साधला तर श्रीमंतांची मर्जी खुष करण्यास अवघड पडणार नाहीं; परंतु तो प्रसंग येतो कसा ? कोणत्या तरी उपायानें दोन पदें श्रीमंताच्या कानावर गेलीं म्हणजे पुरे असा विचार करून हा बेत बाईसाहेबांकडून सिद्धीस नेण्याचा प्रयत्न चालविला. बाईसाहेबांनीं आश्वासन देऊन कीर्तनाचा बेत वाड्यांतच महालाखालीं करण्याचा ठरविला. कथा नियमित वेळीं सुरू झाली. लावणीची तान ऐकतांच

श्रीमंतांची स्वारी महालांतून खालीं आली. आणि कथेचा शेवट होई-पर्यंत तेथून हाललीच नाहीं. चिंतामणराव आप्पा थोर बुद्धीचे असल्यामुळें त्यांनीं राग सोडून देऊन वाड्यांत आणखी दोन दिवस कीर्तन करण्यास सांगितलें. त्या दोन्हीं दिवशीं श्रीमंत आप्पा साहेबांची स्वारी मुख्य स्थानीं येऊन बसे. रामजोशासारखा वक्ता असल्यावर काय पुसावें ? त्यांनीं वीर आणि वैराग्य या दोन्ही रसांची बहार करून द्यावी. जोशीबावांची वाहवा होऊन त्यांस वाड्यांतून मोठी देणगी मिळाली. आणि आप्पा साहेबांची मर्जी खूष होऊन जोशीबावा हे अलौकिक वक्ते आहेत असें ते म्हणाले.

९. रामजोशी एकदां इचलकरंजीकर घोरपड्यांच्या येथें कीर्तन करण्या-साठीं गेले. त्या वेळीं हरदासबावांच्या बिदागीविषयीं मंडळींत वाटावाट चाललेली यांनीं पाहिली व अगदींच थोडी रक्कम देणार, असें यांस समजलें. मग काय ? कथा ऐन बहारींत आल्याबर बोवांनीं तात्काळ कवन करून म्हटलें तें हें कीं:—

**भोजासम कविताप्रिय, कर्णापरी दानशूर घोरपडे,**
**ऐसें असतां माझ्या, देणगीचा कां ? तुम्हास घोर पडे.**

ही समयसूचकता पाहून त्यांस योग्यतेप्रमाणें देणगी दिली. सारांश अशी चतुरता व समयसूचकता अघटितच !

# रामजोशीकृत लावण्यांची अनुक्रमणिका.

लावण्या पृष्ठ.


१ महाराज गवरी नंदना अमरवंदना दैत्यकंदना [ गणपती पंचायतन ] १
२ वदनीं श्री विनायक गावा हृदयीं वागावा, [ गणपतीवर ] ३
३ निजवदनीं या गजवदनाचें स्तवन घडावें गड्या [ गणपतीवर ] ३
४ धांव गणपते सदनीं या क्षणाये [ गणपतीवर ] ४
५ वंदे श्रीगजमुखमगजानिबालं [ गणपतीवर ] ५
६ सुभग सखीयं नितांत चपला चलयति ५
७ श्रीसांबाच्या समान दैवत न व भुवनीं हें दुजें [ सांबाची ] ६
८ वसिष्ठ मुनिवर म्हणे नृपाळा काय सांगूं मी तरी [ रामजन्म ] ६
९ त्या रामाला पायावर अबला न्हाणी हा [ रामाचें न्हाण ] ७
१० रघुवीर माझा जोडा हो ॥ ताततृपाळा जाऊनी सांगा ७
११ परितो ह्याला कपटाची दाखवील चतुराई ८
१२ निजरे बाळा घननिळा रामा सुखधामा [ रामाचा पाळणा ] ८
१३ अयि भज मानव रघुवीरं । निशिचरणधीरं [ रामाची संस्कृत ] ९
१४ म्हणे रुकमिणी सुदेव बाई पाठविला म्यां खरा ॥ १०
१५ सैरंध्रीशीं किचक वांछी कामुक सेनापती ॥ ११
१६ दिनानाथ द्वारकाधिश साह्य जरी तरी कायक न करी ॥ [ कृष्णाशिष्टाई ] ११
१७ व्यास भारती कथन मांडती पांडव कौरव वीर ॥ [भारतीयुद्ध ] १२

१८ केशव करणी अद्भुतलीला नारायण तो कसा १३
१९ शेषाचल कृतनिवास हा नत भवास गोष्पदकरी
[ गिरीच्या व्यंकटेशावर [ १५
२० दाट साधूचा हाट भागवत पाठ रुचिर फारशी
[ बारशीच्या भगवंतावर ] १६
२१ क्षमातळीं इजसमान नाहीं उमामहेश्वरपुरी [ पंढरपूर
क्षेत्रवर्णन ] १७

# प्रकरण दुसरें.

## उपदेशपर.

२२ नरदेहामध्यें येऊन गड्या त्वां हित केलें नाहीं २१
२३ कारे मनीं माधवाचे चरण धराना । किती कथितों हित
कांहीं कराना २२
२४ येऊनिया नरजन्माशीं । कांहीं तरी जाणबारे ।। २३
२५ झाला पाहा हो मानव की-सोडा धना कामिनी-भक्तिही
जागाबरी पाई ।। २४
२६ तनु दारोदार भरणाच्या भरी गेली ।। २४
२७ संसार कोणाचा गड्या काय खटपट करशील बाही २५
२८ हरिपद वंदा मग धंदा दूजा गोडरे ।। २६
२९ कुठवर हा भव पुरे पुरेरे । नाहीं यांत किमपि सौख्यरे ।। २६
३० आला पेच माथा तुझ्या । आतां कधीं जाण होसी । २७
३१ कोणाची रमा हे मानवारे भुललाशी । .... .... २८
३२ बापा अति हितकर गुरुशीं भजावें । गुरुलागी भजावें । २८
३३ बापा अति हितकर गुरुशीं भजावें । गुरुलागी भजावें । २९

३४ पाहि पाहि निजभुवनम् । प्रतीका बोलसी मुडदारा ।
[ चारभाषेची ] २९
३५ कुंजांत मधुप गुंजारव यमुनातटीं । होरी खेळतो हरी
करुनि राधानट आपण नटी [ वसंत ] ३१
३६ बाई यशोदे बाळ तुझा तान्हा । तुला वाटे परी नष्ट
मोठा कान्हा कान्हा. ३४
३७ राधासखी संवादे छेकापन्हुति आयका । रसिक हो
किती चतुर बायका [ छेकापन्हुतिअलंकार ] ३५
३८ कुंजांत खेळतो कान्हा तो यशोमतीचा तान्हा ॥ ३७
३९ बाई नको जाऊं यमुनातीरीं । नंदाचा नंदन हरी करितो
बळजोरी, धरीलगे पदरीं । ३८
४० नका हरी हा दंगा करूं । या कर्मे नाहीं बरें रयत
ही धन्याचें लेंकरूं ॥ ३९
४१ दूर होय कान्हा आम्ही तुशीं खेळुनी होरी । तुटली
मर्जी तूं गर्जी नको बळजोरी ॥ ४०
४२ बाई नंदाचा मूल माझ्या डाई हो । अगेडाई । आतां
पडला मी करूं तरी काई ॥ ४१
४३ हरी वांचुन संसार कशाचा । किती साजणी धीर धरूं ।
[ गोपींचा शोक ] ४२
४४ क्षणभरी चाल माझ्या सदनासी । सख्या हरि पाहूं
वाटते दिनरजनी तुझ्या० ४३
४५ रंग सावळा । सावळा गडे आंगीं । फिरस्ता किती हो
बेढंगी ४४

४६ अगे सखे यशोदे बाई । मूल आपला आटोपी ॥ ४४

४७ कांहीं लाज यशोदेच्या पोरारे ॥ ४५

४८ बोलूं तरी कायरे—सावळीया मी ॥ ४६

४९ या नंदनंदनें फट फट मन विटविलें । खाऊनिया चटमट दधिघट० ४६

५० अहा या हरीनें उद्धवारे काय केलें । आतां काय कसें आम्ही गोकुळीं वसावें ॥ ४७

५१ हरी वंचुनि नेला बाई । आतां करूं मी काई ॥ ४८

५२ आतां काय आम्ही हरीवांचून राहूं । प्राणसख्याला कधीं पाहूं. ४८

५३ यशोदेबाई मुल तुझा अनिवाळ । ४९

५४ धीर धरीं नंदाच्या पोरारे ॥ ४९

५५ कैसा निपटपटु जाहलासी कान्हयारे ५०

५६ मज वाटे हरिसी आज होरी बाई खेळावी ॥ ५०

५७ काय म्हणावे मुलगा दिसतो, फार कठीण हा कर्म करी ५१

५८ या हरीसाठीं मी जाहालें पहा वेडी ॥ ५१

५९ हरी मथुरेला आजि कां गडे जातो ? । कांहीं कळेना कधीं परतुन येतो येतो ॥ ५२

६० घडिभर तरी सदनासी । येऊन जा माझी आसोसी ॥ ५२

६१ लाजुनिया न परतला—हा हरि दासी संगे रतला ॥ ५३

६२ हा हरि माझ्या ख्यालीं कां पडला । हा काय बोलूं ओंगळ मेला ॥ ५३

६३ मी सांगून चुकतें कान्हा । कर सोड मला हें दांडगेपण सोसेना ॥ ५४

# प्रकरण तिसरें.

## प्रेम.

६४ घडीभर याहो माझ्या घरासी राया ॥ ५५
६५ अहो सख्या जिवलगा काय अंतर पडलें सांगा ॥ ५५
६६ सोन्याचें पायजिव तळीं । मदन पुतळी । ५६
६७ साजणी समयिं घरधणी नसत किती उणी युवती
छावणी असुन कोणीकडे ॥ ५६
६८ झाली तरुणपणाची धूळ । पती नाहीं सेजेवरी सुंदरा
रडे मुळमूळ ॥ ५९
६९ पाहून सख्या मी भुललों रमलों अघटित करणी ब्रम्हाची ॥ ६०
७० तुम्ही सजणा—सुजाणा—घ्या आदराचें पान ॥ ६२
७१ सतीसुमती गुणवती सुकुलजा रतीपरीस चांगली ॥ ६३
७२ तरुणि तवेयं कुचतटिमति गुरुं कुरु ममहृदि सादरं ॥ ६५
७३ कुंजांत वाजणी वेणू भोंवताल्या चरती धेनु । कीं उडती रेणू ॥
[ वेणू ] ६५
७४ मूल तुझा अति अनिवार यशोदे ॥ ६७
७५ बाई नंदाचा मूल पहा किती तरी बेढंगी ॥ ६८
७६ या नंदनदनें फुटफुट मन विटविलें । खाऊनियां मटमट
दधिघट दुध लुटविलें ॥ ६९
७७ सोड सोड पदर मुलगिचा । जळो तुझी अशि कशी ही
होरी ॥ ७०
७८ रंग सावळा गडे अंगीं फिरस्ता किती हा बेढंगी ॥ ७१

७९ नंद किशोराची होरी जळो बळजोरी पिचकारी मारी ॥ ७२
८० कुंदरदन तनुशाम सुलोचन कोण बाई मजं हा नित्य हाटकी ॥ ७२
८१ कारटा तुझा हा द्वाड यशोदेबाई कां पडला आमुचे डाई ॥ ७३
८२ अशी कशिरे तुझी होरी हरी आवळुन धरशिल उरीं ॥ ७४
८३ उद्धवजी मधुवनीं । फट फट फठ फट बटकीसी रतला० ७६
८४ कांहीं नाहीं लाज पोटीं । मनुष्यांची काय दाटी ॥ ७८
८५ काय म्हणुन झटशिल मला मला अशी कोण व्याली तुला ॥ ७८
८६ पळुं नको थांब गवळिया तूं ॥ ७९
८७ कांहीं लाज यशोदेच्या पोरारे ॥ ७९
८८ नंदात्मज मंद मंद मा याहि । तुज अवरूच नाहीं ॥ ८०
८९ राधामुखरण मध्यें मिळाल्या आणिक ह्या गवळणी ॥ ८०
९० राधिका रमणगोविंदा नको येऊं निंदा माझ्या गेहीं ॥ ८१
९१ बोलुं तरि कायरे सांवळिया मी ॥ ८२
९२ श्रीरंग गोपिकोत्संग धरुनि करी रंग हरी हा बाई ॥ ८३
९३ या प्रपंचि सौख्य तुला कायरे ॥ ८४
९४ या भवांत सुख पाहसी हें काय ? ॥ ८४
९५ संत थोडे थोडे थोडे थोडे ॥ ८४
९६ दोदिवसांची तनु हे साची, सुरतरसाची, करूनि मजा ॥ ८५
९७ भला जन्म हा तुला लाधला खुलास हृदयीं बुधा ॥ ८६
९८ नर जन्मामधिं नरा करुनि घे नर नारायण गडी ॥ ८७
९९ ऐक सज्जना अरे मनमोहना संपत पाहतां कवणाची ॥ ८८
जाईल काया० ॥

१०० बा काय घालिशी संसृतीचा पिंगा । या मानवदेहीं
भजरे श्रीरंगा ॥ ८९
१०१ हरिच्या पांई गड्या न करशिल किती प्रपंच्यामध्यें लगट ९०
१०२ अरे सख्या समज धर कांहीं । हरिवांचुनि संसारीं ॥ ९१
१०३ खोडा हा संसार जनाचा । सारा लोभचि दारधनाचा ॥ ९२
१०४ क्षणभरी गारे कोणी क्षणभरी हरिच्या नामा ॥ ९२
१०५ येउनिया नरजन्मासि कांहीं तरी जाणवारे ॥ ९३
१०६ संसार कुणाचा गड्या काय खटपट करशिल बा हीं ॥ ९३
१०७ पहा विचारुनि सार असारा वचन मनांत धरा
न धरा ॥ कामकोप हे मारा० ९४
१०८ श्रीनाथ सदगुरुपदा, भजा आपदा काव्यसंपदा, जोड० ९४
१०९ झाला पहा हो मानव कीं सोडा धना तुम्ही कामिनी० ९५
११० मृगजळवत जग उद्भवलें हें जाण सर्व माया ॥ ९६
१११ मनुजा सुखदायक हरीला गावें । तत्पदीं लागावें ॥ ९७
११२ धरि हरिचरण तरि तरी । होईल तुजवरी राया० ९८
११३ भज भज भवजलधीमजी मनुजा शिवाला ॥ ९८
११४ कोरे हें कळना तुझी हरिची अगाध माया ।
अर्जविशील पैसा० ॥ ९८
११५ अरे गड्या समज धर कांहीं । कांहीं संसारीं कुणाचीरे
भर कराशील सारी ॥ ९९
११६ ब्राम्हणी राज्य जोरदार घोड्यावर स्वार होते शिपाई
[ पुण्याचें वर्णन ] १००
११७ भूतळांत जशिया स्थळांत यमुना जळांत हिमनग
बाळा । [ तुळजापुर वर्णन ] १०२

११८ यंदा घरधन्यानें धंदा केला, कटकाल गेला ॥
[ होळकर दंगा ] १०४
११९ उगा अमासि वाउगा कशाला युगांत खळ हा कली
[ दुष्काळ ] १०६
१२० अरे कांहीं बोल वाणी झाले पहा दिनवाणी ।
नको करूं वेड्यावाणी० ११०
१२१ किती गोड किती गोड सुभग सुंदरी । दृष्टीला पडलीरे । १११
१२२ कां मजशीं अबोला धरुनि जाशि वांकडा घरावरुनि ॥ ११२
१२३ सुंदरा मनामध्यें भरली जरा नाहीं ठरली हवेलिंत शिरली ११३
१२४ कांताला एकांतीं कधीं पाहुंगे सखये ॥ ११४
१२५ अरे मुखसारसातें दावुनिया जाय माते ॥ ११५
१२६ रुसुं नये कामिनी हसून बसून मासिं बोलगे ॥ ११५
१२७ या मदनें मज गांजिले । करूं तरी कैसें ॥ ११६
१२८ जा गडे ह्याला तूं घाल माझी आण ॥ ११६
१२९ कसे करूं एकांतीचि गांठ पडेना ॥ ११७
१३० करूं तरी कायगे सईबाई । सखा घरीं नाहीं गेला बाई ११७
१३१ क्षणभरीं चाल माझ्या सदनासि सखया । अरे पाहूं
वाटतें दिनरजनीं० ॥ ११८
१३२ दैवें ही गांठ बयाबाईची० मज पडली साची ॥ ११९
१३३ कोण्याग सुभगाची मदनमंजरी । सांग सखे सुंदरी ॥ ११९

# रामजोशीकृत लावण्या.

## लावणी १ ली.

### गणपतिपंचायतनावरची.

चाल ॥ श्रीवक्रतुंड गणपती गणाधिपती तुझी जे स्तुति जे ॥ होनाजीबाळ ॥

महाराज गवरीनंदना अमरवंदना दैत्यकंदना हे मंगळमूर्ती । ठेवी कृपादृष्टि एकदंत दिनावर पुर्ती । हे स्वयंभु शुभदायका हे गणनायका गीतनायका अढळ दे स्फूर्ति । भवसमुद्र जेणेंकरून सहजगति तरती । चाल । म्हणउन लागतों चरणीं गजमुखा । दे देवा निरंतर स्मरणींच्या सुखा । दूर करी अंतःकरणींच्या दुःखा । जय हेरंब लंबोदरा स्वरूपसुंदरा स्वामिसहोदरा हे विघ्ननिवारी । मज रक्षी रक्षी सहकुटुंब सहपरीवारी । ध्रु० ॥ हे गणेश हे माधवा हे गवरीधवा लोकबांधवा मित्र तमारी । उदयोस्तु अंबे जगदंबे आदिकुमारी ॥ १ ॥ जय गोविंद जनार्दना हे मुरमर्दना दुःखकर्दना । साधुसहवासा । वांछितों भ्रमर मी तव चरणांबुजवासा । हे त्रिभुवनप्रतिपालका हे ऋषिबाळका चित्तचालका हे क्षीरनिधिवासा । हे रमारमण गरुडध्वजा जगन्निवासा । चाल । हे सर्वसाक्षी मधुसूदना श्रीपती । तुज दानव सुहास्यवदना कापती । किती गेले यमसदनास पती जयजय गुरुपरमानंद विश्वमूळकंद लागो मज छंद रामनिर्धारी । मागणें हेंचि भगवान पितांबरधारी । हे गणेश हे माधवा हे गवरीधवा लोकबांधवा मित्र तमारी । उदयोस्तु अंबे जगदंबे आदिकुमारी ॥२॥ हे रामनामघोषणा

विश्वशोषणा मदननाशना हे भूप्रतिपाळा । हे स्मशानवासा कैलासाद्रिपाळा । हे पापदग्धदर्शना विषप्राशना भस्मभूषणा हे सांब कृपाळा । उठे दिव्य जटेंतून निर्मळ उदकउमाळा । ॥ चाल । हे व्याघ्रांबरपरिधाना शंकरा । कैलासब्रह्मांडनिधाना किंकरा । हे प्रसन्नकर्मनिधाना सुखकरा । हें पंचानन दशभुजा हे वृषभध्वजा भावें करी पुजा रामनिर्धारी । हे भालचंद्र गंगाधर हर त्रिपुरारी । हे गणेश हें माधवा गवरीधवा लोकबांधवा मित्र तमारी । उदयोस्तु अंबे जगदंबे आदिकुमारी ॥ ३ ॥ हे नारायण दिनकरा हे कमलाकरा भानु भास्करा हे अगणितकरणा । करीं शंखचक्र देदीप्यतेजविस्तीर्णा । पुढें गरुडाग्रजसारथीविराजित रथी परमपुरुषार्थी भक्तउद्धरणा । कल्याण इच्छिसि सदैव उत्तमवर्णा । चाल । वासरमणी प्रकाशगहना तूं । दासाशीं सदय हयवदना पाव तूं । दे देवा जवळ रिपुदहना ठाव तूं । एका अनन्य भावें शरण दाखवी चरण त्वरित करी हरण दुष्कृतें सारीं । पावलों कष्ट मी वहुत या संसारीं । हे गणेश हे माधवा हे गवरीधवा लोकबांधवा मित्र तमारी । उदयोस्तु अंबे जगदंबे आदिकुमारी ॥ ४ ॥ नमो नमो हे माहेश्वरी हे जगदेश्वरी मुख्य ईश्वरी आदिभवानी । मांडिलें नृत्य कौतुकार्थ विष्णुशिवांनीं । तिन्ही त्रिकाळ गणगंधर्व न करितां गर्व साधुनी पर्व सर्व देवांनीं । केली प्रसन्न तुजला गाऊन मधुरवाणी । चाल । हे प्राणीप्राण तव स्मरणीं जग वती शशीसूर्य तुझ्या बळभरणीं उगवती । हे धन्य धन्य अनुपूर्ण भगवती । कविराय असा हा दक्ष सेवेमधीं लक्ष तयाचा पक्ष धरून तूं तारी । महादेव प्रभाकर रक्षी या अवतारीं । हे गणेश हे माधवा हे गवरीधवा लोकबांधवा मित्र तमारी । उदयो० ॥ ५ ॥

# लावणी २ री.

चाल ॥ मल्हार मल्हार वाचे घोका ॥ मग पुढें पाऊल टाका ॥

वदनीं श्रीविघ्नविनायक गावा हृदयीं वागावा ॥ ध्रु० ॥ ज्याचे पद-पंकजरज सुरसंघें । मस्तकीं धरावें । ज्याच्या नतभक्तजनाच्या संगे भवताप सरावे । ज्याणें सिंधुसुरादिक भंगे । रिपुगर्व नुरावे । तो हा गणराज वरद मागावा । रंगीं रंगावा । वदनीं ० ॥ १ ॥ शुंडा-भुजदंडसुमंडित ज्याचे । कुंडलें लटकतीं । श्रवणीं रंगामध्यें तुंदिल नाचे । पाऊलें पटकती । भुलले गण किन्नरगंधर्वांचे । गायनीं अटकती ॥ ऐसा गजवदन काय सांगावा । स्वमनीं लागावा । वदनीं ० ॥ २ ॥ हस्तीं वरपरशुमोदकांकुश । हे शोभतात चारी । माथां मणिमुकुट झळाळुनी राहे । दूर्वा उपचारी । अंगीं सर्वोत्तम सुषमा वाहे । विद्यामृत चारी । वाटे कविराय सदा भागावा । तत्पदीं जागावा । वदनीं ० ॥ ३ ॥

# लावणी ३ री.

चाल ॥ या विषयाचे पाई बुडाले कैक लक्षापति खंडीमधीं तुं एक पावरती ॥

निजवदनीं या गजवदनाचें स्तवन घडावें गड्या । कां विफळ गमाविशी घड्या ॥ ध्रु० ॥ शंकरसुत अभयंकर त्याचा किंकर हो झडकरी । तरि मानव तनु ही खरी एकदंत गुणवंत कला-निधि महंत भुवनोदरीं । त्रिभुवनमंगलकरी । लंबोदर सुख-दायक विद्यांभोनिधिअंबुज निज अंतरीं । हा विघ्नगजावरी हरी । आहे हा यास्तव निशिदिनिं भजा धरा निज शिरीं चरणींच्या रजा । असा सुरसुखकर नाहीं दुजा । भजनें गति रोकड्या । बा भवार्ण-

वांतील किड्या । निज० ॥ १ ॥ शुंडादंडसुमंडितगंडस्थलीं दूर्वांकुर नवे । मधुपांचे फिरती थवे । मरकतमणिचे कनककिरिटीं जसे बसविले जवे । ही शोभा नच बोलवे । पायस मोदक लाडू खोबरें खडिसाखरेचे रवे । हें भक्षायाची सवे । अरे हा धणिवर ठाऊक जगा । मोडल्या किती असुरांच्या रगा । अशाच्या पदकमलीं कर लगा । वागामृताच्या वड्या । या म्हणुं नये बावड्या । निज० ॥ २ ॥ इंदु शिरावरीं सिंधु बुद्धिचा बंधु करुनि घे कसा । धर याच्या पादसारसा । सात्विक त्याला सत्व तमासि तम राजस राजसा । हा जसा भाविला तसा । कार्यसिद्धिकर इतर दैवतें बारा वर्षे बसा । हा आज आठ चौदिसा । अरे हा सतत टेवा मनीं विनायक भाद्रचतुर्थीदिनीं । पहावा अधिक सुखप्रद जनीं । या चरणासिं जड्या । हो कविरायाहुन पड्या ॥ निज० ॥ ३ ॥

## लावणी ४ थी.

**चाल** ॥ या विषयाचे पाई बुडाले कैक लक्षापती खंडीमध्यें नूं एक पावरती ॥

धांव गणपते सदनीं या क्षणा ये । त्वरा करोनी । ध्रु० ॥ धांव पाव हावभाव दाव घाव दाव राव हा नको । उंदिरा वसुनिया सुंदरा त्रिभुवनविद्यामंदिरा । भरवुनी जारंगीं इंदिरा । गणविरा । विघ्नराज देवा बापा हरिशिल सर्व त्रिविध तापा । तार तार भारवार कारभार फार बार बार पार करी । धांव गणपते सदनीं० ॥ १ ॥ पंडिता अंकुशपरशुनें मंडिता । नाहीं त्वन्निभ रे धुंडितां । पदनतविघ्नखंडिता । वरदेशा । देवा कुंदमंदहासा । त्रिभुवनमंगलाधिवासा । थाट माट हाटकादि ताट पाट घाट दाट भाट वाट पाहे । धाव गणपते ० ॥ २ ॥ वंदना करितों गिरिजानंदना । झडकरी टाकुनि

ये स्यंदना । करिशिल सदरिच्या कंदना । भालचंद्रा सर्वलोक-
ताता । देवा तूं तर आद्यनाख्यगीता । कविराज राजकाज साज
गाज वाज वाज माज बांध । धांव गणपते या क्षणा ये ॥ ३ ॥

# लावणी ५ वी.

चाल ॥ दामाजीपंताची रसद ॥ यवन बेदरचा अधिकारी ॥

वंदे श्रीगजमुखमगजानिबालं । विधुमुलालितभालं ॥ ध्रु ० ॥
चंदनमंडितशुंडादंडं । मदमर्दितगंडं । सांगश्रीविभवकरंडं ।
कृतदितिकुलदंडं । दूरीकृतपदनतजनभवजालं । वंदे० ॥ १ ॥
गौरीपरमेश्वरकुतुकारामं ॥ कृतविघ्नविरामं । कामं त्रिभुवनैक-
पूरितकामं । सुवरदमभिरामं ॥ शरणागतपरिजनकरुणापालं ।
वंदे० ॥ २ ॥ आद्यं विद्यामृतपारावारं विधिजगदाधारं । कंठालंबित
मणिमुक्ताहारं ॥ श्रितसंपदगारं । धीरं कविरायपिकैकरसालं
वंदे ० ॥ ३ ॥

# लावणी ६ वी.

चाल ॥ दामाजीपंताची रसद ॥ यवन बेदरचा अधिकारी ॥

सुभग सखीयं नितांतचपला चलयति मम मानसं । कदा मे
चुंबति मुखसारसं ॥ ध्रु ० ॥ गजपतिगती रतिसमानमृदुतरबर-
मंजरी । तथेयं भाति सुभग सुंदरी । चलदलकवलसुलालितवद-
नांदती सुखकरी । निजकुचसुलालितमणिमंजरी । चरणरणित-
निजनूपुरचाकिता यत्पुरतः पामरी । सुराणामपि रंभा सूकरी । करि-
अरिपरीसुरुचिरकटिभागानतगुणांजितगुर्जरी । सुरूपा पदपद्धती
कुंजरी । चाल । सा कथं भवति भो मदीयरतभोगिनी । जन केयं

तरुणी नितंबकुचशालिनी । सुरवरकिन्नरचलनचकितकामिनी । कुचविलिखितमृगमदलसितसुरभामिनी । सुंदरतरमृदुनलिनदलायतलोचनशरसाहसं । न सोढुं शक्नोम्यतिराजसं ॥ १ ॥

# लावणी ७ वी. सांबाची.

चाल ॥ या विषयाचे पाई बुडाले कैक लक्षापति खंडीमधीं तूं एक पावरती ॥

श्रीसांबाच्या समान दैवत नच भुवनीं हें दुजें । सुरांचें मंडल याहुनि खुजे ॥ ध्रु० ॥ वरकड म्हणविली देवसुरांतील महादेव हा खरा । भवार्णवलीला ऐकुन तरा । विचित्रभूषण पाहा ज्याच्या शिरीं गंगेचा तुरा । ललाटीं दिल्हा तिलक साजिरा । स्त्रीकृत ज्यानें अस्त्रीकृत हारी मारी त्रिपुरासुरा । सुरांचा करुनि मनोरथ पुरा । स्वकृत मग स्वीकृत जाणें निगमही न गमे येरा । वर्णितां पुरी पडल्या नरा । पहा कशी हे विचित्र लीला जाळुनि रतिच्या वरा । कवळली अर्धांगी सुंदरा । कुंडलयुग कुंडलिश कर्णीं जाला कंकणकरा । नांदतो करुनी जगाच्या धरा । काळकूट विष जाळित सुटलें जें ब्रह्मांडोदरा । हाची घेतसे दुःसह गरा । आहे या कर्मे भोळा न म्हणा ती धूतमा । किती राजनितिची यांत दाविली सिमा । हें दारुण विष यास्तव शिरीं धरी चंद्रमा । रिपुमनंदन विषाची करितां अंगीं उमा । ही प्रळय अग्नीवर ठेवी सरी दुत्ततमा । अगाध कृत्यें अशीं न कोणीं देवे देवा झुजे । करावी पिनाकविलसित गुजे ॥ १ ॥

# लावणी ८ वी.

चाल ॥ या विषयाचे पाई बुडाले कैक लक्षापति खंडीमधीं तूं एक पावरती ।

वसिष्ठ मुनिवर म्हणे नृपाळा काय सांगूं मी तरी । पातला

हरी कौसल्योदरीं ॥ ध्रु० ॥ भाग्य उदेलें तुझें सुकृतस्थान धन्य वंश हा तुझा । जगाचा तुजहुनि झाला खुजा । अनंत जन्मीं परमात्म्याची तुलाच घडली पुजा । पातला ब्रम्ह तुझ्या हितगुजा । बा दैवाचा तुला म्हणावें असा न कोणी दुजा । पाहिला म्यां तुझ्या अजाचा अजा । बा ब्रम्ह आहे हें कौसल्येच्या कुशीं । बा तेज फांकलें अद्भुत हें तिजपशीं । तूं बावनकशिला काय लावशील कशी । मज जन्म वाटतो सत्यची नवमी दिशीं । गर्भ जाहला पूर्ण पातला रवि माध्यान्हावरी । समय हा गुलाल घ्यावा करीं ॥ १॥

# लावणी ९ वी.

## रामाचें न्हाण.

**चाल** ॥ दामाजीपंताची रसद ॥ यवन बेदरचा अधिकारी ॥

त्या रामाला पायावर अबला न्हाणी हो । ज्याच्या पादिंचें तारित जगाला पाणी हो । तो विश्वाला प्रसवला तयाची टाळू । माखून म्हणती तान्हयासी भय न विटाळू हो । ॥ १ ॥ जो गुरू केला शंकरादि सुरलोकांनीं हो । जो दैत्याच्या नुघडितो नेत्र हाकांनीं हो । ह्याच्या कुर म्हणुनी फुंकिती कानीं हो ॥ २ ॥ अनंककोटि ब्रह्मांडें ज्यामधीं माती हो । करिती ज्याच्या पदरजासिं नवस रमा ती हो ॥ त्या कविराया निजपदिंची लाविती माती हो ॥ ३ ॥

# लावणी १० वी.

**चाल** ॥ पदाची ॥

रघुवीर माझा जोडा हो ॥ तात नृपाळा जाऊनी सांगा कामिटका मोडाना ॥ १ ॥ आला मेला रावण काळा । तोंड तयाचें

ज़ाळाना ॥ २ ॥ सदना आले कविरायाच्या ममतेनें घन जोडा हो ॥ ३ ॥ रघुवीर माझा जोडा हो ॥

# लावणी ११ वी.

### चाल ॥ पदाची ॥

परि तो ह्याला कपटाची दाखवील चतुराई । प्राणहा वेंचुनि करणी करील तो असलाई । त्या पक्षाची होशील काय उतराई ॥ ध्रृ० ॥ बा रामा नेईल जानकीस तो खळ काळा । बा रामा मग तूं करशील यत्न जनकपाळा । बा रामा माझ्या तान्हुल्या कीं चिमण्या बाळा । बा रामा मग तूं वानराशीं करशील गोळा । बा रामा त्याला मारशील सहबांधव मेळा । बा रामा आणशील मग जनकनृपाची बाळा । बा रामा पुढती ही खटपट तुझीया भाळा । बा रामा तुजला या वयांत लागो डोळा । जो जो बागुल तूं असाची गिळशील सुख आम्हा । बांधे अमापाजितें मारशील पुढें मामा । निजरे० ॥ १ ॥

# लावणी १२ वी.

## रामाचा पाळणा.

### चाल ॥ पाळण्याची ॥

निजरे बाळा घननीळा रामा सुखधामा पावन नामा । निगमादिक लपविती गुणसीमा ॥ ध्रु० ॥ बारे वारा वर्षाचा होशील या ठायीं । गाधिज नेईल दशरथाशीं सांगून शिष्टाई । मख रक्षुनिया राक्षसांत करशील धृष्टाई । मग धनु भंगे जनकाचा होशील जावाई ।

कैकइच्या कलहानें तदुपरी वनशाई । पंचवटीचा होशील वसशील अमराई । बागुल येईल मग विसा भुजांची निज जाई । मला काळा विकाळ दशानन करून काई । मोठा खोटा चोरटा धरी हा तुज डाई । दावील बापा मारीच कनक मृग चपळाई । बाईलबुद्ध्या ह्यामागें धांवशील वनीं पाई । मारशील त्याला, मरतांना करील तो कुचराई । तुजसम अरोळी देईल तो उणी नाहीं तिळराई । ह्या शब्दानें जानकी म्हणेलच अग आई । लक्ष्मणजीला तुजकडे पाठवी लवलाई । गेला दोघे पाहून करील तो मग घाई । यतिवेषानें गांजी नेईल माझी सुनबाई । दशरथजीचा आडवा होईल मग भाई । करीलची तो जटायु मोठी मर्दाई ॥ १ ॥

# लावणी १३ वी. संस्कृत.

चाल ॥ दामाजीपंताची रसद ॥ यवन बेदरचा अधिकारी ॥

अयि भज मानव रघुवीरं । निशिचररणधीरं ॥ ध्रु० ॥ श्रममिह मा कुरु दारधने । किं तव सुजातं । किं, भ्रमणैरिह कालवने कुरुषे निजघातं । नहि करुणा सहसा मदने । पश्यसि किमुपातं ॥ चाल ॥ तापादपसर दुर्मते गुरतांगीकृतकामं । मुनिजनमानसरतिकारं । पावनपदनीरं ॥ १ ॥ नान्यदुपायांतरमधुना । चिंतांबुधितरणे । जीवति रामाधरमधुना । कः खलु कामरणे । दिनमणिवंशाबुधिविधुना । कृतमभयं शरणे ॥ चाल ॥ नरतनुरियमधिराजते त्वयि नरसुकृत भारत । प्रासामपि त्वं दुर्मदैमृतं तेजेसीग राज । सुललितपीतोत्तमचीरं । त्रिभुवनगंभीर ॥ २ ॥ कुरु वरकाद्यरिदमनं । वयसि परमतरले । दश करणानामाक्रमण । कचिदिह भुवि विरले । धनमिति मा मानय वमनं ।

पश्य समधुगरलं । मोहं जहि वनमालिनश्चरणं । शरणं यदि वद वदनादिती दुर्भवे दशरथसुत मां पाहि । कविरायालंकृतिहीरं । दर्शितभवतीरं ॥ ३ ॥

# लावणी १४ वी.

चाल ॥ दिल्ली शहरचा बटावपंची रुक्मिणी स्वरुपानें सरस ॥
मायबापाचा त्याग करून आला आमदा नगरास ॥

म्हणे रुक्मिणी सुदेव बाई पाठविला म्यां खरा । परि कधिं येईल वृद्ध मित्र हा मनामधें खरखरा ॥ ध्रु० ॥ तो दिन गेला रात पातली काय सांगु मी तुला । चैन पडेना असुग माझा कृष्णपदीं गुंतला । तातडि बहु दादाचि त्याणें हळदी लाविली मला । देऊं केलें मज त्या मेल्या चैदिपतीच्या मुला । म्यां त्या रातीं केला जीवितसंकल्पाचि आपुला । दुःख सांगतां नये मनांतील बापाला आईला । रात जातसे तों तों जिव हा धडधड करूं लागला । अश्रु वाहती नयनीं सखये गळा भरुनियां आला । त्या मेल्यानें लग्नसमारंभाचा मंडप दिला । कुंडन नगरीं उत्सव मन्मनिं दुःखाचळ वाटला ॥ चाल ॥ गडे काय सांगूं या कर्माची काहाणी । अवकाश थोडका दादा मज नाहणी । परि समयीं झाली सुदैव गति लाहणी । मी पाय पहाया पहिल्यापुन शाहाणी । उघडून दृष्टि जों करूं गेलें पाहणी । अकस्मात तो दृष्टिस पडला जसा हरवला हिरा । विप्रमुखश्री कळवी मजला यदुविर आले घरां ॥ २ ॥

# लावणी १५ वी.

चाल ॥ केशव करणी अघटित लीला नारायण तो कसा ॥
जयाचा सकल जनावर ठसा ॥

सैरंध्रीशी कीचक बोली कामुक सेनापती । रमाया जंबुक सिंहीप्रती ॥ ध्रु० ॥ म्हणे भुजिष्या पण त्यजुनी हे रंगमहालीं वसा । तुम्हां जें इच्छित मज तें पुसा । कष्ट करुनि बहु परसदनीं कां दुःखा भोगितसा । आहें मी सेवक तुमचा जसा । चंद्रहार मुद छंद कंकणें तन्मणी लफ्फा तसा । लखाकी तानवडाचा ठसा । हीर गरसळी वेणी नग मणीं पैंजण आणि आंरसा । पलंगी घेऊनि ऐसे रुसा ॥ चाल ॥ शयनावरी जाऊं चला मंदिरीं ।

# लावणी १६ वी.

चाल ॥ केशव करणी अघटित लीला नारायण तो कसा ॥
जयाचा सकल जनावर ठसा ॥

दिनानाथ द्वारकाधिश साह्य जरी तरी कायक न करी । भक्तास्तव प्रगट झाले पांडव विचार मग करती ते आपुले ठाईं । बेत करून भगवान बोलले मी आधीं करितों शिष्टाई । आले हस्तनापुरास तेव्हां तेथें क्षीरसिंधूचे जावाई । शत बंधु समवेत आडवा दुर्योधन आला पाईं । बहु सन्मानें घेऊन गेले पुजियले आसनावरी । दुर्योधनाशीं जवळ बैसवून मग विचार करतात हरी ॥ ध्रु० ॥ दिनानाथ द्वारकाधिश साह्य जरी तरी कायक न करी । भक्तास्तव जो करुणावत्सल युगायुगीं अवतार धरी ॥ १ ॥ पांडव आणि तुम्ही बंधु असतां सर्व राज्य त्यांचें घ्यावें । तेरा वर्षं क्लेश भोगिले

म्हणून मजला पडलें यावें । जें झालें तें बरेंच झालें आतां तरी घेऊनी यावें । समाधान धर्माचें करून हो अर्ध राज्य त्यांचें द्यावें । कलह उभयतांमधीं नसावा हेंच सांगणें सर्वोपरी । एक विचारें तुम्हीं असावें राजनीतीची युक्ति बरी ॥ ५ ॥ दिनानाथ द्वारकाधीश साह्य जरी तरी कायक न करी । भक्तास्तव जो करुणावत्सल युगायुगीं अवतार धरी ॥ २ ॥ म्हणे दुर्योधन काय बोलतां योग्य नव्हे हें आपणाला । विचार चित्तीं नाहीं पाहिला शिष्टाई करण्यास आला । कमी दो महिन्यांत वळखलें फिरून जा वनवासाला । तेरा वर्षानंतर या मग अर्धराज्य मागायाला । अधिक मास हरीनें पांच काढून दोन मास घातले भरी । दोन मास अधिक वर फाजील असतां कारे असें बोलाल तरी ॥ ३ ॥ राज्यमदें दुर्योधन बोले अजापुत्र माजला जसा । सुयाग्रीं मृत्तिका नेदी युद्धावांचुन कृतनिश्चय असा । हरी म्हणे गमवाल सर्व हें फार सावधगिरीनें असा । अर्जुनहस्तें वधून हिरावून घेईन राज्य मग रडत बसा । ऐसें बोलुन आले कविराय म्हणे कोप कौरवावरी । येथून आतां पुढें लढाई जुंपली अंधसुत मारतील समरीं ॥ ४ ॥ दिनानाथ द्वारकाधिश साह्य जरी तरी कायक न करी । भक्तास्तव जो करुणावत्सल युगायुगीं अवतार धरी ॥ ४ ॥

# लावणी १७ वी.

चाल ॥ या विषयाचे पाई बुडाले कैक लक्षापती ॥ खंडीमध्यें तूं एक पारती ॥

व्यास भारतीं कथन मांडती पांडवकौरववीर । पार्थरथीं सारथी यदुवीर ॥ ध्रु० ॥ कुरुक्षेत्राचे ठायीं लढाया युद्धसमयीं म्हणऊन । महा महा वीर उभे येऊन । सात क्षोणी पांडव कौरव

आकरा क्षोणी जमऊन । दोन्ही दळें सिद्ध होऊन । अठरा क्षोणी म्हणती परी एकाचे एक ऐकून । कुणी न पाहती शोधून । काय बोल ग्रंथाला वाचिक अर्थ काढिना नीर । पदार्थी काय फिरून परवीबर ।। १ ।। भीष्म शंतनुपुत्र उभा रणांगणीं प्रळयानळ । दुसरा पार्थ प्रतापी बळ । बाणांचा मंडप आकाशीं रविचा रथ आडकळ । आसन इंद्राचें डळमळ । एकच गर्दी कडकड उसळली मिळाली दोन्ही दळें । मांडली हातघाई तुंबळ । वीर विरास भिडती उडती चेंडूसारखीं शिरें । रक्तलोहांत वाहती कुंजर ।। २ ।। अठरा दिवसांमधीं समाप्त झालें रणकंदन । जसें [ ग बाई ] बंगाली दृष्टबंधन । महा महा वीर मेले शेवटीं वधिला दुर्योधन । आटपलें राज्याचें साधन । आटलीं दोन्ही दळें त्यांत राहिले सप्तशंदन पांडव कृपा गुरुनंदन । अश्वमेध मग केला जिकडे तिकडे झालें स्थीर । पटीं बैसविला युधिष्ठिर ।। ३ ।। दोन्ही दळें किती क्षोणी होत्या याची चौकशी करा । शोधुनिया तरी लावावा बरा । गजरथ घोडे कुंजर वीर गणती पायदळाची धरा । किती त्याखालीं आटली धरा । किती कोश गज तसू एकांतर बोलावें उत्तरा । आळस कविराया करूं नये जरा । कविराय गुणी करीत कवन हें नाथ कृपेचा धीर । शास्त्रसंमत अर्थाचें तीर ।। ४ ।। व्यास० ।।

# लावणी १८ वी. संध्येवर.

चाल ।। दिनानाथ द्वारकाधीश साह्य जरी तरी काय न करी ।।

केशवकरणी अद्भुत लीला नारायण तो कसा तयाचा सकल जनावर ठसा । माधवमहिमा अगाध गोडी गोविंदाच्या रसा पीत जा जीव होइल थंडसा । विष्णू म्हणतां विकल्प जाती मधुसूदनानें

कसा काढिला मंथनसमयीं जसा । वेश धरूनि कापट्य मोहिनी भाग करुनि महिनिमा गायिल्या उद्धरतील आधमा ॥ १ ॥ त्रिविक्रमानें त्रिताप हरिले भक्तदोष सर्वहि वामनें दान घेतली मही । श्रीधर सत्ता असत्य हरती दुष्टाचें सर्वही वंदिति हृषीकेशाचारही । पद्मनाभें धरिले तेथुनि जाले देव ब्रह्महीं कीं दामोदरें चोरिलें दहीं । संकर्षण म्हणतां षड्रिपु नाशातें पावती । शरण जा वासुदेवाप्रती । प्रद्युम्नाचा करितां धांवा गजेंद्र मोक्षाप्रती । अनिरुद्धानें वर्णिली श्रुती । क्षीरसागरीं पुरुषोत्तम हा दाता लक्ष्मीपती स्मरणें अधोक्षजे आकृती । गाती मुनिजन नारद तुंबर वसिष्ठादि गौतमा गाइल्या उद्धरती आधमा ॥ २॥ प्रल्हादासाठीं नरहरि स्तंभीं प्रगटला । अच्युतें कालयवन मर्दिला । जनार्दनाची अघटित लीला कीर्तन ऐकूं चला उपेंद्रा शरण म्हणविती भला । हरिहर म्हणतां त्रिवार वाचें सर्व दोष हरियला । गोकुळीं कृष्णनाथ खेळला । रामलक्ष्मण यांचीं नांवें निस्तारती हे श्रमा । गाइल्या उद्धरती आधमा ॥ ६ ॥ अनंत भगवंताचीं नांवें त्यांतुनि हे उत्तमा । गाइल्या उद्धरति आधमा ॥४॥

रामजोशास तुळजापुरास ७२५ रुपये वर्षासन होतें. म्हणून तेथें गेले असतां दीड महिना मुक्काम होऊन कर्ज झालें व कीर्तनाची बिदागी १० रुपये झाली त्या वेळीं पुढील श्लोक कथेंत केला. तो असा:—

येथें येउनि आज दीड महिना पासष्ट मुद्रा पहा ॥
झाली शुद्ध उचापत प्रभुवरें केली बिदागी दहा ॥
येथें वार्षिक पंचवीस मजला देवूनियां तोडितो ॥
दादा तीस दिल्या शिवाय मजला वाणी कसा सोडितो ॥ १ ॥

# लावणी १९ वी.

## गिरीच्या व्यंकटेशावर.

चाल ॥ याविषयाचे पाई बुडाले कैक लक्षापती ॥ खंडीमधीं तूं एक पावरती ॥

शेषाचलकृतनिवास हा नतभावास गोष्पद करी । न संकट व्यंकटरमणावरी ॥ ध्रु० ॥ तीन कोस हा पर्वत उंची लांबी तिस योजनें । तयावरि नांदे भगवज्जन ॥ शारदी यवन रात्र रथोत्सव नानाविध अर्चना । लोभवी विविध जनांच्या मना ॥ श्रीनिवास-पद भ ान वासवपदही । उणें पाहा तो भक्तिरसाच्या गुणें । हातीराम भैरागि याचें तप वर्णावें कुणें । पहा हो ब्रह्मचि बालकपणें ॥ चाल ॥ हा व्यंकटपति या गिरिवरि अति शोभला । या पादपंकज अनंत जन लोभला । श्रीरामानुज या देवबळें लाधला ॥ याहुनि जाग्रत दुसरें दैवत नाहीं पृथ्वीवरी । येक हा निजजनदुरिता हरी ॥ १ ॥ श्रीमत्पुलब्धें भीषक निर्मलजलसंगती । जवाब्धीं मृगमद केशर किती । गिरिवरि हरिकृत मज्जन मित धांवती । खरा हा त्रिभु-वनि लक्ष्मीपती । चिंच तिखट नैवेद्य तिखट तेलकट परि सुर झड घालिती । सुधेचे रस त्यापुढें लाजती । तीर्थ श्रीपदरेणु मनोहर तिलक जयाचे रती । नित्य ते नर सुकृति लाहति ॥ चाल ॥ लख-लखाट सुगंध दीपावली । कर्पूर उजळतो असा न जगतींतळीं ॥ तो ध्वजारोहणा नंदन कनकाचळीं । पुष्करणीचें स्नान करुनिया सेवा मंडप दुरी पहावा शिरोनि भुवनांतरीं ॥ शेषाचल ॥ २ ॥ तेज पहाया धरुनि हिमालय दुर्गम देशांतुनी येतसे अनंत जन धाऊनी । सुभक्त वत्सरु देउळगांवीं राजाचे राहुनी । घेतसे पूजा बहु मानुनी ॥ कांहीं काणगी नको कराया कानगिला घेउनी ।

पावती देतो प्रभु लेहुनी । पृथ्वीपतिचा वल्लभ तैसा पुत्र देतसे गुणी इथे हे नवसाला पाउनी ॥ चाल ॥ अनंत सैनीं भक्ति धरिला जन जसा । हा सकल मनोरथ सफल पावतो तसा । भक्तासी उद्धरि हा तरि याचा ठसा । भक्ति मुक्ति सुख शक्ति संपदा याच्या पायीं खरी । धरुन ये कविरायाला दुरी । शेषाचल ॥ ३ ॥

# लावणी २० वी.

## बारशीच्या भगवंतावर.

चाल ॥ या विषयाचे पाई बुडाले कैक लक्षापती ॥ खंडीमधीं तूं एक पावर तो ।

दाट साधुचा हाट भागवत पाठ रुचिर फारशी । अशी हे अद्भुत जगीं बारशी । संत शांत गुणवंत पहा भगवंत नांदतो हरी मिराशी जागा याची खरी । खुंटविली वैकुंठपेठ ही कंठितसे भूवरी बारशी वेतन याची खरी । चार दिवस बाजार तेथीचा वार करुनि लौकरी । आला हो बाइल पाठीवरी । मला वाटतें थेट हा आला पळुनिया घरीं । वोढतिल तेथें देणेंकरी ॥ हाजरा बाजरा घेऊनि आला घरीं नाहीं सुपटोपली वैकुंठि तागडी । श्री लपउनि मागें पांघरतो घोंगडी । जनु वसन मिळेना कुसुमाची आंगडी । दगाबाज हा बगा देतसे दगा मिसळ सारशी आम्हाला पाहुनि बिन-बारशी ॥ १ ॥ तिथें बुडाविलें इथें आला तरि जिथें तिथें हा तसा । पहाहो खटला केला कसा ॥ शर्वादिक दुर्वास गर्विला गर्वी देउनि पिसा । अंबऋषीस दिला भरंवसा ॥ तीर्थपारणार्थ मिसेहो व्यर्थ गांजि राजसा । मुनेचे पोटिं सुदर्शनठसा ॥ शाप देउनी ताप सोसिले आपण गर्भि वसा । दहादा काय चांगले वसा । हें क्षेत्र

बारशी त्या दिवसापासुनि । काय केलें हो याणें पंकनाम नासुनी । जें मना येईल तें प्रभु करितो हासुनी । इथें काय चालतें उद्दंड मुख त्रासुनी । राय सुराचा काय न करि हा पाय मात्र सारसी । आम्हा भ्रमरासी गम्य फारशी ।। २ ।। दाट साधुचा । तिथें बुडविलें इथें आला तरी । बस्वलिंग हा जंगम याणें संगमसुखिं लाविला । तयाचा सेवक हा म्हणविला । भक्तियोग सुविरक्त जगाला मुक्तिमार्ग दाविला । उत्तरेश्वरीं मठ बांधुनि दिधला । गुरुवर्या ज्या मर्यादेनें निर्याणीं स्थापिला । मठावरी पुत्र योग्य जाहला । नाम जया जयराम सुखाचें धाम रसिक साधुला । करुनि हा भगवंतीं ठेविला ।। चाल ।। या पुरुषवरानें अमरसभा जिंकिली । जें धर्मतत्त्व तें यांस गवसलीं किली । किती कूप वापिका देवालयें झांकिलीं । परउपकाराची सीमा करुनि टाकिली । अविरत पदनत कविरायाच्या न विसरावा रसीं । म्हणुनि दे सुत भैरव आरसी । दाट साधुचा ।। ३ ।।

# लावणी २१ वी.

## ( पंढरपुर क्षेत्रवर्णन. )

**चाल ।। साकी ।।** दुसरी चाल ।। नरदेहामधीं० ।।

क्षितातळीं इज समान नाहीं उमामहेश्वर पुरी ।। पुरी पडेना काशी मग इतर दासी न कोण असी हो पंढरी ।। ध्रु० ।। पांडुरंग जगदंतरंग जीमाजिं रंगला धणी ।। पार्श्वि रमारखुमाई पृष्ठतो राही जशी सुखाची खणी ।। शेषशायन पट्टवेश निकट व्यंकटेश गणपति गुणी । उभा दक्षिणद्वारीं अतिभारी विठ्ठलविभुचे गुणगण गणी । बाळकृष्ण गोपाळ रांगतां व्याघ्रमुकुटमणि फणी । अहा तशिच ती भामा, अतिवामा विभूच्या नायिकांत हिरकणी ।

द्वार धरुनि सरदार उभा केदारलिंग अंगणीं । रंगशिळेवरी गाती किति नाचति गरुडस्तंभा कवटाळुनी । उभारुनि भुज उभा-मरुत्सुत ऋणी । अहा गरुडपाराची किति शोभा त्याची वर्णावी तरि कुणीं ॥ चा० ॥ हा मंडप नोहे विमान वर थाटला । भूवैकुंठींचा गगनानें चाटला । ज्यामध्यें सदोदित भगवज्जन दाटला । कीं भवार्णवींचें गलबत मज वाटला । कामादिक जळ-चर जमाव चट फाटला । क्षण यांमधिं शिरतां वाटे भव आटला । मग सहजचि उतरुनि पांडुरंग भेटला ॥ चाल ॥ बऱ्या दिसति ओवऱ्या ऋषींच्या दऱ्या दुबाजूंवरी । सदा घोष नामाचा गुण घेती कितिक अंतरीं । क्षमातळीं० ॥ १ ॥ महाद्वार तुम्हीं पहा तरिच जन्म हा सफळ मानवी । वरी चौघडा वाजे अति साजे काहिल मढविली नवी । बळी तसा पदतळीं घातला मुळीं हरिस लोभवी । नको कथा वाग्याची त्या ग्या ( नाग्याची ) यापरि विश्व शोभवी। पुढें समाधिंत दडे पदांबुजिं पडे न चोखा भवीं । असो महार जातिचा यातिना हरिचा भागवतोत्तम कवी । रुका वेंचिता दुकान जव-ळीच बुका माळ लाघवी । देति माळिणी माळी चित्तिं सुक्या नरिंझ आघवी । अशा दुरस्ता विशाळ माड्या तशांत यदुकुळ-रवी । उभा नदीच्या कांठीं जन येती भेटी वकीलसा पालवी । जे महार्णवाची जगदद्भुत कामिनी । ती भीमरथी या स्थळीं दक्षिण-गामिनी । श्रीशंकरजीची शिरोवंद्य स्वामिणी । पृथ्वीच्या जाणे मध्यदेशीं हा मणी । जैं कार्तिकमासीं शुक्लपक्षयामिनी । पुलिनांत पताका जैशा सौदामिनी । आनंद सांवता माळी कबिर मेमिणी । लोहदंड त्या क्षेत्र पंढरी पुंडरीक चौधरी । हा मुख्य येथिंचा राणा जाणा ज्यास्तव उभा अजुनि विटेवरी । क्षमातळीं ॥ इ० ॥ २ ॥

शीळामूर्ति रघुकुळाधीश पदतळा जवळ ती सती । उभी अहल्याबाई करी घाई जणो पुनरपी रज याचिती । पुढें दक्षिणेकडे प्रदक्षण घडे क्षेत्र सव्य ती । दिव्य चमकती फरशी सज्जन चरणरजें उजळती । लोट घेति पोट खरडिती ओठ भजनिं हालविती । गळां तुळशीच्या माळा सवें पाळा गोपाळांच्या किती नाचती । नवे भागवतथवे प्रदक्षिणसवें कितीक धांवती । पंगु लागती रांगूं किती सांगूं अंधळे भुजा भुज कवटाळिती । रथा निरखिती कथा करिति कुणि पथांत मठ तरी किती । सव्य रोकडा घेतां मग पुढती उद्धव चिद्घन आलिंगिति । पुढें घाट नदीचा भीमरथी वाहती । किति तीर्थवंदनें करिती किति नाहती । किति पुंडरिकाचा समारंभ पाहती । किति साधुपदांबुजिं निजमस्तक वाहती । किति शांत दांत वेदांत पढुन राहती । किति तपास ऋतुसंताप समुळ साहती । मग मुक्ति तयांला गळां पडुनि पाहती । संत कथूं किति महंत नगरी अनंत सुखदा करी । काय कथेचा धारा तो सारा श्रीमत्खासगिच्या मंदिरीं । क्षमातळीं ॥ २ ॥ घरोघरीं रस परोपरी किति बरोबरीचे गडी । साधु साधिति विद्या किति अध्यापक किति शिष्यांच्या सांगडी । दाट साधुंचा हाट फुटेना वाट वाटतां गडी । ताल सुरांची करति किति भरती विठ्ठल देति बुक्क्यांची पुडी । फळांत अथवा जळांत तुळसी-दळांत वशता खडी । अशी माउली कैंची भक्तांशीं न वैची ताजिम देते खडी । तुक्या वाणगट तक्या मारि परी मुक्यापरी दे दडी । मिराबाइचा प्याला नाम्याला भ्याला प्याला त्याशी कढी । भाव निराखितो राव सुरांचा हाव घालितो उडी । पुढें ठेवा कनवाळूचा कनवाळू विठ्ठल म्हणतो साखर खडी । हा भक्तासाठीं अवतरला या कलीं । ती वैकुंठींची पेठ बोस हाकिली ।

ही अपरा द्वारावती उभी ठाकली । मंडळी व्रजांतिल कोठें नच फांकली । वसुदेव देवकी नंदादिक झांकलीं । आहेत कोणत्या-रूपें कोण आकळी । पंढरी सुखाच्या नरदेहें वांकली । मला वाटतें बलानुज द्विजकुलाधीश हा हरी । येती राउळीं अवघे ते बडवे यांचे गोप गोपिका घरीं । क्षमातळीं० ॥ ४ ॥ संत खेळती वसंत ऋतूंत भगवंत घेतसे हवा । शेज करिती कुसुमा-चीं तळीं माचा वरता चंदनी मंडप नवा । दृष्टि सुखाची सृष्टि देखतां दृष्टि भरुनि जेधवां । तदा आषाढी यात्रा या जनमात्रा सुख तें पार नसें उत्सवा । तटा धरूनि घनघटा उदकमय पटा पसरती शिवा । पुंडरिकावर नेवर्णवे महिमा मति तरी किति मानवा । तशी पुढती कुणी दिशीं कार्तिक निशी मग जन बोल-वा । फार वदावें काई ही बाई वैकुंठींचा मालवी दिवा । नदी खडक त्यामधिं करितसे गदेश मुरलीरवा । वेणु नाद तो समजा मनिं उमजा गोपद विष्णुपदाला स्तवा । किति नारदमुनिला कवटाळिति बाहुनिं । गोपाळपुरीं मग दधिकाला लाहुनि । किति हर्षति पद्मालयतीर्थीं नाहुनि । तो व्यासाश्रम दर्शनानंद त्याहुनि । किति संध्यावळिमध्यें तप करिती राहुनि । अशिं किती तीर्थें कथूं तुम्हां शपथ वाहुनी । पृथ्वींत पंढरी एकचि ध्या पाहुनी । पायीं धरिल कविराय दुजा अशी काय लावणी करी । माय कुणाची व्याली या गगनाखालीं कविता सोलापुरी ॥ ५ ॥ क्ष० ॥

# प्रकरण दुसरें.

## उपदेशपर लावण्या.

## लावणी २२ वी.

**चाल** ॥ हरीची बहीण म्हणे सुभद्रा रुक्मिणी वहिनी दया करा ।
दादाला तुम्ही कळऊन वळऊन अर्जुनजीचा शोध करा ॥

॥ राग सारंग ॥

नरदेहामधें येऊन गड्या त्वां हित केलें नाहीं । दारधनाचा लोभ सोडशी तर साधल तुज काहीं ॥ धृ० ॥ हरिची माया अगाध जेथें ब्रह्मादिक फसले । तूं तर मानवतनूचें पामर त्यांतहि कामादिक वसले । नाना प्रकारचे विषय मनामधें येऊनियां घुसले । काय तुझा तरी पाड गाधिज पाराशरादिक तळीं बसले । या मदनावरी शुकासारखे विरळे कुणी रुसले । बाकी नर या भवाब्धिमध्यें लोळती किती थकले । यासाठीं बा तुला सांगतो सावध मनीं राही । रात्रंदिवस उदकाहुनि चंचळ आयू जात पाहीं ॥ नरदेहामधें येऊन गड्या त्वां हित केलें नाहीं ॥ १ ॥ तूं म्हणसी या संसारामध्यें सुख पाहीन मोठें । परंतु जितके पाहसिल तितकें दृश्य सर्व खोटें । अंतिं यमाच्या हतांत गेल्यावरी तूं कुणीकडे तनु कोठें ? । तूं म्हणसि मी चिरायु परि तो काळ मोजी बोटें । ना आइकलें तरी जगतीतळिं या विषमविषाची खिर घोटे । विषयवासना धरशील परि हे नागवितिल साही । तुझिं इंद्रिये तुला बाधक होतिल परिणामी

दाही ॥ २ ॥ बाळपणामधिं तनु घालविली खेळूनिया सारी । तरुणपणामध्यें वहार माजला रांड झाली प्यारी । ते तर जातिल निघून उद्यां गड्या दिवस पहा चारी । मग घालविसी बाहेर पैसा घरची झाली म्हातारी । तेही गेले मग कोण पुसते. घरांत दमडी ना ज्वारी । रांड बिघडली फजिती झाली देणेकरी द्वारीं । अशा संकटीं कोण सोडविल तुझ्या मनाला ग्वाही ॥ ३ ॥ वृद्धपणामधीं पुत्रादिक तुज म्हणतील कीं निबरा । आणिकही वाचशिल कुठवर करुन जनाच्या किती कबरा । तुझ्या सुना तुज म्हणतां मेला म्हातारा हा बहू लुबरा । उगाच पडे खाटेवर तुजला कशास व्हाव्या घरखबरा । शक्तिरहित तूं रांड घरांतुनि गळा करुनि जबरा । दरडाविल मग सोसून पडसील त्यांचा सांभाळुनि उंबरा । जें झालें तें बरेंच झालें अजुनि तूं सावध होई । करुनिया मन सुमन शीघ्र कविराया पदीं वाही ॥ ४ ॥

## लावणी २३ वी.

**चाल** ॥ पती गेले हो गेले माझे काठेवाडी ।

गिरनार अबूच्या पहाडीं ॥

कारे मनीं माधवाचे चरण धराना । किती कथितो हित कांहीं कराना ॥ ध्रु० ॥ नरतनु लाधली हे सुकृतभरानें । हरवितां आपुल्याचि करानें । चंचळ मन नोव्हे स्थित निकरानें । हे वदती श्रुतिशास्त्र पुराणें । झडकरी सांभाळावें हित चतुरानें । व्यर्थ कसे भ्रमता तिमिरानें । अंत:करणीं या मदनशरानें । भंगूं नये परमार्थपरानें । सुरपती मोहिले हो विषयीं गरानें । शाप दिल्हा मुनीच्या

कुमरानें । सुतदारा दिले बहु आदरानें । वंचती ते नुमजावे खरानें ।
त्या भवसिंधुच्या लहरी करांना । हरिगुण कीर्तनीं रंग भराना ॥ १ ॥
भगवद्भजकाचा संग धरावा । मग तच्चरणीं निज देह पडावा ।
जो तो नर भवामाजीं बुडावा, मग कधींसा परमार्थ रडावा ।
श्रीगुरुचरणीं नमुनी खडावा । हरी हरनाम सुमंत्र पढावा ।
हें न करावे जेणें मदन चिडावा । सत्पथ हा तरी का बिघडावा ।
अरे तुमचा डोळा कधीं उघडावा । साधक हो मनीं भाव जडावा ।
कां भावपाशीं हा देह पिडावा । भव भजनें सगळाची मढावा ।
हरिगुणगायकांच्या हृदयीं शिरांना । सुखकर हा कविराय वराना ॥ २ ॥

# लावणी २४ वी.

चाल ॥ गणराया याहो वेगी ॥ व्हा साह्य मंगला ॥

मी अनन्य शरण आलों ॥ विघ्नातें घालवा ॥

येऊनिया नरजन्माशीं । कांहीं तरी जाण बारे । ध्रु० ॥ रक्षुनियां धनसुतदारा । निजकरणें शोषिलीं । भवतालीं मिळउनि बारा । हीं चोरें पोषिलीं । न देतील तुजला थारा । त्वां मोठीं तोषिलीं । किती सांगू मानवा रे । येऊनिया० ॥ १ ॥ संसारची सारा खोटा । कां होसी बावरा । या उदमा येईल तोटा । बा कारे हावरा । काळाचा बसल्या सोटा । मग म्हणशील आंवरा । दुर्मतिला खाण बारे ॥ येऊनिया० ॥ २ ॥ तूं म्हणशी माझी रामा । सुकुमारी गोरटी । परिणामीं तुझीया कामा । येईल काय चोरटी । बंधुनियां कुबडीदामा । घेतील हीं पोरटीं । कविराया मानवारे । येऊनिया नरजन्माशीं कांहीं तरी जाण बारे ॥ ३ ॥

# लावणी २५ वी.

चाल ॥ ब्राम्हणी राज्य जोरदार घोड्यावर स्वार होते शिपाई ॥
जबर सद्दी कैकांनीं पाहिली शत्रु ठेविले नाहीं ॥

झाला पाहा हो मानव की—सोडा धना कामिनी—भक्ति ही जागा बरी पाई । ध्रु ॥ भाग्याच्या पडतां भरीं—आधीं अंतरी कासयाला तरसी । विषयाची न तुटे आशा—वाटतें यशा—घालावया करसी । तारुण्य नटशी किती दिवसाची रती—मानवा कां मरशीं । अरे कांहीं जाण व्हा झाला पाहा हो मानव की० ॥ १ ॥ दैवाचें मान जनु त्यांतही तनु साधनाला फुटकी । मोहानें धनकामिनी आणिता मनीं भावना ही लटकी । वंदाया पुरुषोत्तमा मानसीं रमा जाणून घ्या कुटकी । मदनाचे संगती भाला पहा हो मानव की० ॥ २ ॥ या रामा अति वावड्या मानिता वड्या साकरेच्या स्वमनीं । होती भवसंगमीं वाऊगे श्रमी कल्पनेच्या भ्रमणी । संसारीं कविराया हा वाटतो पहा वासनेच्या दमनी । मजपाशीं गुंतला । झाला पहा हो मानव की० ॥ ३ ॥

# लावणी २६ वी.

चाल ॥ शामकर्ण जुपावे रथी होऊन सारथी ॥
माधवाशी राधा लाडे लाडे बोलती ॥

तनु दारोदार भरणाच्या भरी गेली ॥ ध्रु० ॥ किती रांडाच्या प्रेमाला भाळलासी । जन कामाच्या बाणानें पडे फाशीं । धनधामाच्या लोभानें लया जाशी । त्वां नरजन्मीं आपुली सोय न केली। तनु दारोदार भरणाच्या भरी गेली ॥ १ ॥ सुख भोगाया लागसी भवाच्या पाठी । हित नोहे बा ही खरी विषाची वाटी । सावध

करितो मानवा तुला यासाठीं । दुर्मोहानें अरे कशी तुझी मती नेली । तनु दारोदार भरणाच्या भरीं गेली ॥ २ ॥ मन सुमन करुनिया हरीच्या पदीं वाही । नाहीं तरी हे बा तुला बुडवितील साही । आपुल्या जागा तूं बरें विचारून पाही । कविरायाला आवड भक्ति रंगेली । तनु दारोदार भरणाच्या भरी गेली ॥ ३ ॥

# लावणी २७ वी.

चाल—रुंद छातीवर बुंद गेंद जणू गुलाब बहारामधी फुलती ॥

वसंतकाळीं कळे कोवळे तसे तुझे जोबन खुलती ॥ प्रभाकर ॥

संसार कोणाचा गड्या काय खटपट करशील बा ही ॥ ध्रु० ॥ हा घोर तुटेना तुझा साधूचा कधीं संगम धरशीरे । मानवा नवाजिक तनु मिळाली परी विफळा करिशीरे । रांडेच्या नादीं भरून कोणाची किती पोटें भरशीरे । अविचार करूनिया असा जरासा तरी लाजसी कांहीं । संसार कोणाचा गड्या काय खटपट करशील बा ही ॥ १ ॥ हा भार धरुनि शिरीं प्रपंचामधें बुडशील कैसा रे । धनिकाच्या मागें पुढं फिरवुनीया किती मिळविशी पैसा रे । अजुन कळेना कसा भास हा मृगजळीचा जैसा रे । या दारसुनांच्या भरी भरूनिया सुख तुजला नाहीं । संसार कोणांचा गड्या काय खटपट करशील बा ही ॥ २ ॥ तूं कोण कोणाचा ? जरा कोणाची ? नरतनु जाती रे । हा प्राण करूनीया पिसा वयाची किती करशील मातीरे । बा काय तुला भरंवसा कोणाच्या तरी नाहीं कांहीं हातीं रे । कविराय करून घे सखा सुखाचा निधी होशील पाही । संसार कोणाचा गड्या० ॥ ३ ॥

## लावणी २८ वी.

**चाल**—॥ हा फंदी फाकडा मज सांपडला गुंडा ॥

चालूं दे प्रीत शेवटा देवा मार्तंडा ॥

हरिपद वंदा मग धंदा दुजा गोडरे ॥ ध्रु० ॥ दो दिवसाची तनु साची धरा लाज रे । निजहित साधा भवबाधा पळो आजरे । धनसुतदारा मुडदारा करि वाजरे । मन हें भुलतें नको भलतें करूं काजरे । मग चुकविल पाळी वनमाळी महाराजरे । जन भोंदावया बांधावा किती साजरे ॥ चाल ॥ असुनी डोळेझांक करावे । रांडा पेरें किती भरावे । काळमुखामधें तनु घसरावें । मग यदुपतीला बळें विसरावें । नरतनु तुमची जाईल व्यर्थचि फटफट मतिमंदा । सुखकंदा मनिं जोडरे । हरी० ॥ १ ॥ उंच जराच्या पदराचा किती झोकरे । किती धगडीची पगडीची पुरे नो रे । नौबदखाना समजाना दुजा शोकरे । कीर्तनाचा भजनाचा तुम्हा पोकरे । हातर टाळा पर न विटाळा तुम्ही लोकरे । करितां जागा नवागा मग पाठी फोंकरे ॥ चाल ॥ नरतनु तुमची काय शिराणी । पाहतां ही तर निपट विराणी । कां भुलला मति करूनि दिवाणी । कोणी निजहित मानस नाणी । कविरायाची लटकी न वाणी । बळकट वंद्य करी नंदात्मजिंरे । हरी० ॥ २ ॥

## लावणी २९ वी.

**चाल**—॥ पति गेले हो गेले काठेवाडी । गिरनार अबूच्या पहाडी ॥

कुटवर हा भव पुरे पुरेरे । नाहीं यांत किमपि सौख्यरे । सांगून चुकलों परंतु न तुझी खटपट सरे सरेरे । ध्रु० ॥ ही तनु

तुजला काय जिरे जिरेरे । हे विषय दिसती साजिरे । हे मदमत्त गजरथवाजिरे । आले असती अजीरे । सावध हो मनीं विचार न करिसी यांतील कांहीं तरी उरे उरे ॥ १ ॥ जेथील धन तेथें विरे विरे । समजुत कधीं व्हावीरे । अशी पुनः तनु याविरे । कांहीं विरक्ति चित्तीं धरावीरे । यासाठीं ही वळख करुनि घे । बाबा जीव जेणें उधरेधरे ॥ २ ॥ कामादिक रिपु खरे खरेरे । नच यास सलग राखरे । जाहाले केश सकळ वाखरे । कांहीं भजनसुधा चाखरे । यासाठीं कविराय म्हणतसे तार भवार्णव हरे हरे ॥ ३ ॥

# लावणी ३० वी.

कारे हें कळेना तुशी । हरीची अगाध माया ॥ ध्रु० ॥

आला पेच माथा तुझ्या । आतां कधीं जाण होसी । रांडा पोरांसाठीं वेड्या । अशी तनु घालविशी । पुढें काय व्हावी तुझी गति निरयासी जासी । अरे बळ धरोनी भवासी झोंबसी काय वायां । कारे हे कळेना तुशी । हरीची अगाध माया ॥ १ ॥ आतां किती बोलूं तुशीं । तुझी तुला सोय नाहीं । मनुजा तनु थोडी किरे । पहा अवकाश कांहीं । तुझा कोण साथी आहे । बरा विचारूनि पाहीं । आशा कां लोभी जनांच्या । लागसी नादीं वाया ॥ २ ॥ तुझी बुद्धि थोडी बापा । तुला झाली भ्रांति मोठी । पडूं नको पेचीं याच्या । त्रिगुणाची फार खोटी । इच्या पुढें कांहीं नोहे । ब्रम्हादिकांच्याही कोटि । अटोपिशील काशानें कवि-रायाच्या कुळा या ॥ ३ ॥

# लावणी ३१ वी.

**चाल** ॥ रति गेले हो गेले काठेवाडी ॥ गिरनार अबूच्या पहाडी ॥

कोणाची रमा हे मानवा रे भुललाशी ॥ ध्रु० ॥ अनुदिनी सांगतां तुज नुमजावें । हरिपद सेवनी वपु हें भिजावें । कांहीं तरी आज वेडया हित समजावें । असूनि तूं कैसा भरी भरलासी । कोणाची रमा हे० ॥ १ ॥ टिळा टोपी गोमुखी देवांचें । गवाळें खालींवर आसनाचे घालुनी चवळें । धनिकांचे भोंदुनिया काढिलें दिवाळें । कधीं तरी सांग कांहीं उरी उरलासी । कोणा० ॥ २ ॥ कोणाची हे दासदासी कोणाची ही जाया । कोणाचीं हीं पोरेबाळें कोणाची हे काया । प्रपंचाची ओढ सारी वाया हें न अणशी ॥ ३ ॥

# लावणी ३२ वी.

**चाल** ॥ मल्हार मल्हार वाचे घोका ॥ मग पाऊल टाका ॥

मंदा किती करशिल हा घरधंदा । विसरून सुखकंदा ॥ ध्रु० ॥ सारा संसृतीचा हाच पसारा । सुत कैंची दारा । पारावारांतिल जैशा गारा । घेऊनी विचारा । नारायणारे हा विश्वचितारा । भज जगदाधारा । कुंदा शंकुनि रसन मिलिंदा । करशील विषयछंदा ॥ १ ॥ रांडा मोहुनि तुज करतील बंडा । रचुनिया कुभांडा । चांडाळा बुडविसील सुकृतकरंडा । हे अपयशपिंडा । गुंडा म्हणविशी यमाच्या दंडा । कां घेसि वितंडा । सुंदा कां नेणसी ह्या उपसुंदा । किती विषयीं धुंदा ॥ २ ॥ त्रापा कां धरसिल या भवतापा । किती जोडसी पापा । ज्या पाहुनि धरसी मन्मथकोपा । मग करिसी विलापा । चापापरि होउनि नत अनुतापा । धरि शांतिकलापा । छंदा या कृतिनें कवितानंदा । कविराय मुकुंदा ॥ ३ ॥

# लावणी ३३ वी.

चाल—दामाजींची रसद । यवन बेदरीचा ॥

बापा अति हितकर गुरुशीं भजावें । गुरु लागी भजावें ॥धृ०॥ धंदा त्याविण नसावा दुसरा । गुरु नामचा पसारा । नाहीं तरी वसल एखादा घसरा । सारा आनंद दिवाळी दसरा । गुरुपाई न विसरा । त्यांचे सेवेंतची वपु झिजवावें । गुरुलागी भजावें ॥ १ ॥ मातातातादिक गुरुला गाती । ते मुक्तीस जाती । कांहीं मग नसे कुणाचे हातीं । ही लटकी जाती । मरती गुरुवांचून लाता खाती । ते नरकामधीं प.ती । त्याला सुरवरसम पुजावें । गुरुलागी भजावे ॥ २ ॥ ऐका गुरुराज कृपेची छाया । दूर करिते माया । कैचा भवपाशची हा उकलाया । गुरुवांचुनि वाया । खोटी लेकरें कोणाची जाया । गुरुमाउली गाया । ऐसे कविराय सुमत समजावें । गुरुलागी भजावें ॥ ३ ॥

# लावणी ३४ वी. [ चार भाषेची ]

सं० प्रा०

पाहि पाहि निजभुवनम् ॥ प्रतीका बोलशी मुडदारा ॥

का० हिं०

निन्नमातना केळु दिला ॥ चल छोड पल्ला मेरा ॥

सं० प्रा०

देहि देहि पदमिदं मुरारे ॥ उचित नव्हे तुजला ॥

का० हिं०

मी परगतिणी याक्ष पकडता ॥ यंव क्यारे किने करभुला ॥

सं०　　　　　　　　　　　　　प्रा०
पाहि पाहि निजजनक यश त्वं ॥ सोडी वाट व्रजला ॥
का०　　　　　　　　　　　　　हिं०
नन पती निन मनमुणगोशी ॥ क्यंवरे तुजे किने बोला ॥
सं०　　　　　　　　　　　　　प्रा०
॥ धृ ॥ त्वं कथा विनोदं कुरुषे ॥ वेडे मूल ॥
का०　　　　　　　　　　　　　हिं०
निनतंदीगे हेळे ॥ क्यंव तुज पडगई भूल ॥
का०　　　　　　　　　　　　　हिं०
इनगडी माधव ॥ नाशिरपर डारोगी धूल ।
सं०　　　　　　　　　　　　　प्रा०
त्वदर्शनं तत्खलु ॥ उठतो मस्तक शूल ॥
सं०　　　　　　　　　　　　　प्रा०
मुंच मुंच चैलाधरमधुना ॥ नंदाच्या पोरा ॥
का०　　　　　　　　　　　　　हिं०
हिडनिन तंदिग मन्याग । पितुजन बहुत बुरा मेरा ॥ याही० ॥ १ ॥
सं०　　　　　　　　　　　　　प्रा०
तिष्ठ तिष्ठ सखि ॥ इतुकी रागानें कागे बोली ।
का०　　　　　　　　　　　　　हिं०
ना गोकुळपति निन्न म्याल; सखी सुनरी अलबेली ।
सं०　　　　　　　　　　　　　प्रा०
अंगसंगमो मया सह तव ॥ दैवदशा खुलली ॥

का० हिं०
इष्ट भालवी निज मनसा ॥ गवळण मान भरनवाली ॥ चाल
सं० प्रा०
यन्मयोदितं तत्सत्यं ॥ निजमनीं मान ॥
का० हिं०
नडी कुंजगवळगे ॥ मय तुजे नही बेमान ॥
का० हिं०
इग दया माडनिसी ॥ देख हमारी शान ॥
सं० प्रा०
किं रोषं कुरुषे ॥ मागतसे दान तुज ॥
सं० प्रा०
त्वं तु रमे मयोचिता ॥ नको भाव धरूं दुसरा ॥
का० हिं०
इष्ट मात निन्न केळु दिला ॥ सखी क्यौं उतरगया चेहरा ॥
॥ याहि० ॥ २ ॥

# लावणी ३५ वी.

## वसंत.

कुंजांत मधुप गुंजारव यमुनातटीं । होरी खेळतो हरी करुनि राधा नट आपण नटी ॥ ध्रु० ॥ लतागुच्छ सुरतरुही तुच्छ वरी रुंजती करिती मधुकरी । विमान वरी दाटल्या उतरल्या गगनीं सुरसुंदरी । सुरताल पखवाज खंजिरी मंजरींत वासरीं ।बिन अमृत कुंडली कुणी डफ सारंगिला धरी । नृत्यकृत्य तत्कारतान करताल झुंमकड्या अंतरीं । मोरचंग झांजरी पतीसंपत्यही नानापरी । रूप रम्य

राधेचें राधा वल्लभ आपण धरी । तिलोत्तमा उर्वशी मेनका रंभापरी घाबरी । फागामधीं बागांत मातला वसंत अंतःपुरीं । कवण राधिकापति कवण राधा हे न कळे खरी ॥ चाल ॥ अगे सखेग आनंद मी सांगू किती । अगे सखे० ॥ एकमेकींवर टाकीती । अगे सखे०। कुंकुम अबीर झोकिती अगे सखे० ॥ पिचकाऱ्या मुखीं माखिती ॥ अगे सखे० ॥ केशर मृगमद उडविती । या रसाचा कोण जाणता सुरनर हातवटी । होरी खेळतो हरी करुनि राधा नट आपण नटी ॥ १ ॥ श्रीहरीचें वयरूप धरूनि राधा नट नागरधणी । पीतवसन बासुरी मुगुट शिरीं तिळभर नाहीं उणी । हावभाव नृत्यांत नटाकृति भाव दाविते क्षणीं । मदनमूर्ती सावळी तनु सकुमार फार देखणी । तथै तथै तननन ननन वेणुरव किंकणी । नृत्यगीतमाधुरी हरीची जाणत कालिया फणी । गर्वरहित गंधर्व सर्व त्या वसंत संतर्पणिं । कंठीं घालिती मिठी म्हणती राधेला यदुकुलमणी । रास जग जनकास मुखामधें हास हिऱ्याची खणी । बुलाख नथ नासिकीं चमक जशी शुक्राची चांदणी ॥चाल॥ अगे सखे रंगरसामधीं यदुनायका ॥ अगे० ॥ नच ओळखिती कितीक बायका ॥ अगे० ॥ धरुनि मुरलीच्या गायका ॥ अगे०॥ सोडिती नयनसायका ॥ अगे० ॥ कुणी म्हणती हरी आयका ॥ अगे० ॥ हे मोठे कीं नवल राधिका ॥ अगे० ॥ धरी नरवर कुचतटीं । होरी खेळतो हरी करूनि राधा नट आपण नटी ॥ २ ॥ वसंतऋतु संतान कुंज ते तरुवर फुलले फुलीं । किती फिरती गोपिका किती रंगामधीं भिजल्या मुलीं । शुक पीक बक कोकिळा कामपक्षामधीं पडल्या भुली । मयुर वर नाचती दिली गति कन्यानें आपुली । कद मंद मकरंद धुंद पिचुमंद बकुळवन खुलल्या खुलीं ।

गुलाब मधु मालती मोगरा बट चंपक मखमली । मंदशीत अति सुगंध पवनासहित कुसुम लाखुली । किती रासमंडळी गुलाल ही लाल ललित पाऊली । स्त्रीवेषें हरि होरी खेळतो नवल काय गोकुळीं । अनंत कौतुक करी धरी अवतार कृष्ण माऊली । चाल ॥ अगे सखेग रासांत धूम मातली । अगे सखे० । श्रीरंगमूर्ति पातली ॥ अगे सखे० । रंगांत तळी घातली । अगे सखे० । गोपिका सकळ रातली । अगे० । ठाऊकी न किली आतुली । सत्य सत्य हे भामा रुसली । अगे० । कशी येईल शेवटीं । होरी खेळतो हरी करून राधा नट आपण नटी ॥ ३ ॥ पुरुषवेष राधा निजवेष कवटाळुनि चुंबिती । हरी म्हणुन गोपिका शुद्ध राधेला आलिंगिती ॥ अंगसंग रतिभंग दंग रंगामधीं किती लाजती । मनीं म्हणती कामिनी नव्हे माधव सुखसंगती । अष्ट नायका कृष्ण म्हणुन राधेला कवटाळिती । काय सांगु मी तरी विचित्र होरी मज भासती ॥ सारसाक्षी संसारसार कंसारी धरु धांवती । कुणी व्यजन चामरें धारिती पिचकाऱ्या चिपळ्या किती । ज्या रासामधीं गुलाबकेशरी मृगमदनदी वाहती । अशी धुम मातली कळेना कोण गाण गोपी कापती । चाल । अगे सखेग धांवत आलें तुजकडे । अगे सखे० ॥ सांगाया दुःख रोकडें । अगे० । आधींच तुझें वाकडें । अगे० । मोठें मज साकडें । अगे० । कपटरूपिणी राधा येऊनि धरील तुझी हनुवटीं । होरी खेळतो हरि करून राधा नट आपण नटी ॥ ४ ॥ रासामधीं हरि लागी समजले भामा रुसली पिशी । निजरूपातें धरी करी खटपट पट पिवळा कशी । रंगांतुनि सदनांत एकटा हरि पोहचे तिजपशीं । सचिंत पशुचे रिति तशी मंचकावरी ते मुसमुशी ॥ हळूच पद चुरूनि तिचे मांडीस देतसे उशी । उठूनि म्हणे भामिनी

सवती मजपुढें सोंग मिरविशी । त्या कपट्याचें रूप धरूनि किती रांडेला कवटाळीशी । ठकविशी । तसें मजही पाहशी कळेना सये वो मज चौकशी । ऐकुनि हरि म्हणे भोग जाहला गोष्ट करावी कशी । हात ओडुनि तिला म्हणें मी कृष्ण वृष्णीच्या कुशी । चाल । अगे सखे नको संशय धरूं फारसा । अग० । घे क्षणभरी रतीसुखरसा । अग० । करीं कंकण नको आरसा । अग० । अग सखेग भामा सुखपडे गारसा । कविरायानें यापरी नेली रासामधीं गोमटी । होरी खेळतो हरी करून राधा नट आपण नटी ॥ ५ ॥

## लावणी २६ वी.

चाल ॥ शिपाई चाकरी गेला नागपुराला तेली वाणी उदमी

दाली बांधू लागला ॥

बाई यशोदे बाल तुझा तान्हा । तुला वाटे परी नष्ट मोठा कान्हा कान्हा ॥ ध्रु० ॥ काल माझ्या घरीं शिरूनि दुध प्याला । हातीं धरीला परी जरा नाहीं भ्याला । मुल कशाचा मीती नाहीं याला । हाची झाला या गोकुळांत राणा राणा ॥ बाई० ॥ १ ॥ इवायंथा नित्न मगा भूमीदला । इष्ट पापिष्टा केळ नोडु दिला । नित्न गोकुळके भ्यंकी हाचुवला । इवा नित्न बदली तान्हा तान्हागे ॥ बाई० ॥ २ ॥ अरे शौकन सुन नंदजीके प्यारी । थारु लंगरवा माकु देत गारी । गई अबरू सवरती बिगर डारी । यही धूम मची कान्हा कान्हा ॥ बाई ॥३॥ त्वं तु मातेयं पुत्रतापी धन्या । वरंपुत्रायादृशा दंभ कन्या । कुळे नाना मी कापीर तिरंन्या । हे संत इति मातः कविरायधियो नाना नामा ॥ बाई यशोदे बाल तुझा तान्हा । तुला वाटे० ॥ ४ ॥

# लावणी ३७ वी.

**चाल** ॥ लाडे लाडे येतें येतें मनरंजना । उचलुने कडेवर कां ध्याना ॥
**चा० दु०** स्त्रीचरित्र थोर समुद्र त्यांत कोण पडियला । विरळा क्वचित त्यांत राहिला ॥

## छेकापन्हुति अलंकार.

राधा सखी संवादे छेकापन्हुति आयका । रसिक हो किती चतुर बायका ॥ ध्रु० ॥ अंबरगतपरि पयोधरातें रगडुनि पळतो दुरि । काय हा धीट म्हणावा तरी । तो नंदाचा मूल काय गे सांग कन्हया हरी । नव्हे गे मारुत मेघोदर्गी ॥ १ ॥ सासुसासरा पति यां देखत अधरामृतमाधुरी । घेतसे काय वदावें तरी । तो नंदाचा मूळ काय गे सांग कन्हया हरी । नव्हे गे हा मधुकर पंकज हारी ॥ २ ॥ पटविघटित कुचतटिही वसंतीं हळुच येऊनि उरीं । शीतल स्पर्श सुगंधित करी । तो नंदाचा मूळ काय गे सांग कन्हया हरी । नव्हे हा मलयागर चातुरी ॥ ३ ॥ सुवर्ण पाहुनि तनुवरी वंचक रात्रीं शिरतो घरीं । हात टाकितसे आंगावरी । तो नंदाचा मूल काय गे सांग कन्हया हरी । नव्हे हा दस्यु समज अंतरीं ॥ ४ ॥ सुंदर रतिजोगता मिळाला पतिही सुभगा खरी । दुजीला अशा मिळेल काय तरी । तो नंदाचा मूल कायगे सांग कन्हया हरी । नव्हे गे रतिला मन्मथ वरी ॥ ५ ॥ चाल दुसरी ॥ गुणवंत कुचावरी लोळे, अति शोभला । तो कृष्ण काय? नव्हे गे हार कळेना तुला ॥ बाई आंगमर्दनीं अति सुखकर वाटला । तो कृष्ण काय? नव्हे गे कर दूतीचा भला ॥ मज शीतळ करितो श्रमीं होऊनिया मला । तो कृष्ण काय? नव्हे गे व्यजन सुवंशातील ॥ यापरि निज संतोष वर्णिती पुसतां यदुनायका । लोपवी मुरलीच्या

गायका ॥ राधासखी संवादे छेकापन्हुति आयका । रसिक हो किती चतुर बायका ॥ १ ॥ कंठीं लपटुनी सदा असावी सुभगा गुणशालिनीं ॥ वाटतें पुष्पवती शोभिनी ॥ वृषभानूची सुता काय ती राधा लिकुच (पृथुल) स्तनी । नव्हे रे माळ आठविली मनीं ॥ १ ॥ अधर चुंबुनी वंशसंभवा लालसमधुरध्वनी । असावी मुखासी मुख लाऊनी । वृषभानूची सुता काय ती राधा लिकुच-स्तनी । नव्हे रे मुरली जगमोहिनी ॥ २ ॥ सरला ती सद्वंशा गौरा अतिशय संयोगिनी । येतसे करी धरुनी जीवनी । वृषभानूची सुता काय ती राधा लिकुचस्तनी । नव्हे रे यष्टी सहचारिणी ॥ नखक्षतानें मृदु करानें ती नवनवगुणरागिणी । धरावी हृदयीं कवटाळुनि । वृषभानूची सुता काय ती राधा लिकुचस्तनी । नव्हे रे वीणामृदुभाषिणी । विपरित आहे तनुवरी घेतां सुदशा सुख-दायिनी । लहानशी शामतनु हारिणी । वृषभानूची सुता काय ती राधा लिकुचस्तनी । नव्हेरे मस्तकीं बली भोगिनी । चाल दुसरी ॥ वांकडी दिसोपरि बहिरंतरीं निर्मला । ती काय राधिका ? नव्हे इंदुची कळा । किती मंजुळ वदती रसाळ जीचा गळा । ती काय राधिका ? नव्हे गड्या कोकिळा । जी चांगट बससी धरून रसाच्या तळा । ती काय राधिका ? नव्हे भुजंगबाळा ॥ यापरी हरी राधेला वर्णुनि पुसतां क्षण लोपवी । चतुर हा यदुकुलपंकजरवी ॥ श्रीकृष्णाची सखी संवादे छेकापन्हुति नवी । ऐकता जन्म सफळ मानवी । करी हा कविरायाहून कवि ॥ राधासखी संवादे छेका-पन्हुति आयका । रसिक हो किती चतुर बायका ॥ २ ॥

---

# लावणी ३८ वी.

**चाल** ॥ राया अंजनीच्या सुता ॥ तुम्ही वज्रशरीरी होता ॥ माहीत सर्वथा ॥ सगनभाऊ ॥

कुंजांत खेळतो कान्हा तो यशोमतीचा तान्हा । कीं गोजिरवाणा ॥ ध्रु० ॥ हे रम्य काम्यवन बाई ज्यामध्यें वसे सुखदायी । कीं भवत्या गाई । शेवती मालती काई–अति फुलमाळी का जाई । कीं चलत्या ठाई । ही एक वेणूची घाई–हा दुष्ट मलबल बाई । कीं फुंकिती शाई । तो सखा शेषतनुशाई–आरंभिली लामाई । कीं हे नवलाई । ऊठ धरूं नको तूं भोई–राहूं नये एकांतीं ठायीं । कीं सदा सुखी होई । त्याविणें नसे चतुराई–उठवी त्या सुरुचिर तान्हा । कीं होऊनि शाहाणा । कुंजात खेळतो० ॥ १ ॥ बलवी पलवी तुंगा–येऊनि मदनसुखरंगा । कीं धरती आंगा । घेरिती तदा श्रीरंगा–करऊनि दिव्य पतंगा । कीं रिचविती रंगा । होतसे कामगजदंगा–कटिहुनि ते सुटती पचंगा । कीं वेष्टिती लुंगा । वादे छननन मोरचंगा–बहुमृतरखसिंगा । कीं तालमृदंगा । सुंदरा अशा अव्यंगा–दाविती निजभ्रूभंगा । किं इच्छिती संगा । गोविंद महालठ रंगा–लाऊनि आपुल्या ध्याना करिती धिंगाणा । कुंजांत खेळतो० ॥ २ ॥ कोणत्या घालिती पिंगा–निर्लज्ज होती निःसंगा । कीं दाविती ढंगा । घालिती मिठी ऊछंगा मग करी रतिप्रसंगा । कीं धांगडाधिंगा । आकाशमार्गीं त्या नंगा देवां त्या पाहती चुंगा । कृष्णमलंगा । दैवता फार चौलंगा–संगीत गाती सारंगा । कीं झणती आभंगा । पूजिती शंभूच्या लिंगा । नाहती हाल यमुनागंगा । किरवणभूचंगा । विस्मयोत्कर्ष सारंगा । जणुं करिती धेनुच्या पाना ।

कि हालविती नाना । कुंजांत खेळतो० ॥ ३ ॥ ती मात होतसे भारी–माजली भली ही हुलरी । की नव्हे बळजोरी । त्या प्राप्त-यौवना नारी–देखुनि मधीं कंसारी । कीं झोंबती थोरी । ओतती रंगयुतझारी–भिजाविती ग तूं किशोरी । कीं त्या गुलजारी । कुच-मर्दी गोपिकाधारी–भोवलुनि गोवळ्या पोरी । कीं हळुच चुचकारी । मारत्या दार का घेरी–ओढुन प्रबळ शर मारी । कितरजन सारी । आनंदयुक्त ये लहरी–चुंबिती यादवराणा । कीं प्रिय जो प्राणा । कुंजांत खेळतो० ॥ ४ ॥ अनिवार रंग भडामारी–थकथैय थैय थैकारी । कीं नाचती गोरी । धिमिकी धिमिकी धिमभेरी–झननन झांनन झनत्कारी । किखीपोलारी । त्या नित्य संधी माझारी–कुच झेली कुंदुकाकारी । कीं कुंजविहारी । बोलती मानुनि जारी–कीं व्हाया त्यजुनी विमाना । कीं होय उगाणा । कुंजांत खेळतो० ॥ ५ ॥

# लावणी ३९ वी.

**चाल** ॥ कटाव ॥

बाई नको जाऊं यमुनातिरीं । नंदाचा नंदन हरि करितो बळजोरी, धरिल गे पदरीं । तूं नाजुक रूपसुंदरी । सुभग मंदिरीं तुझें अंतरी कळेना परी ॥ ध्रु० ॥ या वनांत चारीत धेनु । वाजवी वेणू । मलागे भुल पडली । हाक्रमाचा नुल म्हण हाटा करील पानघटा । घरीच ननगटा तो आहे नकली । कोणाचा धाक नाहीं जरा । मायबाप घरा म्हणती मुल हरामि याची बुध कळली । काल गवळ्याची एक नवी मूल या गांवीं दुपारा धरली । बाई उरांत करी धडधडा मारितो चिमखडा होईल भंडवडा मात हे

उठली । तूं आधींच रूपराजसा, म्हणे बहुदिसा मला सांपडली । गवळणीवर त्याचा सिका तयाच्या हाका वदे त्या फुका कोण जाऊं सकली ॥ चाल ॥ त्या वनांत जासिल कशी । कांहीं नित नाहीं । हाकमापाशीं तूं तरुणी सासुरवाशी । त्याला पाहुनि बावरी होशी । तो कपटि कुंजवनवासी । तो बोलुनि गोड हळुच वदनीं घर घेऊं पाहे कंसारी । परें मिळउनि करि हा तमाम जाहली सिमा भुलवली गोकुळनगरी ॥ १ ॥

# लावणी ४० वी.

चाल ॥ देव प्राधान्य उभयतांचें ॥ म्हणूनि भारजा रत्न लाधलीस तूं गुणवंताचें ॥

नको हरि हा दंगा करूं । या कर्मे नाहीं बरें रयत ही धन्याचें लेंकरूं ॥ ध्रु० ॥ आम्ही पुर गवळ्याच्या सती । छी: म्हणते तुझि खोड जाईना अजुन ही श्रीपती । सोसावे दुर्गुण किती । दैवानें दिली सुजन भोगितो रितीनें संपत्ति । ही सोडून दे दुर्मती । तूं म्हणशील मी धनी नगराचा, वाईट आमुचे पति । चाल ॥ कर जोडितों तुझी हे वस्ति पुरे पुरे बापा । सारि रयत सुखाची. कोण तुझ्या सोशि अशा तापा । या छंदामध्यें नको शिरूं । सांगतसों इतक्यावर तुजला मारूं किंवा आम्ही मरूं । तुज न्याय नसे चोरटा । जारपणादिक वाईट कर्मे तुजपाशीं ॥ १ ॥ सोरटा । काय चांगट तरि गोरटा । पुरुषाएवढा पुरूष असुनि तूं, खेळसी काय पोरटा । नव्हे तान्हा शिशु पारटा । नित्य रमविसि स्त्रिया, दिससि तूं तरी एवढासा कारटा ॥ चाल ॥ पोर म्हणों तरी साऱ्या गोकुळनगरांत भोगिसि रमा । थोर म्हणों

तरी नित्य यशोमतीचा घेसी मुखामधें आमा । किती अभिनव सांगत फिरूं । या नगरिमधें अशा रितीनें राहीना पाखरूं ॥ २ ॥ तुझी संगत ही भोंवली । या साऱ्या रडतात, गरतिच्या बाटविल्या त्वां मुली । काय वाढाविसिल हा कली । काय वदूं ही कीर्ति तुझि बा जगतामधें फांकली । कांही रीत नच राखली । पाप उघड करूं नये अभाची मूठ बरी झांकली ॥ चाल ॥ जातों येथून आतां परि मोडूं खोड ही तुझी चोरा । उद्म्या वरता कोणि हुकमाचा लोक करितसे जोरा । आम्ही तुझ्या जरि भरिं भरूं । तूं मोठा कविराय म्हणविसिल आज उद्यां तुज धरूं ॥ ३ ॥

# लावणी ४१ वी.

चाल ॥ पुरे पुरे वारंवार छळना माझी ॥ सखे मी भोळी कशी करावी इष्कबाजी।

दुर होय कान्हा आम्ही तुशीं खेळुनी होरी । तुटली मर्जी तूं गर्जी नको बळजोरी ॥ ध्रु० ॥ कालच गडे म्यां याशीं केली होती बोली । शिवूं नये अंगा नको दंगा करूं बनमाळी । हा तर ख्याली याची कोण जाणतो खोली । भिजल्या पोरी कशी होरी ग हे घरघाली । झुंबर करितो तिथें कोण कुणाचा वाली । केली शर्दी रंगाची सर्दी ओली । भरले डोळे बाई अजून जाईना लाली । फेडी लुगडीं कुच रगडी या काय चाली ॥ १ ॥ अगे भिजली रंगामध्यें दंग जाहलें मी वेडी । तशा माजी बाई हा हलुच कंचुकी सोडी । या खेळाची याला अशी कायगे गोडी । धूम करुनी भर गुलालांत संग जोडी । गडे हा करितो दुसऱ्याची टवाळी खोडी । माझी केली काल फारच ओढाओढी । मुक्तामणीचे माझे हार गळयांतील तोडी । याचया सगळ्या म्यां वळखून ठेविल्या

खोडी ॥ २ ॥ डोळा नुघडे दुमदुमला रंगीत वेणु । गुंगित होतें तों कर्णीं ऐकिला वेणु । रंजित कुंजी मधु मंजुळ रस मनरेणु । गर्दी उडाली काय सखे स्वमुखें मी वाणूं । तें दुःख सखये मग आमचें आम्ही जाणूं । आहे हा दिन का मध्यान्ह रात्र हेंही न नेणूं । बळकट होती कांहीं आयुष्याची दोरी । म्हणुनि वांचुनि आलों आम्ही सासुरवासी पोरी ॥ ३ ॥ यापरी रुसली घरीं बसली हरी समजावी । नकळत झालें चाल तूं अशी न मी चिडवी । खेळ खुषीचा इथें मजींग कां बिघडाविली । दों दिवसांची सर्वा होरी रती पुरवावी । तूं मज वाली साऱ्यांनीं जूट बांधावी । बरी कीं माझी रंगांत तनु भिजवावी । गोपी जमुनी कुंजांत मौज खेळावी । तुजकडे आलों मसलत कांहीं सांगावी ॥ ४ ॥ ऐकुनि उठली खटपट मना मधें होती । हरिचा धरिला तिणें हात नेला एकांतीं । भोगिला पुरता मिळविली ज्योतीला ज्योती । आंतून तिकडे वर यदुपतीला भर देती । मिसळून गेली भिजविलाच कंसारातीं । गेली येऊन मग कुंजवनाला हो ती । ऐशा लीला करी आनंद तो अवतारी । त्याची होरी कविराय गातसे थोरी ॥ ५ ॥

# लावणी ४२ वी.

**चाल** ॥ पती गेले आज काठेवाडी । गिरनार अबूच्या पहाडी ॥

बाई नंदाचा मूल माझ्या डाई हो । अगे डाई । आतां पडला मी करूं तरी काई ॥ ध्रु० ॥ माझ्या घरच्यांची फार कठिण मर्जी हो । याला नुमजे हा बायकांचा गर्जी । हात जोडोनी करूं किती अर्जी । सासु माझी कोपाग्निमाजीं मर्जी । असा कोणी नाहींच याल

वर्जी । हाची जाहाला या गोकुळांत फर्जी । चाल । आतां उरली ती काय जिंदगाणी । याची कीर्तीची किती गाऊं गाणीं । कोणापाशीं सांगावी गाऱ्हाणीं । गांव सोडूनि जाऊं याच्या पाई । बोलुं जातांना करी तो ग घाई ॥ बाई नंदा० ॥ १ ॥ दिनराती हा सर्वकाळ जाची । सिमा जाहाली याच्या काळजाची । तुला सांगूं गोष्ट मानसाची । याची नोव्हे कांहीं रीत माणसाची । ज्याला गोडी लागेल ज्या रसाची । त्यांत पटकी पावेल जार साची । चाल । घात मोठा याचा यांत कोवळ्याचा । विश्वामित्रादि ऋषी सोवळ्याचा । पाड तेथें या किती गोवळ्याचा । याणें राखावीं गुरें व-स गाई । मला झोंबावें काय अहा गाई । बाई० ॥ २ ॥ दह्यालोण्याची असो जळो चोरी । माझ्या रडवितो धरुनिया पोरी । आतां बोलावें यांत काय थोरी । उगा दाखवितो हाकिमाची थोरी । साऱ्या गोपीमध्यें मीच काय गोरी । मला आडवी म्हणें खेळूं चल होरी । चाल । नित्य याचा हा जाच कोण सोसी । जावें येथुनि दहा वीस कोसी । भला हाटकी पराव्या नव्या बायकासीं । मायबापाची आण याला राई । काय घालूं कविरायजीची द्वाही । बाई० ॥ ३ ॥

# लावणी ४३ वी.

चाल ॥ पती गेले आज काठेवाडी । गिरनार अबूच्या पहाडी ॥

हरीवांचुन संसार कशाचा । किती साजणी धिर धरूं । चैन पडेना कसें करूं ॥ ध्रु० ॥ चुटका लाऊनी जिवासी गेला । ही स्वप्नींची गत झाली । त्यानें ग आपुली सोय पाहिली । कशास येईल वनमाळी । कुठें ग होती रांड कळेना सवत कपाळी घर घाली । या नंदाच्या कुळीं ऐकिल्या नव्हत्या कधीं अशा चाली ।

॥ चाल ॥ ती पडली ग आमचे डाई । रांड पोटजाळीचे पाई । हा घात जाहला बाई । चिखलांत फसविल्या गाई । दूर जाऊनि कुठें वनीं शिरूं । हरीवांचून० ॥ १ ॥ मी म्हणतें ग बाई उत्तम कुळिचा कां रतला बटकीपाशीं । पांडवघरचा खासदार हा ती कंसाघरची दासी । योग्य जाहला संग म्हणावा काय घई या कैवारासी । कुणी उद्धारितो जन्मा येऊनि कुणी आपुलें कुळ नासी । चाल । दासीच्या शिरला घरीं । तिची याची कांहीं तरी सरी । दासीचा बंदा हरी । काय मी सांगूं तरी । उर बडवितें कूटून मरूं । हरी० ॥ २ ॥ क्रूर कठोर अक्रुर कशाचा ह्या मेल्यानें घालविलें । कान फुंकनि माधव नेला तेज आमचें मालवलें । अमृताच्या कुंडांत कसें विष बोट घालुनि कालविलें । या कुबजेनें मसलत करुनि नकळत त्याला पालविलें । चाल । ही जळो बिघडली घटी । नाहीं झालें ठीक झालें शेवटीं । ही दुर्गंधाची घुटी । ती कविरायाची नटी । रांड मुलुखची पोटसरू । हरी० ॥ ३ ॥

# लावणी ४४ वी.

**चाल** ॥ पुरे पुरे वारंवार छळना माझी । सखे मी भोळी कशी करावी इष्कबाजी ॥

क्षणभरी चाल माझ्या सदनासी । सख्या हरि पाहूं वाटते दिन रजनीं तुझ्या वदनासी ॥ ध्रु० ॥ तळमळ काय माझी नेणसी । कीं सखया । तनु किती रोडताजी । जाणसी कीं सखया ॥ याची करु काय वाजी । स्त्री जनकी सखया ॥ ही परसांत भाजी । तुझी या कीं सखया ॥ अरे कांहीं जाणतील ही । नसे दया मदनासी ॥ १ ॥ मनीं माझ्या हौस मोठी । बुडविशी कीं सखया । अशी मती काय खोटी । धरलिशी कीं सखया । भय तर फार पोटीं । शिरलें कीं

सखया । हिऱ्यालाही गारगोटी । म्हणशील कीं सखया । अरे मज दान देरे । रतीपतीच्या कदनासी ॥ २ ॥ पदकमळाशीं माथा । वाहीन कीं सखया सोसूं नये प्राणनाथा । अनुचित कीं सखया । विषयाचा काय गाथा । अनुचित कीं सखया । जाऊं द्या हा काय चोथा । म्हणूं नये कीं सखया । कविराया तूं गजपतीच्या पहा वदनासी ॥ ३ ॥

## लावणी ४५ वी.

रंग सावळा । सावळा गडे आंगी । फिरस्ता किती हो बेढंगी ॥ ध्रु० ॥ वेणुच्या रवें । रवें हृदय फोडी । वदाव्या किती याच्या खोडी । कोवळ्या मुली । मुली पाहून ओढी । गोवळ्यास जळो ही गोडी । हार कंठीचा झटून तोडी । मुलींवर करीतो कुरघोडी । आज होरीच्या । शिरें रंगीं । अशाच्या बसूं नये असलंगी ॥ १ ॥ नंद चांगला । भलागाई । तशाला सुत असा काई । धुंध मातला । कठिण बाई । खराब किती याच्या पाई । फंद पाहतो । करून घाई । वळाव्या यानें गोकुळीं गाई । नित्य भोंवरा । जसा जंगी । रांड जातीच्या फिरे संगी ॥ २ ॥ यादवांमध्यें । असा नवता । कुठून जन्मला आम्हा भौंता । आमुच्या मुळीं बसला पुरता । कुळाला मेला । बुडविता । नष्ट पहिला । न्या परता । भला तो अबरूला भीतो । वाट मी मला । कळा कविराई श्रीरंगी ॥ ३ ॥

## लावणी ४६ वी.

चाल ॥ लाडे लाडे येतें येतें मनरंजना । उचलुनि कडेवर कां घ्याना ॥

अगे सखे यशोदे बाई । मूल आपला आटोपी । अशानें उड-

वील हा टोपी ॥ ध्रु० ॥ काय वदूं जाहाली सिमा । तुझें गोकुळ सोडवें । किर्ती तरी अपयश जोडावें । भल्याचा मुलगा । याणें गरतीस ओढावें । आतां काय कपाळ फोडावें ॥ चाल ॥ जळो ही कटकट । अग गडे । नित कित करावी बटवट । पोरीला चुंबितो मटमट । ही सलग नाहे सोपी । आमुचे पती आहेत कोपी ॥ १ ॥ ही पुरे आतां तुझी वस्ती । काय उरली जिंदगाणी । नांदनों परी लाजिरवाणी । आज नंदाची । म्हणविशी मुख्य राणी । एक लोकाचीं ग म्हाणीं ॥ चाल ॥ असा हा बिजवर । अग सये । सोशिलें गडे आम्हीं आजवर । ही आली घोरपड तुजवर । चाल-ल्या निघून गोपी । तुझा सुत दधि दुध वोपी ॥ २ ॥ अग बये । करावी हाकमी । धणियानें रीतीची । अशी काय वहिवाट नीतीची । ठेऊन दे दासी । अगे बये । पाहुनिया सुरतीची । गोष्ट काहूं नये गरतीची ॥ चाल ॥ बरी काय खळखळ । अग अशी रयतेची न घ्यावी कळकळ । लोटितों घडी एक पळमळ । कविरांया न गुण लोपी । गातसे ऐकुन तरी चापा ॥ ३ ॥

# लावणी ४७ वी.

**चाल** ॥ परनार पठ्याची धार घात करी जीवा ।

ब्रम्हादिक चकले काय इतरांचा केवा ॥

कांहीं लाज यशोदेच्या पोरारे ॥ ध्रु० ॥ जेव्हां भेटे तो मज तेव्हां हाटकी दावी मेवा । करूं मी काय देवारे ॥ कां० ॥ १ ॥ केला अनर्थ काल शेला देऊनि एकया । गेला मुलीशीं मेलारे ॥ कां० ॥ २ ॥ भेटा म्हणूनी चाखी ओठाशीं भय नाहीं सोठा न कविराय खोठारे ॥ कां ॥ ३ ॥

## लावणी ४८ वी.

बोलुं तरी कायरे—सावळीया मी ॥ ध्रु० ॥ येशी जाशी माझी सासु ॥ मोठी बाट आहे सासु ॥ किती वेळ जारा धरूं पायरे ॥ बोलुं० ॥ १ ॥ दाऊनिया खोट्या रंगा। झोबसी तूं माझ्या आंगा। नको तुझ्या वाटा उठ जायरे ॥ बोलुं० ॥ २ ॥ खोटें कर्म संसारी। बरें नव्हे कंसारी। यदुवंशीं केला किर्तीचा शिराडा। दुजे नाहीं काम गेला कुब्जेच्या वराडा। येऊं नये दारा कविरायरे। बोलुं ॥ ३ ॥

## लावणी ४९ वी.

चाल ॥ पुरे पुरेरे वारंवार छळना माझी।
सखे मी भोळी कशी करावी त्रिष्कबाजी ॥

या नंदनंदनें फटफट मन विटविलें। खाऊनिया चटमट दधिवट दुध लुटविलें। ध्रु०। नाहीं बोलवाला या हाकर्माच्या मुळें। गांवांत मातला धुंद पोर गोवळे। बाई दिसे लहान परी निपट मुल मुल कोंवळें। आंगाला झोबें लोटुन देतो बळें। आतां काय करावें बाई टपतो साऱ्या विळें। हा कलंक लाऊनि बुडविल दोन्ही कुळीं। चाल। याचे हातीची मुरली कधीं जाईल जळुन। या सटवीनेंच घेतलें तनमन पिळुन। कशी घर घाली रांड बसली आम्हा गिळून। चल नंदापाशीं जाऊ अवध्या मिळून। किती कट कट वटवट नित कपाळ उठविलें। गोपीचे वृंदाची वृंदावन पटविलें ॥ या नंदनंदने० ॥ नव्या तरण्या मुलगीस मटकन धरी मनगटीं तोडितो झोंबुनि हार बळें कुचतटीं। याची इतुकी का गाई मजवरती वळगटी। जेव्हां तेव्हां अडवितो घरींच पाहुन एकटी।

याची किती वेळा म्या धरलीसे हानवटी । हा ढंग सोडिना गुण उधळी शेवटी ॥ चाल ॥ ही चट यालाची माझी मर्जी गेली तुटुन । असा यशोमतीच्या पोटीं दुष्ट जन्मला कुटुन । झाला नगरीचा धनी तरी नेईनाका घरदार लुटून । यानें गरतीचें कुळ बाई अबरूतुनि उठविलें । काल ह्याहा दुपारा एका मुलीस पटविलें ॥ या नंद नंद० ॥ २ ॥ अशी यदुपतीला जी निंदती होत्या गोपिका । एके दिसीं पतीस म्हणे जा तुम्हीं दहिदुध विका । नंदाचा मूल येईल त्याला भिऊं नका । धरा बळकठ आणा त्यासी घरीं शिक्षा लावील आका । गेला गौळी आला हरी त्याविण नाहीं चुका । म्हणे गोरस विकला ठीक साधिला रुका ॥ चाल ॥ पर फिरतां श्रमलों हातपाय गेले थकुन । चल घरांत म्हणतां सुंदर उठे तिथुन । ती होती सावध परी निजपति म्हणे गेली ठकुन । भ्रमरानें भोगितां जशी कमळ गेली सुकुन । देखिला चतुरभुज म्हणे अगाई गेली चुकुन । कवि व्यंकटपतीच्या तुम्यास कुणी हटविलें । धोंडीशाहीर म्हणे कलगीस दूर पिटविलें । या नंद० ॥ ३ ॥

# लावणी ५० वी.

चाल ॥ शिपाई चकरी गेले नागपुराला ॥

तेली वाणी उदमी दाली बांधु लागला ॥

अहा या हरीनें उद्धवारे काय केलें । आतां काय कसें आम्ही गोकुळीं बसावें । असें त्याला एक मेळ जाऊनि पुसावें । दासीपाशीं गुंतला आम्हीं न रुसावें । आतां काय राहिलें सारें यश गेलें । आहा या० ॥ १ ॥ आम्हा नाहीं वाटला हा घातुकी परवा । असा याणें बायकाचा घात न करावा । याच्या मनीं आज कांहीं

स्नेह न उरावा । असें दैव गोपीकांचें उभें टाकलें । अह्रा या हरीनें० ॥ २ ॥ बटकीनें आजी केला किर्तीचा शिराडा । रंडकीनें आमचा या हाडाचा चुराडा अक्रूरानें याजसाठीं कवीराय नेला । अह्रा-या० ॥ ३ ॥

## लावणी ५१ वी.

**चाल** ॥ शिपाई चाकरी गेले नागपुराला ।
तेली वाणी उदमी दाली बांधू लागला ॥

हरी वंचुनि नेला बाई । आतां करूं मी काई । अक्रूर कशाचा मेला । यानें घातची केला । बिन अपराधी हिरा नेला । नच पुसतां गेलां । हरविलां फुलाचा झेला । यशोमतीचा-चेला ॥ १ ॥ बाई मसलत या कंसाची । कांहीं आहे साची । जळो रंडकी झाली त्या मेल्याची । त्या नेणाऱ्याची । इतुक्याबर गती दैवाची । व्रज-वासी जनाची । गाळांत फसविल्या गाई । उगी बसले बाई ॥ २ ॥ आतां काय कुणाला पाहूं । हरिवांचुनी राहूं । कवणाचें सदनीं वाहूं । किती विरह मी साहूं । यमुने मधें ह्यासवें नाहूं । कैचें सुख मी पाहूं । कविरायजीची किती सांगूं मी भलाई । हरीवांचूनि नेला बाई ॥ ३ ॥

## लावणी ५२ वी.

**चाल** ॥ पुरे पुरेरे वारंवार छळना मझी ।
सखे मी भोळी कशी करावी इष्कबाजी ॥

आतां काय आम्ही हरिवांचून राहूं । प्राणसख्याला कधीं पाहूं ॥ ध्रु० ॥ आतां काय मुरलिचा ध्वनी साहूं । कुंज-वनींची गेली हाहू ॥ १ ॥ आतां काय यमुनेमध्यें नाहूं । कृष्ण-

पदींचे सुख लाहूं ॥ २ ॥ प्राण चालला गे साजणी । आतां मेलों सोसेना जाचणी ॥ ३ ॥ झाली बहुत जिवाला जाचणी । कविराया भेटिची मागणी ॥ ४ ॥ आतां काय आम्ही हरिवांचून राहूं । प्राणसख्याला० ॥

# लावणी ५३ वी.

चाल ॥ नारीनें करून शृंगार गेली पाण्याशीं ।
बारवे तिरीं एक मूर्ति पाहिली खाशी ॥

यशोदेबाई मूल तुझा अनिवाळ ॥ ध्रु० ॥ जितक्या गोपी तितक्या टकळी । म्हणसि तूं चिमणा बाळ ॥ १ ॥ धन्य अशाला व्यालीस गाई । गोपवधूचा काळ ॥ २ ॥ गोकुळनगरीं कसें नांदावें । कांहीं न उरला ताळ ॥ ३ ॥ पाहुनि वाटतो घातुक या परि । वरवा काळा व्याल ॥ ४ ॥ तुज लडिवाळा कवियाचा । जातो कैसा चाळ ॥ ५ ॥

# लावणी ५४ वी.

चाल ॥ ओतीव पुतळा सुवर्णलाटा दृष्टीपुढें दिसे गोमटा ।
अजब शहर गुलजार । दिल्लीचे राहणार ॥

धीर धरी नंदाच्या पोरारे ॥ ध्रु० ॥ काय हारखली माय तुला व्याली । कृष्णसर्पा जशी विपलि व्याली । चोर जार परद्वार बाहेरख्याली । घट घट दधि मटमट गिळि फट फट जळो कटकटरे ॥ १ ॥ दुष्ट जन्मलासि जळो तुझी मस्ती । तूं तर दांडगा मी रांड मशि कुस्ती । कशी ऐकल गोकुळाच हे वस्ती । धड धड करि हृदय झटशी कडकड किती बडबडरे ॥ २ ॥ गुरें वळ जा घेउनि हातीं काठी । काय समजुनां लागसी माझ्या पाठी । तुझी

ठाव आहे कविराय मुखें धाटी । उठ उठ किती हटतट वंदू खट-पट करूं खटपटर ॥ ३ ॥

## लावणी ५५ वी.

चाल ॥ धुमाळी ॥

कैसा निपटपटु जाहालासि कान्हयारे ॥ ध्रु० ॥ पाणियासि जातों आम्ही परयुवतो । भरभरली जळा तुझि नव नवती । तूं भरिं भरलासी तुला कोण लवती ॥ चाल ॥ हीं काय खोडरे । जाऊं दे सोडरे । करूं नको वाढरे । शिवाया रे ॥ १ ॥ आम्ही कोण तुझ्या आम्हा वाटेमध्यें आडविसी । नाहक हकजी कशासाठीं वाढविसी । फिर्याद नंदाकडे सांगावया धाडसी ॥ चाल ॥ हें काय पापरे देऊं नको तापरे । मला तुझा बापरे । म्हणाया रे ॥ २ ॥ संगतीच्या गवळणी गेल्या साऱ्या बायका । जाऊं दे सोड मला यदुकुळनायका । इतुकी ही गोष्ट माझी आजि तुम्ही आयका । चाल ॥ हा काय न्यायरे ; म्हणू तरी कायरे । आला कविरायरे । घराया रे ॥ ३ ॥

## लावणी ५६ वी.

चाल ॥ लाडे लाडे येतें मनरंजना । उचलुन कडेवर कां घ्याना ॥

मज वाटे हरिसी आज होरी बाई खेळावी । काय करूं गे रंगा-मध्यें तनुही घोळावी ॥ ध्रु० ॥ बारा घरच्या बारा रांडा बारा । न पडों देती माझा वारा । नेला बहार त्यांनीं सारा । मी आहें कुळवंताचि दारा । मानधारी म्हणून काय प्रभूनें वगळावी ? ध्रु० ॥ १ ॥ सांगुन धाडिन प्रभुला बाई । परि त्या बोलूं देतील काई । झाली माझ्या मनाला घाई । त्या तर साऱ्या रतल्या पाई । दैव जिचें उघडतें तिला प्रभु बोलावी ॥ ध्रु० ॥ २ ॥ चाल ॥ जाऊं

दुरुनी पाहूं । कोठें आडुन उभ्यानें राहूं । हें दुःख कसें मी साहूं । विष खाऊन मरून तरी जाऊं । रंग नको कविराय म्हणे करें ही घोळावी ॥ ३ ॥

# लावणी ५७ वी.

चाल ॥ शिपाई चाकरी गेले नागपुराला । तेली वाणी उदमी दाली बांधू लागला ॥

काय म्हणावें मुलगा दिसतो, फार कठिण हा कर्मकरी । मै तो चली जमुना नहनेके । बीच आय मोरी ब्राह पकरी ॥ ध्रु० ॥ काय करूं मेला कपटीगे बाई । कुंजगहनमों धुम मचाई । जावें उठून कुठें याचे पाई । हाय ठरा जशामतको कान्हाके ते बारबार मै तो पावमरी ॥ १ ॥ काय वदूं सारी अकीर्ति केली । संग सह लिया मैन आकेली । कोण अशा कर्मास भुकेली । सास बुरी परघर नाग दिया ऐसी गुजपर आना परी ॥ २ ॥ रांड कुणी कुळ बुडविली खोटी । मै न सोंहं ब्रह्म भानकी बेटी । शील बुडवूं नये हें भय पोटीं । काई कहु कविरायकी लोण बात मिठी बहु भूल परी ॥ ३ ॥

# लावणी ५८ वी.

चाल ॥ वारीनें करून शृंगार आलीग पाण्याशीं ।
बारवे तिरीं एक मूर्त पाहिली खाशी ॥

या हरीसाठीं मी जाहालें पहा वेडी ॥ ध्रु० ॥ वाटे घनशाम माझ्या डोळ्यापुढें बाई । प्रपंचांत जिव नाहीं करूं तरी काई । लौकिकाची रीत सारी गेली त्याचे पाईं । गेला बाई सोडुनि कुठें पाहूं गांव खेडीं ॥ १ ॥ त्याचें काय जाई जिथें गेला तिथें राजा ।

आम्हीं मुढ याच्या नादीं पराव्याच्या भाजा । गरीब गाई गोपी यांच्या आला नाहीं काजा । आहे ऐकतों रांड कुणी मिळविली तेडी ॥ २ ॥ सासु आणि सासऱ्याची वाईट मी झालें । याच्यामुळें दादल्याला कधीं नाहीं भ्यालें । लौकिकाची चाड नाहीं अपवादा प्यालें । कविराय हाच याचा उपकार फेडी ॥ ३ ॥

# लावणी ५९ वी.

**चाल** ॥ कसी सोन्याची लंका झाली ऐका । देवाची मूळ वार्ता ॥

हरि मथुरेला आजि कां गडे जातो? । कांहीं कळेना कधीं परतनु येतो येतो ॥ ध्रु० ॥ आम्ही तरी गोपी हारिवांचुन मेलों । दंडधराच्या घरीं गेलों गेलों । अक्रूर मेला याला पाहुनि भ्यालों । कांहीं सुचेना दंग झालों झालों । दिननिशीं आतां विरहातुर बसलों । काय करावें नाहीं घालों घालों ॥ चाल ॥ शाम सखा लोपला गे अंतरीं । पहा याणें सोडिलें आपणास सुंदरी । प्राण आतां मोकळा वाऱ्यावरी । हाय हाय बोलूं काय कविराय विनवणी करतो ॥ १ ॥

# लावणी ६० वी.

**चाल** ॥ नूतन नवी नवती । शेवंती पती टाकून मशीं गेले ॥

घडिभर तरि सदनासी । येउन जा माझी असोसी ॥ ध्रु० ॥ कशी तशि खठनट परि । तुझी म्हणवितें, पदीं तुझ्या तनमनधन झिजवितें । तुला किति रतिपतिगति सुचवितें । जिवाच्या तळमळीमुळें आळवितें । होईन दासी ॥ घडीभर तरी० ॥ १ ॥ तत्पदीचें रज म्हणविलें । सख्या त्वां घरच वाजिलें ।

विरहानें दुःख पिकविलें । तुझें मन कसें मजविषयीं निष्ठुर झालें । रुसुन बसलासी ॥ २ ॥ परोपरीनें असा विनविला । नारीनें मोहुनि नेला सुखशयनीं प्रेमें भोगिला । कविराय आनंदी झाला । कवन हें सरसी ॥ ३ ॥

# लावणी ६१ वी.

चाल ॥ श्रीमंताच्या बावनपागा त्यामध्यें बावन सरदार ॥
रघुवी भोसले दौलतराव शिंदे तुकोजी होळकर ॥

लाजुनिया न परतला—हा हरि दासी संगें रतला ॥ ध्रु० ॥ ही मसलत अशी अशी त्याला सुचली । नायकिली कधीं अघटित उचली । वाईट कुबडी काय मनीं रुचली । खोटी चेटीसाठीं गेला वाईट ह्मणावया मथुरेला ॥ १ ॥ आम्हावरी हरी आतां बाई विटला । नंदयशोदा यांसही तुटला । येणें पुनरपी संशय फिटला । ज्याची त्याची साच वाणी हा उजवाया लागला ॥ २ ॥ ठाऊक नव्हता असा हरि कपटी । केवढी याणें दिघली आपटी । यादव कुळीचें यश हा निपटी । जाती गोती बुडविली गाया । कविराया म्हणे आला ॥ ३ ॥

# लावणी ६२ वी.

चाल ॥ हा फंदी फाकडा मज सांपडला गुंडा ॥ चालू दे प्रीत
शेवटा देवा मार्तंडा ॥

हा हरि माझ्या ख्याली कां पडला । हा हरि काय बोलूं ओंगळ मेला ॥ ध्रु० ॥ साथि मिळउनि दधिदुध हरितो । माती टाकुनि डोळे भरितो । रातीं येऊनि छाति धरितो । जातिगोति हातीं

वाईट म्हणावया बाई मला ॥ १ ॥ हा हरि० ॥ याचि नगरी बाई सोडून जावें । या घोरानें कितिकीं झिजावें । पापविषयीं कुणि पुढें व्हावें । पोटिं ओटीं खोटी बोली करीत निशिदिनीं रागचि माला ॥ २ ॥ बाळपणा पुत्र रांडा पटवी । याला लागली नाहीं कुणि सटवीं । या वस्तीहुनि बारि किग अटवी । पोरी टोरी गोरीं काळी साऱ्या पाहुनि कविराय बाला ॥ ३ ॥

# लावणी ६३ वी.

चाल ॥ अनुष्टुप ॥

मी सांगून चुकतें कान्हा । कर सोड मला हें दांडगेपण सोसेना ॥ ध्रु० ॥ जळो दह्यादुधाची चोरी । हें काय म्हणावें दिवसां धरसी पोरी ॥ या कर्में पडशील घोरी । पति वाट मला तूं करूं नको बळजोरी । धुंडून गोपिका गोरी । तिशीं गुलाल खेळसी होरी । तुझि उडेल अशानें थोरी । तूं जाण तुझें हें कर्म मला भावेना ॥ १ ॥

# प्रकरण तिसरें.

## प्रेम.

## लावणी ६४ वी.

चाल ॥ शिपाई चाकरी गेले नागपुराला । तेली वाणी
उदमी दाली बांधूं लागला. ॥

घडीभर याहो माझ्या घरासी राया ॥ ध्रु० ॥ कां मन आपुलें खवळुनि जातां ॥ १ ॥ मी नव्हे कामिनी तसी गुणवंता । किती मज गांजावें सख्या गुणवंता । विन अपराधें कां दुखवितां । मी वंदितें आणि तुमच्या हो पायां ॥ १ ॥ टाकुनि देतां कां ममतेला । दीन जनावरी कां हट केला । कोप कशामुळें हा मनिं केला । नव तनुसंगमीं मदन भुलेला । रंग हा ध्या तुम्हा जोगा भोगा काय ॥ २ ॥ संग न हो परि बोला मृदु वाणी । हास्य करुन पहा मी तुमची राणी । माझ्या कधिं न तुटे डोळ्याचें पाणी । तव गुण गातें अभिनव गाणीं । या किहो कविराया हा भ्याला वायां ॥ ३ ॥

## लावणी ६५ वी.

चाल ॥ लाडे लाडे येते तेथें मनरंजना । उचलुनि कडेवर कां घ्याना ॥

अहो सख्या जिवलगा काय अंतर पडलें सांगा । मी दासी तुमची मजला मागा ॥ ध्रु० ॥ असो त्याणें रुजु धरली । मग सदयपणें अनुसरली । करिं धरून सुहृज्जन फुलबाडीमधें शिरली । मनाची गति पुरली । सांगाया गोष्ट नाहीं उरली । आनंदजळें

दोघांचीं लोचनें भरलीं । रसामृतें तरतरलीं । कांहीं दिवस होति अंतरलीं । ती युवती मदनरंगांत परोपरि चुरली ॥ चाल ॥ विषय तरी रतिजोगा । असा विरळ एखादे जागा । कविराय म्हणे तें प्रेम घरोघरीं कांगा ॥ १ ॥

## लावणी ६६ वी.

चाल ॥ अनुष्टुप ॥

सोन्याचें पायजिव, तळीं । मदनपुतळी । टाकि भूतळीं मंजु झुमकार । सुंदरि म्हणसी बाहेर चालला हेर । हिचें माहेर कुठें घरदार ॥ ध्रु० ॥ ती उभी मोठी ऐटिनं हार दाटिनं बोलणें कोटिन मांडि वर वार दैवानें । ध्यावि लाभली । नार बांधलि बहुत साधली विरळ कुण्हीवार ॥ चाल ॥ यापरी होउनि बेतात । त्या तरुणही बहु परिमाळ । पुरविन म्हणे मनाचा ख्याल । लागला विषय हरताळ । शृंगार करुनि अळुमाळ । लागला छंदिं बहुसाल भेटिसि इच्छि आजकाल ठिकाणा सांगा । कविराय चमकला हिर लोक चाहिर इतर शाहिर काजेंव वांगा ॥ १ ॥

## लावणी ६७ वी.

चाल ॥ मोत्याचा झालरा कळस न्हाणाच्या मखरा ॥ उभी राहून लाजून बोलशी, किती करशील नखरा ॥

साजणी समयिं घरधणी नसत किती उणी युवती छावणी असुन कुणिकडे । अलिवर्षापरि न मन हर्षी झाली दुरदशा किं मदनापुढें ॥ ध्रु० ॥ चट उठावल्या घनघटा, पडती पटपटा बिंदु कटितटासि बळकट धरा । आता पूर नद्यासि भरपूर येईल मग शूर कसा येतो घरा । हा पवन भयंकर भुवन-सख्याविण अवन कोण करि पवन धनाहुनि बरा । ही शंका-

मज भय कंपा देति कुणि संपादणी तरी करा । हा सर्द हवा धन गर्द करी उपमर्द मदनकंदर्प देत भडिमारा । हा कहर जातीचा वहर मदनाचि लहर येति सरसरा । घनघोर गर्जती मोर तिमिर वर जोर रात बहु थोर वाजे करकरा । सारे बिळांत नयन हे जळांत होता पळ पळांत जीव घाबरा ॥ चाल ॥ किती संचित हिनमति वंचित मजगडे किंचित सुख नये दिसून । अतिसुंदर तनु कुचमंदर गिरीसम कुंदरदन काय असून । अशि मंडित तनु केली खंडित पति कुठें धुंडित बसला रुसून । अकळांकित कुळ मन शंकित केलि तनु अंकित मन्मथ घुसून । मणिहार सकळ तनुभार विकळ संसार करिल कोण पार कठिण सांकडें । किती चिंता करूं भगवंता मनामधिं संतापुनि येतें रडें ॥ साजणी समयीं घरधणी ॥ १ ॥ हा विलास गडे दिलखुलास पसरुनि फुलास पतिसम तुला सहित कधीं घडेल । असा काम मनांत जरी राम न घडविल ठा‍ कसा न साखि उडेल । सडिसाट नयन किती वाट पाहति घनदाट अजुनि तरि हाट धरुनि शिघ चढेल । ही रति कफालत सरती त्याचि मज वरतीच संगत पडेल । नाहिं तोक उदारें, किती शोक करिती जन लोक कुणिगे तरी रडेल । मला पाय पतीचे सदुपाय गडेग त्याचे काय मजविणें अडेल । घरीं दीर सासुचि किरकिर मजसि नसे धीर कधीं तरि वीर पलंगी चढेल । मग भाळपदीं रतिकाळ नाहि तर ताळ नघडे कसा पडेल ॥ चाल ॥ माझि उंबर किती गडे कंबर बसली सर्द-बर नको म्हणे कुडी । मेला शंभर रिपु मानें तंबर मजवरि शंभर शर हे सोडी । माझी बंडाळ कुठें घेउं धुंडाळ कसिरे चांडाळ दिघालिस बुडी । असें कंजनयन याला अंजन नाहीं मम रंजन

कोण परवडी । मन उदास कुणि पति पदास धुंडिल सुदास पण जासुदास देईन कडां । आले दुधार मन गडे सुधार मग सुख उधार दुःख रोकडें ॥ २ ॥ साजणी सम मी कांहीं दोष म्हणुनि पतिरोष करिन संतोष ह्याणें माझा हाष सकळ उडविला । कोण रांड मिळालि खटभांड तिणेंच माझी सांड कराया पढविला । किती नवस करुनि बसूं हिंवस व्यर्थ गेले दिवस कुणिग अडविला । कोण सवत केली भुत भक्त तेणें मन कुवत हृदयीं जाडियेला । माझी दशा करुनि अशी खुशाल कुणितरि उशा असेल सारि निशा कैफ चढविला । किति लवत होतें मुख गवत धरुनि कोण सवत मिळालि तिणें दडविला । असा तर्क करिते परि अर्क सरस तो गर्क कर्कश शब्द बोलुनि चिडविला । कुडकुडीत चित्त धडधडीत देउ कडकडीत जणूग कढविला । चाल ॥ मणि-कुंडल देतें भुमंडल जरि कुणी धुंडल पतिसाठीं हिंडल निश्चयी-निका । उरिं खंजिर जाणो लोह जंजिर मज माणमंजर चरणीं नका । माझी मंगळ तनु हे अमंगळ झालि मुखिं वंगळ पांढरफिका । रति रंजित काचि सींजित मधुकर गुंजित गेले किंग फुका । हा कांत कठिण आकांत मदन करि शांत न धरि वांकडें ॥ साजणी समयीं ॥ ३ ॥

तिची रती सबळ भगवती पावली होति म्हणून तिचा पती अचानक आला । मग गडबड तिची मोठी लडबड गेली सारि बडबड आनंद झाला । होति मायबाप करित हाय हाय धरुनि त्यांचे पाय मग महालीं गेला । झाली भेट बसविली पेठ सुखाची लोट भेटला तिजला । मग हात धरुनि महालांत मंचकीं जात अश्रु नयनांत सागर भरला । म्हणे भलि केली रांगोळी नित्य आंघोळी नजन

जळें झाली जिव कंठीं उरला । अशि गळा पडुनि खळखळा रडली वेल्हाळा गहिवर आला । मग झाली पतिकर कर्षित मनिं बहु हर्षित रतिसुख दर्शित हेतु पुरविला । चाल ॥ स्तिर जंगम त्याचा सुख संगम न घवति दंग मनांत मनांत मुसमुसी । रतिच वेळ झाले नयनांचल मन्मथ मंचळ सुलत मानसीं । कुचकुंभांकित परि भंगा हुनि तिच्या रंभा किती उर्वशी । असें संकट हरिस कळंकट वारिल व्यंकट न स्वि भरवशी । कविराज काव्य सिरताज करिल कुणी आज याजहुनि साज निवळ चोखडें । तरि आदर, नाहीं तरि संपर, भरावें उदर, विकुनि लांकडें ॥ साजणी समयीं० ॥ ४ ॥

# लावणी ६८ वी.

**चाल** ॥ तंग चोळी आंगीं बरवी ॥ निसंग होऊनी बेपर्वी ॥

झाली तरुणपणाची धूळ । पति नाहीं सेजेवरी सुंदरा रडे मुळमूळ ॥ ध्रु० ॥ हा वसंतऋतु अनिवार । करि मदन शरांचा मार बहुत बेजार । आतां काय करूं मी संसार । सर्पापरी गमती गडे गळ्यामधें हार । जासुद करति वेरझार । नाहीं पत्र साजणी कथितें तपसिलवार । या विरह समुद्रापार । कधीं होईन बाई येति कधीं सरदार ॥ चाल ॥ काय करूं मंचकी बसून । नाहिं सर्व सौख्य मज असून । बोलूं कुणासवें मी हंसून । अंतरला साजण आला बाई मजला दिसून । मीं चित्त पाहिलें बहुत तयाचें कसून । ओढवलें दैव आतां काय तयावरी रुसून ॥ चाल ॥ बाई सर्व सुखाचें मूळ । तो दिलभर मजला होईल कधीं अनुकुळ ॥ १ ॥ सजणाविण झालें दीन । जसा तप्त वाळूमधें तळमळतो मीन । काय सांगूं संचितहीन । नाहीं सये वर्तमान वर्षें झालीं तीन । बाई झालें दुःखाधीन आतां

देह तयाचे चरणावर ठेवीन । कधीं नेत्र भरून पाहीन । हा विलास त्याविण मजला देतों शीण ॥ चाल ॥ नार पतिविण कसि बरि दिसल । पर पुरुष घरामधिं घुसल । मग स्वकीय जन हा हसल । हा शुद्धभाव जरी माझे मनिंचा असल । तरी सजण सखे मज लौकर नयनीं दिसल । नातरी तो परनारीसीं गुंतुन फसल ॥ चाल॥ एवढ्यावर न कळे खूळ । पिंगळा सकाळीं शुभ वदला पांगुळ ॥२॥ अशि नार पडली शोकांत । मग तिच्या सखीनें कवळून धरिला हात । म्हणे काय करिशी घात । जाईल सखे तुज आज सुखाची रात । हा ध्वनी पडतां कानांत । उघडिले नेत्र तों जासुद उभा द्वारांत । घाबरली पुसे हुजरांत । कुणीकून आली हो काय सुखाची मात ॥ चाल ॥ स्वारि आली बयाजी कडक । बागांत उतरले भडक । हें ऐकुनि झालि रंग सडक । हर्षानें भेटली सजणाला बेधडक । हरि संकट हहि नाग्यास बैसली धडक । टाकून दे कलगी व्यंकटपतीला हुडक । लिंब खासील टाकुनि गुळ । धोंडि शाहिर कविचा छंद उरावर शूळ ॥ ३ ॥

# लावणी ६९ वी.

चाल ॥ काय मुख वाणूं सख्याचें जणू कलकन छाती फाटेल ॥ अंतखेदी केल्या लावण्या आतां कधीं येऊन भेटेल ॥

पाहून सख्या मी भुललों रमलों अघटित करणी ब्रम्हाची ॥ध्रु०॥ नार नवी तरणी काय सांगु रमणी जशी नागिण देवा घरची । सद पदरिचें पातळ जरिच राव राव कसिद्याची मुस ओतली । कुचतटि वळकट कुंचकि चापट ओढि माझे मनिं ही फार रुतली । चटपट अणवट जोडव्याची झटपट दाहि बोटीं मेंदी रंगली । वदन

रदन रंगित मदन तिचे रति सख्या जणू बंद खुलली । कोंवळ्या ओठाचा रंग पोंवळ्यास लाविनंग अंगसंग खुप बनली । जडिताचे बाजुबंद कानिं कुसुमाचे गेंद मंद मंद गति चालली । सिंहकटिसम कटि रूपचि हौस मोठी कुणाचे पोटीं जन्मली । नयनाचे मारी बाण सख्या गेला होता प्राण अवचट मनिं हे उद्भवली । पाहुनि भुल पडली । माझे हृदयांत जडला । बहु झटक्यानें नटली जशी हवयी सुटली । तशी माझे दिठीं पडली । पटपट तिची गती पाहुनि मी झटपट गति विसरलों उदमाची । तटतट उरावरी लटपट हार करी जसी काय पुतळी कनकाची ॥ १ ॥ पाहुनि सख्या मी भुललों रमलों अघटित करणी ब्रह्मयाची ॥ १ ॥

पिंवळ चमक नवि धमक अंगामधीं भांग टिळ्याची खूबी भारी । त्याजवरी बिजवर रुचिर बहु उभी सख्या उजरींत गोरी । राखडी जडित वरि हिऱ्याची टिकली दावि ठकडि आकड काडि मुदभारी । टक टक तिची मजकडेचि लागतां जणु बराचि हृदयीं मारी । अधरीं मधुरस सुधेपरिस रस पाहूनि लाजवी करि हारी । जाहली लगबग चालली बघून मग मी तर दिशा भुललों दिशाचारी । धडड धडड धड धडके उर मग सुदबुद माझी गेली सारी । लागलि मनांत गोडी कधिं न हिला मी सोडी । पाहूं चल सखया गुलजारी ॥ चाल ॥ अरे सख्या नव्हे सुंदरी । मदनाची तरवारी । घुसली कट्यार उरीं । जलदी उपाय करी । चल तरि तिचे मंदिरीं । तन मन धन तिजविण मज उपवनपवन भवन जाची । गहन दहन झालि सहन करूं मी किती करि सख्या गति याची ॥ २ ॥

सजण म्हणेरे तुझें वजन बहुत आतां त्यज न हिंया सखया । घडिभर धीर धर गडबड नको तुझी तुज आणिन तुझे ठायीं । वदून

तयाचा गडि, साधुन बरवि घडी, गेला तिस रिझवाया । देऊन उदंड धन मोहवूनि तिचें मन नेलि नार रमवाया । पाहुनि तियेस मग झाला गडि डगमग तगमग सुटली तया । शयनावरुनि मृगनयना नेलि मग मनोरथ पुरवाया । अशी रमविली नार पावला सुखाचा पार गार झालि त्याची काया । चालली तिथून नित दोघाची संगत मग जडली बहुत माया ॥ चाल ॥ वंदुनि गुरुराया । केला कविनें छंद गाया । नागेशा भुलवाया । त्याची कलगी उडवाया । व्यंकटपति विनवाया । शाहिर धोंडीनें केली पाही लावणी अशी बाहार कुणा कविची । घडेल तरी मी कच्च्या घड्यानें वाहिन पाणी वाहिली शपथ साची ॥ ३ ॥

## लावणी ७० वी.

चाल ॥ हृषीकेशी अंतरले । प्राणपती भरी कोणाच्या भरले ।

तुम्ही सजाणा—सुजाणा—घ्या आदराचें पान । मज दुबळीचा राखा स्वाभिमान ॥ ध्रु० ॥ तुम्ही कां रुसला काय चुकलें सेवेला । प्रतिपाळ आजवर तुम्ही माझा केला । नाहीं कधीं मला शब्द दुःखाचा दिला । एकाएकीं निष्ठुर कांहो झाला । म्यां धीर धरला कंठीं प्राण उरला । ह्या प्रीतीचे दुःख सांगू कोणाला । तुजसाठीं सख्या करीन जिवाचें रान । तुम्ही सजणा० ॥ १ ॥ त्वां सजणारे कशी लाविलीस माया । अर्पण तुम्हासी केली माझी काया । तुमची आमची झाली इमानक्रिया । अंतर नका मज देऊं स्वामिराया । तूप साखर भात वाढीन जेवाया । झड घातली राव मी तुमच्या पाया । धन संपत हा जीव करीन खुरबाण । तुम्ही सजणा० ॥ २ ॥ दो दिवसांत कशी तोडितां प्रीत । हीं सज्जन-

पणाची अशी कांहो रीत । नरदेहांत या मनुष्यजन्मांत । न चिंतावा कोणाचा घातपात । धनसंपत देईल श्रीभगवंत । संसार घडीचा निर्जिव नाशवंत । हा मृत्यु लाभ नाहीं कोणा अधीन । तुम्ही सजणा० ॥ ३ ॥ जैसें यावें तैसें निदान जावें । या भ्रांत दशेची मोडावी निजळांव । मन शांतीचा ऐकुन बोधभाव । मग प्राणपतीचा गेला राग सर्व । बाळा बहिरू म्हणे आतां समजावें । हा राग घडीचा याचें काय घ्यावें । कविराजाशीं नको होऊं बेमान तुम्ही सजणा० ॥ ४ ॥

## लावणी ७१ वी.

**चाल** ॥ नट नाटक तूं छेल छबेला मतवाला अलबेली तऱ्हा ॥
आगजाळया ह्या भोवत्या फिरती पहा मांटून नेती घरां ॥

सती सुमती गुणवती सुकुलजा रती परीस जांगली । अरे तुझे महिला, भोगजा वहिला, काय गरररररर फिरसी चट लागली ॥ ध्रु० ॥ उगाच नको येऊं द्रगा बसल जिवलगा उमज अंतरी । अरे घरामधें भर्ता, प्राण काय वर्ता, आला तुज तरी । बरा दिससी किरे जरा न भय तुज घरांत धरशील करी । अरे अक्कल तुझी वेडी, कठांण किरे वेडी, पर सुंदरी । हाट करशी कानफाटा येऊनी सुतीवटा उपरी जरा धरी । अरे तुज अरे कोण तुज कैसा सोडवील पैसा वेंचुनिया तुज तरी । उणी नजर घरधणी करील मज कुणी न म्हणतील बरी । अरे निखळ मी कवळी सासु माझी जवळी । काय करशील हे घर बुडल पडेल कशी पुरी ॥ चाल ॥ या छंदी भरी भरशील होईल गत कसी । मी उत्तम कुळीची सोनें बावनकशी । गावांत धणी श्रीमंत पड चौकशी । माझ्या घरच्याची तुझी आधींच

फिरे बरकशा । अशांत निघ दुरदशा होईल फिरे दिशा निवट उजळली । अरे तुझे महिला० । सती सुमती० ॥ १ ॥ गडे नयनीं जसे खडे शब्द रोकडे खुपती तुझे मनीं । आगे जळो जिनगाणी सोडिलें पाणी । तुजसाठीं जीव देईन सखे साजणी । आतां जवळ भुजलता कवल कुचगता समज निवळुनि । तुझे रंग लाली काय घर घाली तुझे ततमनधन सुदबुध नेली सखे हिरऊनि । कंठी चिवळ कुचतटी आवळ हानुवटींत हिरवा मणी । तुझ्या गळ्याची आण गुंतला प्राण काय विधीनें घडिलीस सुंदर विधीनें साधुनी । नका म्हणसी परी धक्का बसल रंग फिका होशील मग जुनी । अगे तुझी भरनवती आजवर नव्हती आतां कुठवर ठकविसी कर सवदा समजुनी ॥ चाल ॥ तूं तिलोत्तमेहुनि उत्तम वपु कोमळा । आम्ही प्राणच तुझिया शरिरावर नेमिला । कांहीं विचार गडे असा कितीक मामला । का झिडकाविशी मदनानें सोकविलें मला । उदास नको मन मुदा पुरीव संपदा सकळ तुज दिली । अरे तुझे महिला० ॥ २ ॥ असा निपट काय पिसाळशील भरंवसा धरुनि हाटकिसी । अरे जळो तुझी मस्ती टिकेल कसी वस्ती या नगरांतरीं नागरी कितीक कोण कसी । तुला न भय परी मला जपत पती मला हाटील तामशी । अरे अझुनि मी नवकी जवळ फिरे चौकी चल दूर हो वेड्या उगा शरीर कटविशी । उजागर नपती मजा करील मग दुजा वदेल कोण मशीं । अरे टिकल कशी अबरु धरील कोणी गबरु मग पडेल फिरे जड येवढ्यावर तुझी खुशी । बुरी नजर तुझी गोष्ट काय बरी हासुनि जिरविसी । अरे निघुनि जा उगला प्राण हा जगला मानुन घे सुख संतोष बहुत मानसी ॥ चाल ॥ ही सुंदर ज्याची त्यासच फिरे लाभली । अशी

गोष्ट कुठे नवखंडामधीं शोभली । कां झडी पडशील तुझी मती मजवर-लोभली । झाली ती वरी झाली नको हालऊं जिभली । सुजात ह्मण तुज अजात करी परी मज तशी न बोलली ॥ अरे तुझे महिला० ॥ ३ ॥

# लावणी ७२ वी.

तरुणि तवेयं कुचतटिमति गुरुं कुरु मम हृदि सादरं । मनो मे भवति मनोभवदरं ॥ ध्रु० ॥ अधरमधुरमधुरसरसिक मामुज्जीवय तावकं । प्रिये मे शमय विरहपावकं । मुंचति मदनः स्वीकृतकदनो मयि विषमं सायकं । निवारय तं सखि रतिनायकं । कोपादरुणं कुरु मयि करुणं रुचिनिर्जितधावकं । दगंतं पाहि निजं सेवकं । जहि जहि मानं मात्रज मौनं अनुकुरुषे किं बकं । त्वदियं लपितं सुखयति न कं ॥ चाल ॥ त्वं मुधा भजसि मयि रुषं किमिति कातरे । किं कृतं मया वर मामिनी रुजिराघरे । कुरु कृपामरुणरुचिपल्लवकोमलकरे । साहसं किमिदमतिकोपभरे मंथरे । मंजुलतरमृदुसिंजित मणिमयत मंजिर च्युतिधरं । नतोहं तावकपटपुष्करं ॥ १ ॥

# लावणी ७३ वी.

## वेणू.

कुंजांत वाजवी वेणू भोंवताल्या चरती धेनु । कीं उडती रेणू ॥ ॥ ध्रु० ॥ सांवळा सगुण जगजेठी । ब्रह्मांडें ज्याच्या पोटीं । टेंकण काठी । देहुडा पदाची धाटी । दिलि यशोदेनं तुपरोटी । बांधी पोटी । घोंगडें शिंकें लंगोटी । काल्यानें भरली वाटी । न्याहरीसाठीं । विटीदांडु लगोऱ्या गोटी । सर्वं गोपाळांची दाटी । गडबड मोठी ।

डोइस लहान चिंधोटी । डोघालित यमुने कांठीं । बोटें चाटी ॥ चाल ॥ काय सांगूंगे याची करणी । खेळतां न तापे धरणी । वरि शीतळ होतो तरणी । पशु बाळहि लागति चरणीं । आम्ही म्हणों कीं मुल हें पिसें । उगिच फिरतसे । म्हणुनि भलतसे न मानु । मानुं मानुं याचा खेळ कसा काय नेणूं गे । कुंजांत वाजवी वे० ॥ १ ॥ म्हणे दुसरी हा अवतारी । याची काय गुणाची थोरी । जाणती सारीं । दिवसास वासेरें चोरी । निशिं घरांत शिरे बळजोरी । करितो चोरी । दहिंदूध समेटुन घेरी । नवनीत शेलकें हेरी । आणिलें खोरी । बांधुनि घेतसे हा जरी । मग आपण राहुन दारीं । पोरें सारीं । घालुन आंत बाहेरी । पसरितो सराटे भारी । कांटवण बोरी । काय कसब सांगू रीतीचें । पाहतांना मुल जातीचें । भलें कुलीन कीगे गरतीचें । घर बुडवितसे भलतिचें । आतां कुठवर सांगूं मी तरी । पडेल कशि पुरी न जाणूं। जाणु जाणु याचें किति म्हणून दुर्गुण वाणूं । वाणूं वाणूं । कुंजांत वाजवी वे० ॥ २ ॥ सांगतसे निज गाऱ्हाणीं । बाइ दिसतो चोरावाणी । ऐका कानीं । याचे काय पाहिलें पाणी । नंदाची बिटली राणी । पुसेना कोणी । मातलाच खाऊन लोणी । फेडी लुगडीं करी धुळधाणी । ओढितो वेणी । किती दडपि बायका कोनीं । किति गेल्या गांव टाकुनि ॥ चाल० ॥ डोळा नुघडे दुमदुमला रंगित वेणू । रंजित कूंजित मधु मंजुळ रस मग नेणूं । गर्दि उडविली घाबरलें काय मी वाणूं । बळकट होती कांहीं आयुष्याची दोरी । वांचुनि आलों आम्ही सासुरवाशी पोरी । कुजांत वाजवी० ॥ ३ ॥ यापरी रुसली घरीं बसली हरि समजावी । नकळत जाली गडे चाल तू दुजी चिडवावी । खेळ खुषीचा तेथें मजिंग कां बिघडावी । दों दिवसाची सखि होरी रति पुरवावी । तूं समजवाली

साऱ्यांनीं जुट बांधावी । वरि कीं माझी रंगांत तनु भिजवावी । गोपी जमल्या कुंजांत धुम कळवावी । तुज म्हणालों कांहीं मसलत मज सांगावी । ऐकुनि उठली खटपट ही मनामध्यें होती । हरिचा धरिला तिणें हात मिळविली ज्योति । आंतुनि तिकडे वर यदुपतिला भर देति । मिसळुन मेळीं भिजविलाच कंसाराती । यशोलीला करि अनंत जो अवतारी । त्याची होरी कविराय गातसे थोरी । कुजांत वाजवी वेणू । भोंवताल्या चरती धेनु । कीं उडती रेणू ॥ ४ ॥

---

# लावणी ७४ वी.

चाल ॥ पुरे पुरे वारंवार छळना माझी ॥ सखे मी भोळी कशी करावी विष्कबाजी ॥

मूल तुझा अति अनिवार यशोदे ॥ ध्रु० ॥ चावट निशिदिनें घरघर फिरतो । रात्र न म्हणे दिवा मुलगिस धरतो । गोरस जळो परि भलतेंच करितों । आम्ही परयुवती हा कुच कसे चुरतो । नग्न जळीं उभ्या वसनाचि हरितो । आधिच अहिर जात उणी त्यांत तुझा बाळ गुणिगे । यासम नसे शिरजोर कुणिगे । हा झाला नगरांत धणिगे । गोष्ट घडो सहसा न उणि गे । खेळ करी सदनीं न वसों हें मूल तुझा अति अनिवार य० ॥ १ ॥ म्हणशिल चिमणागे खेळ आपुला । चैन पडों न दे घडिभर वपुला । मातविले तुवा या कंसरिपूला । रजत न म्हणों याला हा बाई शिंपूला । काय वदों याच्या खोडी हा चेवला । रीत तुझ्या नगरांत अशीगे । राहिल ती राहणार कशीगे । बोलेल हा बहु गोड तुशीं ग धन्य तुझी सकळांत कुशीगे । ज्यांत असा निपजे व्रनशिगे । गोड तुझें तुजलागें

दिसोंदे । मूल तुझा अ० ॥२॥ गोकुळ नागरी हा सारिच विटवी । सांडुनि दधिदुध खाउनि लुटवी । कुंजवनीं आल्या गरतिस फटवी । निजल्या मुलीला चिमटुन उठवी । यास न शिशुपणीं लागलीं सटवी । यांत कशी पडणार पुरिगे । सोसिले हें झट कां दुसरी गे । काय अशी नित्य धुम वरीगे । धीट मला म्हणतो नवरीगे । आम्ही टक्या बाई तूंच खरी गे । सांग तुशीं कविराय रुसोंदे । मूल तुझा अति अनिवार यशोदे० ॥ ३ ॥

---

# लावणी ७५ वी.

चाल ॥ वेणू ॥ कुंजांतवाजवी०

बाई नंदाचा मूल पहा किजी तरि बेढंगी ॥ ध्रु० ॥ काय वदूं मूल माझी बगडी । काढून बाळीबुगडी । नहात होती घरिं उघडी । हा तिचे कुच रगडी । किती रांडाशीं खेळे फुगडी । फेडितसे लुगडीं । काय उणें नांदाया पृथ्वीवरते । गांवा सोडोनि द्यावें वाटतें । या मेल्याचें नांव । काय म्हणुनिं आतां इथें राहवें चालच बेढंगी । बाई नंदाचा मूल० ॥ १ ॥ माझ्या मथुरेची सुन धरिली । ती काय कोणी दुरली । पाडूनि रंगामध्यें चुरली । आतां काय रीत उरली । आग याच्या हातींच्या मुरली । ती तर विषें भरली । भली बुरि बायको ठेवितसे उरिं हात । हें कां सोशिल वाउगें भली मुलीची जात । कुठवर याचें कर्म साहवे सगळें व्रत भंगी । बाई नंदाचा० ॥ २ ॥ या पापाची कुठें झडती । देईल हा पुढती । अजून माझीं मुल रडतीं । दिननिशिं घरिं पडतीं । याच्या नावानें चरफडतीं । भलतेंच बडबडतीं । गोकुळनगरीं

मातला बाई । गवळ्याचा पोर याणें । आम्हा बुडविलें खोटा मेला चोर । कविरायाला स्वतनु वाहा मग शिरला रंगीं । बाई नंदाचा मूल पहा किति तरि बेढंगी ॥ ३ ॥

---

# लावणी ७६ वी.

**चाल** ॥ परनार पत्याची धार घात करी जीवा ॥

ब्रम्हादिक चकले काय इतरांचा केवा ॥

या नंदनंदनें फुट फुट मन विटविलें । खाऊनियां मटमट दधि-घट दुध लुटविलें ॥ ध्रु० ॥ कांहीं बोल बोलतां नये हकिमाच्या मुलें । गांवांत मातलें धूंद पोर गोवळें । बाई दिसे लहान मुल अति निपट कोंवळें । आंगाला झोंबें लोटूनि देतों बळें ॥ आतां काय करावें टपतो सारे वेळे । हा कलंक लाउन बुडविल दोन्ही कुळें । ह्याच्या हातची मुरली कधिंगे जाइल जळून । ह्या सटवीनें घेतलेंचि तनमन पिळून । काशि घरघालीं रांड बसली आम्हाला गिळून । आतां काय करावें कोणिकडे जावें पळुन । चला नंदा-पाशीं अवध्या जाऊं मिळून । किति कटकट वटवट कपाळ नित्य उठविलें । गोपींचे वृंदाचि वृंदावनिं फसविले । या नंदनंदनें फुट० ॥ १ ॥ नव्या तरण्या मुलगिस मटकन धरि मनगटीं । तोडितो झोंबुनी हारघटित कुचतटीं । याची किति वेळा बाई म्यां सोसावी अटी । इतकी कांगा ही तरी मजवर बळकटी । जेव्हां तेव्हां अडवितो घरींच पाहुन एकटी । याची किती वेळा बाई म्यां धरिली हनुवटी । असें विनविलें बहु परि पडला माझे झटी हा ढंग सोडिना गुण उधाळिले शेवटीं । कांहीं बाई बरें नाहीं

याच्या संगतीनें मन गेलें विटुन । याहया नगरिचे झाले कोळसे आम्हीग जाऊं उठून । ही चट याला याची माझी मर्जीच गेली तुटून । असा यशोमतिच्या पोटीं दुष्ट जन्मला कुठून । झाला नगरिचा धनी तरि नेइल काय घरदार लुटून । याणें गरतिचें कुळ बाई अबरूतून उठविलें । काल दिसा दुपारां एक्या मुलिस फसविलें । या नंदनंदनें फुट० ॥ २ ॥ अशि यदुपतिला जी विनवित होती गोपिका । ती कोणी एक दिनीं म्हणे पतिला जा दहिंदुध विका । अहो नंदाचा मुल भेटेल त्याला भिऊं नका । धरा बळकट मी सुड घेइन मी नांवाची बका । गेला गवळी आला हरी त्यावाणी रानमि चुका । म्हणे गोरस विकला ठिक साधला रुका । परि शिणलों गे फिरतां हातपाय गेले थकून । चल घरांत म्हणतां उठली सुंदरी ठिकून । ती होती सावध परि निजपति म्हणे गेली चुकून । भ्रमरानें भोगिली जशि कमळाणि गेली सुकून । कधि यदुपतिच्या या तुष्यास कुणि हाटविलें । कविराय म्हणे कलगिस दूर पिटविलें । या नंदनंदनें फुट फुट० ॥ ३ ॥

# लावणी ७७ वी.

चाल ॥ लाडे लाडे येतें मनरंजना । उचलून कडेवर कां घ्याना ॥

सोड सोड पदर मुलगिचा । जळो तुझी अशि कशी ही होरी ॥ ध्रु०॥ रांडा काय गोकुळीं उण्या? मुलगी अति नाजुक माझीरे । लोळविली रंगामध्यें दांडग्या नरतनु कीं? भाजीरे । जन्मलासि यदुच्या कुळीं म्हणुनि कां तुज होतिल राजी रे । किति लाल गाल पोरिचा वांचलि होती बळकट दोरीरे । सोड सोड पदर० ॥ १ ॥ रंगलाल भरुनि पिचकारी मुलिचे किति भराशिल डोळेरे । जी रांड

दांडगी तिच्या उरावर धर जाउनि गोळेरे । केशर गुलाबही तुझा थंड हो परी गरातिस पोळेरे । तूं जर चोर पोरटा आह्मावर करंशी बळजबरीरे । सोड सोड पदर० ॥ २ ॥ कुंकुमें उडाविलीं उरीं जरि चिमणी माशी मरती रे । काय घेउं गोवळ्या तुझें आयुष्याची मग होती भरतीरे अबरुची । सोनीं अशा कशा नांदाव्या गरती रे । मातलास गोकुळपुरीं अशी काय कविराय थोरी । सोड सोड० ॥ ३ ॥

---

# लावणी ७८ वी.

चाल ॥ वेणूची ॥

रंग सांवळा गडे अंगीं फिरस्ता किति हा बेढंगी ॥ ध्रु० ॥ वेणुच्या रवें हृदय फोडी ॥ वदाव्या किति याच्या खोडी ॥ कोंवळ्या मुलि पाहून गोडी ॥ गौळ्यास जळो ही गोडी ॥ हार कंठींचा झटून तोडी ॥ मुलींच्यावर करतो कुरघोडी ॥ आज होरीच्या श्रीरंगीं । अशाच्या बसुं नये असलंगीं । रंग सांवळा गड अंगीं फिरस्ता० ॥ १ ॥ नंद चांगला भला गाई । तशाला सुत ऐसा काई । धुंद मातला कठिण गाई । खराबा किति याच्या पाई । फंद्या होतो करूनि घाई । वळाव्या याणें गोकुळीं गाई । नित्य भोंबरा जसा जंगीं । रांड जातिच्या फिरे संगीं । रंग सांवळा गडे अंगीं फिरस्ता० ॥ २ ॥ यादवामध्यें असा नव्हता । कसा हा मुळिं बसला पुरता । नाहीं आमुच्या मुळावरता । कुळाला मेला बुडाविता । नष्ट पाहिला न या परता । भला तो अबरूला भीता । वाट मी मला ही आलिंगीं । कळा कविराय श्रीरंगीं । रंग सांवळा गडे अंगीं० ॥ ३ ॥

# लावणी ७९ वी.

नंदकिशोराची होरी जळो बळजोरी पिचकारी मारी ॥ ध्रु० ॥ या साठीं याला मी वंचुनि जात होतें मज गांठीं काय वदों कुच मर्दुनि माझि तोडुनि नेली गांटी । हाच मेला मूळ नाशिलसे कुळ कंचुकिच्या सोडी गांठी । आज उद्यां याचें तोंड काळें करूं जाऊं कोठें दिन चारी । नंदकिशोराचि होरि जळो बळ ॥ १ ॥ भाग तरी रंग राग पराव्या काय धराव्या बाला । ऐशी तंडावर देईन याच्या भिईन कांभी बाला? हा काय मोठा गोकुळिचा धनी दावितसे दाबाला । सासु माझी जिव देइल याच्या येउनिया आज दारीं । नंदकिशोराचि होरि जळो बळजोरी ० ॥ २ ॥ मस्त मेला माझें कुस्त केलें वपु सांगुं कंस मामा । याचे बापाचे काय खातोंगे बाइ भिड काय आम्हाला । हा काय होइल आम्हाला । गाई माय बाप नये कामाला । काय वंदू कविराय म्हणवितो हाय जाली मारीं । नंदकिशोराची होरि जळो बळजोरि० ॥ ३ ॥

# लावणी ८० वी.

कुंदरदन तनु शाम सुलोचन कोण ताई मज हा नित्य हाटकी ॥ ध्रु० ॥ मोर मुगुट शिरि करीं धरी वेणु । पीत वसन वनिं चारित धेनु । कोण कोठिल गाई मी तर नेणु । धीट खुणाउनि वाजवी चुटकी । कुंदरदन तनु शाम सुलोचन० ॥ १ ॥ काल मला चुचकारुन ओढी । ठावि नसे मजही कांहीं गोडी । आरडतां कुच रगडुन सोडी । आण तुझी बाई मी नव्हे लटकी । कुंदरदन तनु शाम सुलोचन कोण बाई० ॥ २ ॥ याची माझी कधिं

ओळख नव्हति । काय पिडा ही मज भोंवती । हा परनर आग लागो माझी नवती । काय त-हा कविराय उद्धवकीं । कुंदरदन शाम सुलोचना कोण बाई मज हा नित्य हाटकी ॥ ३ ॥

# लावणी ८१ वी.

**चाल** ॥ पती गेले आज काठेवाडी । गिरनार अबूच्या पहाडीं ॥

कारटा तुझा हा द्वाड यशोदेबाई । कां पडला अमुचे डाई ॥ ध्रु० ॥ बैसुनियां यमुनेकांठीं डोळे मोडी । भलतिची घागर फोडी । गरतिला गाळिंत गांठुनि बुळी कार्डा । मजोरी ढंग ना सोडी । रांडेच्याला काय शिकविल्या खोडी । या वयांत भलतिच गोडी । कुंजामध्यें बैसुनि नाजुक मुलगी वोढी । चुच-कारुनि लुगडें फेडी । गेली उलथुन याची मस्ती । ही नित्य कायगे कुस्ती । सोसावी कुठवर तस्ती । कशी टिकेल अशानें वस्ती । कर याची बंदोबस्ती। ठायें च ठायीं । कारटा तुझा हा द्वाड यशोदेबाई । कां पडला० ॥ १ ॥ इतक्यांत दुसरी गौळण धांवत आली । म्हणे गेला उलथुनि कुठे तुझा वनमाळी । मेल्यानें माझि सुन नागवी केली । मुलगीचीं माझ्या कुचचूचुकें धरिलीं । पोरीला न कळे त्यांसि करितो बोली । भलते त्यांला खेख शिकवितो चाली । मैनिची माझ्या साळु नुकातिच न्हाली । झोंबला तिला गाई निथळत होती ओली । मातला दांडगा रांड कशाला व्याली । का घालिना आई-बहिण आपुल्या खालीं । भलतिला गवसुन हटकी । रांडेच्या काय आम्ही बटकी ? । दारांत वाजवी चुटकी । याला बसल एखादी पटकी देवानें होसिल फुटकी । रडसील अगाई । कारटा तुझा हा द्वाड यशोदे० ॥ २ ॥ आली तिसरी बडवित उर घेत असे तोंडा ।

म्हणे कोठें तुझा तो बांडा । मेल्यानें गोकुळ केलें छिनालवाडा ॥ बाटविल्या साऱ्या रांडा । तूं करसिल याचें कोड मोड या बंडा । हा घालिल तुजवर धोंडा । आम्ही शिल आपुलें मिरवित होतों झेंडा । याणें केला गडबडगुंडा । पोरिला लांच देउनि चिकण्या खांडा । वेणीचा धरितो गोंडा । गरतिला जाउनि हाटकी । रांडेच्या आम्ही काय बटकी ? । गरतिला जाऊन अडवी । वाईट जें तितकें पढवी । पोरिला चुंबुन रडवी । फेडुनियां लुगडीं उडवी । मी यावर झालें कडवी । वडवीन गा आई । कारटा० ॥ ३ ॥ मग चवथी पांचवी साहावी झाल्या गोळा । गोपीचा जमला मेळा । कोणी ह्मणती ग कोठें मांग तुझा काळा । लोण्याचा खादला गोळा । कोणी ह्मणती मुलीचा लाडु नेला बोळा । मातीनें भरला डोळा । कुणि ह्मणती याचा ढंग जाइना चाळा । आतां तर दिधला टाळा । सांपडल्यावर ह्मणती गोपाळा । मेल्याचें तोंड तें जाळा । यापरि करितो धिंगाणा । तंव तो माजघरांतून कान्हा । तों रागांत आला तान्हा । लाविते यशोदा थाना । गोपींच्या लवल्या माना । मग कविरायीं । कारटा तुझा द्वाड यशोदेबाई । कां पडला आमुचे डाई ॥ ४ ॥

## लावणी ८२ वी.

अशि कशिरे तुझि होरी हरि आवळुन धरशिल उरीं । पडेना आमुचि येथें पुरी ॥ ध्रु० ॥ नाहीं अन्नूची चाड तुला आम्ही गरति बायका । काय हा झोंकिशि गुलाल बुका । सारें अंग रंगांत बुडालें काय म्हणेल घरीं आका । न कांहींच बोलसिल मैंदा बका । सासु सासरा घरीं घरच्याला कळेल जनामध्यें टिका । होईल मग

अबरुस बसला धक्का । जळो तुझिरे पिचकारी । नको काय खेळ हा निका । मारला जाशिल येखादा फुका । हार तुटोनि गळतात मणि । धणिपणाचा शिका । मुखावर घेसि जनांचा थुका । आम्ही गरति अब्रूसाठीं जाऊं मरून । चल नंदापाशीं नेतें तुजला धरून । रंगाचें पाणिरे डोळे गेले भरून । काय हरि खेळशिल आमुचे कुच चुरून । तुझि मस्तिरे थोड्या दिवसांत जाईल जिरून । थांब तुला ही खोट जंव न लागुन बसली खरी । काढिते खेळ न एवढ्या वरी । अशि कशिरे तुझि होरि हरि० ॥ १ ॥ ऐकत होतें फार तुला तूं तर व्यसनी पुरा । जन्मला यदुवंशामध्यें हिरा । अरे चांडाळा सोड मला आग जाहली उरा । चोळाशिल काय गव्हारा गुरा । काढ गळ्यांवील हात कसा जाउनि निजमंदिरा । आणिते आपुल्या पतिला घरा । मग होरि ही तुझी निघेल चुडे फुटुन हे चुरा । जळो गाई कां आले परमेश्वरा । कान दुखावला थांब तरि कां ओढिशि फरफरा । कशाचा खेळ जुलुम हा खरा । ती असल एखादी तुजसारखी तुशीं झटल् । जी भली कुलीना ती तर तुजवरि विटल् । या दुष्कर्मे गोकुळिची वस्ती उठल् । हें पाप जोडिसि कोण्या जन्मीं फिटल् । हा रंग तुझा मजपाशीं कसारे पटल् । कधिं घरच्यांनीं जुलुम करून माझि न धरिली निरी । कवण तूं परनर यमुनातिरीं । अशि काशिरे तुझि होरि हरि० ॥ २ ॥ या परि हरिला तिणें जरब दिली । परि वरि आंतुली वेगळी प्रेम रसाची केली । स्त्रीजातिला कोण ह्मणल भोळी अथवा भली । कृतादिक युगीं मग हा तर कली । परमात्म्याची मूर्ति तिणें उरीं तर काशि लाविली । रसामध्यें पुनरपि फुस लाविली । श्रीकृष्णातें म्हणे तुझी उगि प्रीति पाहिली ॥ चाल ॥ खे ग रोखली गेली । शामा रामा उमा

चिमा भिमा यमा या मुली । जमाउनि रमा दमाची ओली । कटि कच्छ शिरावरी ती चढुन । त्या एकदम साऱ्या हरिवरि पडल्या तुटून । घेतला उसंत न वसंत सगळा लुटून । रंगलुट जहाली कंचुकं गेले फिटून । या होरीची कोणी तऱ्हा बांधिल कविजन जरी । तरी नये या कविरायाची सरी । अशिकशिरे तुझि होरी हरि । आवळुन धरसिल उरीं । पडेना आमुचिरे येथें पुरी ॥ ३ ॥

# लावणी ८३ वी.

उद्धवजी मधुवनीं । फट फट फट फट बटकीसी रतला हरि तरि काय समजुनी ॥ ध्रु० ॥ आतां काय ह्मणावें तरी । कुचुकुच कुचकुच जन बोलत गाई थुकत तोंडावरी । तिस याची कांहिं तरि सरी । कोण कुळ आपुलें बटकर धरिले उरीं । अबरूच नाहीं तिळभरी । कुठकुठ सुधा राहिना अशी काय सोदेगिरी । आम्ही काय जाणों याचे परी । पट पट पग पट आणा वाहिल्या येतो म्हणून गेला हरी । अपयश केवढें शिरीं । खळ खळ खळ खळ रडतोरे आम्ही प्राणच देऊं यावरी । अशि काय कुबडी निकी । जातिची रांड होऊन फिकी । याणें घ्यावी काय तिची लातबुकी । अशी काय मना आलि तरी हुकी । ही कशी हो लहान चुकी । शिव शिव शिव शिव कुबजा संगतीनें बरें म्हणतील काय कुणी । उद्धवजी मधुवनीं० ॥ १ ॥ आठां ठायीं रांड वाकडी । कशि कशि कशि कशि लाज नुपजली त्याला वाटली फांकडी । आम्ही तरि जातां आलों रडी । यानें यानें यानें यानें बटकुर धरिलें तिकडेच दिधली बुडी । याला जाली तिची आवडी किति किति किति किति मरतों आम्हीं परि हरी कुब्जेचा गडी । कुठें होती रांड खेबडी । नको

नको नको नको असें वाटतें यमुनेंत घ्यावी उडी । बटकिची काय परवडी । लगबग लगबग करिन आतां तिचि वेणीफणी मुद राखडी । आतां काय हरि येतो पुन्हा । कळलेंच आमुच्या मना । उगी तळमळ जिव राहिना । त्याची मसलत कांहीं समजेना । त्या सवतीनें गुंतविलें म्हणा । चर चर चर चर गळा कापिला कुठ होति रांड केरसुणी । उद्धवजी मधुवनीं फट फट फट फट बटकिशीं रतला हरि तरि काय समजुनी ॥ २ ॥ आतां काय सांगूं याला पुरे पुरे पुरे पुरे योग कशाचा भोगचि हा पातला तुम्ही तरि सांगा त्याला जिक जिक जिक जिक दुःख पिकविलें योग यदुवरचि मिळविला । वंचुनि मायबापाला । गेला गेला गेला गेला त्याला काय आम्ही बटकिस भांबावला । कांहिं तरि लाज कपट्याला । धिक धिक धिक धिक जिंदगानी गाई काय म्हणु हरि रातला । कशी भूल पडली त्याला । झुरु झुरु झुरु झुरु पंजर जालों कांहिं नये ममता तिला । कोण खडखड रांड बटकीची । रति सोडुन शुभ गरतिची । बरि मिळविली खुब सुरतिची । आतां कसि होते मति परतिची । कुठें होती रांड केरसुणी । कशी भरली याचे मनीं । जिचें नांव घेईना कुणी । हर हर हर हर शिवा पाहिं वहिवाट मोडुं नये जनीं ॥ ३ ॥ कुठ होती रांड पोटजळी । चर चर चर चर गळा कापिला । बसलिच आमच्या मुळीं । आतां जरि येतिल गोकुळीं । कर कर कर कर चाउनि खातों तिच्या नरडीची नळी । देखत लंगडी खुळी उचलुन घाना सुळीं । गुज गुज गुज गुज सांगुनि तिसी खलबत करी गोकुळीं । गोकुळ सगळें गिळी । तळ तळ तळ तळ तळमळतो जसि जळाविरहित मासुळी । बुडवुन आमची कुळी । दुड दुड दुड दुड धांवत गेला तिच्या उतरला तिळीं । आतां

राहिल अब्रु कशी । अशि कां याणें वाळगिली मिशी । कोण धांगड रांड घरपुशी । जिचि मळकट वाकळ उशी । तिजवरता माधव खुशी । कविरायाची समजुत येइना मनीं । उद्धवजा मधुवनीं ॥ ४ ॥

# लावणी ८४ वी.

चाल ॥ तंग चोळी आंगीं बरवी ॥ निसंग होऊनि बेपर्वा ॥

कांहीं नाहीं लाज पोटीं । मनुष्यांची काय दाटी ॥ ध्रु० ॥ कृष्णा तुझी खोड खोटी । झोंबु नको सोड गांठीं । जेव्हां तेव्हां आडविसी गांठीसाठीं । लाऊं नको हात देहा माझ्या । मी तों मोठ्या विलाशाची भाजा । पृथिवीचा भूप भोगी ज्याला म्हणति महाराजा । त्यानें मला काल बागामध्यें दि । हार ताजा । साखरेच्या उंच बरबी पदकांची थोर गाठी । कांहीं नाहीं लाज० ॥ १ ॥ खाशालाही हौस मोठी । मनाजोगि गांठविली । आपुलीया हातें माझ्या कंठामध्यें सांठविली । उगि नोहे मनाची हे मंदिराला पाठविली । हिच्यापुढें मोत्याची म्यां कंठि नाहीं आठविली । ऐशीलाही तोडायाला पाहसि हे कोण घाटी । कांहीं नाहीं ला० ॥ २ ॥ आतां तरि सांगतें झटुं नको हो अवयवाला । खाशाची मी प्यार साळु भीतें तुझा काय बाला । गांठीसाठीं प्राण जातिल कुण्या झाडाचा तूं पाला । हिजहुनि गोड वाटे वैजयंती काय माला । हिचा तुला लोभ झाला कविरायाचे साठीं ॥ कांहीं० ॥ ३ ॥

# लावणी ८५ वी.

चाल ॥ लाडे लाडे येतें मनरंजना ॥ उचलुनि कडेवर कां घ्याना ॥

काय म्हणून झटशिल मला मला । अशी कोण व्याली तुला । मी चंद्रावळी तशि नव्हेरे सोड नंदाच्च्या मुला मुला ॥ ध्रु० ॥

जेव्हां तेव्हां अडविशी जिला तिला । तसें गजाहि गरतिला । भल-तिच्या मुलशि सुरतिला । किती तेज तुझ्या सुरतिला, नाहाक नाहाक मारला जाशी । एखादा सोशिल । पति नाहीं भला भला । काय म्हणुन झटशील मला० ॥ १ ॥ बुडविशी आमुच्या कुला कुला । ही गोष्ट कायरे खला । चांगला दिससि रे खला । सोड तुटेल माझि मेखला । या कर्माला तुझ्या नाहक मी कुठेरे म्हणशील चला चला । काय म्हणुन झटसिल मला० ॥ २ ॥ कुणि तुला अधिकार दिला दिला । हा मार्ग काय चांगला । तव तात कसा वागला । हा छंद तुला लागला । सोडुन हे मज आतांच घेईन कविराय तुझि अलाबला । काय म्ह० ॥ ३ ॥

# लावणी ८६ वी.

पळुं नको थांब गवळिया तूं ॥ ध्रु०॥ जातें यशोदेच्या पाशीं । तुला बांधाविनें खांबाशीं । कोठें जाशी चोरा किति लांबरे । पळूं नको थांबरे० ॥ १ ॥ असा कारे मस्तवाला बोलुनियां होशिल बाला । जळो तुझा मेवा नको जा बरे । पळूं नको थांबरे० ॥ २ ॥ मला वाटे आई बाला । देऊनियां जाशि बाला । कविराया तुला बरे० पळूं नको थांबरे गवळिया तूं० ॥ ३ ॥

# लावणी ८७ वी.

कांहीं लाज यशोदेच्या पोरारे ॥ ध्रु० ॥ जेव्हां भेटे तो मज तेव्हां । हाटकी दावी मेवा । करूं मी काय देवारे । कांहीं लाज यशोदे० ॥ १ ॥ केला अनर्थ काल सेला । देउनिया एक्या गेला । मुलिसी द्वाड मेलारे । कांहीं लाज यशोदे० ॥ २ ॥ भेटा म्हणोनि चाखी ओठ । भय नाहीं सोनाट ॥ कविराय खोटारे ॥ कां० ॥ ३ ॥

# लावणी ८८ वी.

**चाल** ॥ पती गेले हो आज काठेवाडी । गिरनार अबूच्या पहाडीं ॥

नंदात्माज मंदं मंदं मा याहि । तुज अबरुच नाहीं ॥ ध्रु० ॥ गेहादपसर त्वमितः कंसारे । जन जागति सारे । कांतादेकांतः किमुसंसारे ? हे नेणसि कांरे ? । कामादिह भयं न लज्जा जारे । येथुनिया जारे । लोके निजजनकयशस्त्वं पाहि । स्वकुळातें पाही । नंदात्मज मंदं मंदं० ॥ १ ॥ दैवादिह जीवस्यहमतिगूढा । कां नेणसि मूढा । श्वश्रूःसंप्रति मयि कोपारूढा । कां भरशी हूडा ? । केषामपि करगा भवति नवोढा ? । किति होसिल वेडा । सिंहादप्युग्रतरो मे भर्ता । सावध हो पुर्ता । मन्ये त्वज्जीवनस्य मथन कर्ता । बोलावूं आर्ता । मा भूत्ते जीवितसंशयवार्ता । वांचुनि जा पर्ता । जाने त्वं मदनार्दंतर्दाही । कविराय असा ही । नंदात्मज० ॥२॥

# लावणी ८९ वी.

**चाल** ॥ मोत्याच्या झालरा कळस तुझ्या न्हाणाच्या मखरा

उभी राहून लाजून बोलशी, किती करशील नखरा ॥

राधा मुखरणमध्यें मिळल्या आणिक त्या गवळणी । विरहातुर बोलती सख्यानो गेला यदुकुळभूषणमणी ॥ ध्रु० ॥ कोठें होति जपून विवशी मथुरेमधिं वांकडी । सांड मिळाली कुब्जा त्याला कशि वाटली फांकडी । आम्ही येथें किती रडावें हरि दासींचा गडी बाळ मित्र म्हणूं नये कासिग बाई तिकडेच दिधली बुडी । या जाउनि तिथेंचि रहावे ही तर कसि आवडी । यांत सुगर म्हणू जळो गाई बटकिचि किति पाखडी ॥ चाल ॥ आम्ही बुडलों प कुबडी ती तर कुब्ज खरी । यत्न न करितां बसले जागा तिणें मि

विला हरी । साऱ्या आम्ही उदास बसलों बाई यमुनेच्या तिरीं ॥ चाल ॥ या विरहामध्यें कसें जगावें रतिरंगाचा धनी । टाकुनि गेला आम्हासि आतां कैची वेणीफणी । राधा मु० ॥ १ ॥ ज्याच्या साठीं आम्ही पतीची मर्यादा सोडिली । गोष्पद मानुनि दिनांत शतदां यमुना वोलांडिली । कुंजलतेचा महाल मानुनि रमलों आम्ही मुली । जनांत याचेसाठीं कुळाची अपकीर्ति साहिली । शेवट केला असा तयानें दासी अवलंबिली । काय करावी दुर्दैवाची गति आम्हा भोंवली ॥ चाल ॥ त्याला आमची दया नसो पण लज्जा नाहीं कशी । कोठें होती रांड कळेना कोण सवत घरघुशी । या कपट्याची संगत करुनी पडलों आम्हीं फशी । पहिलेपासून ठाउक होता हा नंदाचा गुणी । संगत यासि करूं नये परि मसलत पडली उणी ॥ राधा मु० ॥ २ ॥ प्राणावांचुनि तनु तशा हरिवांचुनि झालों पहा । नवस करा रांडांनो कांहीं तरि देवाला वहा । जोशी पंचाक्षरी जाणतां कुणी एखादा पहा । देवावर घालवूं नका गे यत्न करावे दहा । रांडेच्या नादास गुंतला पुनरपि येतो न हा । धन्य म्हणा गे सुत नंदाचा कीर्ति मिळविली अहा । याचें आमचें विरुद्ध नसतां कसा कापला गळा । लालुच दाउन गडे बुडविलें याणें आमुच्या कुळा । सोळासहस्र गोपी टाकुनि किति बटकी चालला । गोकुळ सोडुन कविरायानें मथुरेमधि छावणी । केली याचें निदान ऐका हरि दासाचा ऋणी । राधा मुखरण मधें मिळल्या आणिक ही गवळणी० ॥ ३ ॥

## लावणी ९० वी.

राधिका रमण गोविंदा नको येऊं तिंदा माझ्या गेहीं ॥ ध्रु० ॥

गाया मिळाली रांड तुला ती दांड चेटकी दासी । छी म्हणतां

येशिल चोरा फजितखोरा दारापाशीं । मत्पति हा मोठा वाट करूं नको थाट मारला जाशी ॥ चाल ॥ गरतिच्या भोंवत्या घिरट्या घालिसि किती । सवतिच्या घरीं जा चाकर होई श्रीपती । मी चंद्रावळ नांवाची आहे हो सती । कां करिशी यशाचा तोटा होसिल खोटा मानवदेहीं । राधिका रमण० ॥ १ ॥ घेऊनियां हातीं फणी घालिशी वेणी रांडेपाठीं । तिजवरतें वारिसि चामर दिससी पामरसा रतिसाठीं । अबरुचि नाहिं तुज चाड कितीरे द्वाड तुझी ही घाटी ॥ चाल ॥ ती राधा तसि मी नोहें व्यभिचारिणी । पापाची होईन कां मी अधिकारिणी । मजवांचुन अबला कोणती कुलतारिणी । ती असेल तुझी कुणी प्यारी करीं जाया रीति जसा देहीं । राधिकारमण गोविंदा० ॥ २ ॥ मी सांगुन चुकतें तुला नव्हे तूं भला गवळ्याच्या पोरा । सोडुन दे माझि वाट चालेना हट तुझा नाहीं जोरा । जातीनें काळें आंग हुडिकसिल रंग गोपीचा गोरा ॥चाल॥ गोकुळांत सगळ्या ठिवलिस अबरू भली । इवक्यावर ऐसी हालऊं नको जिभली । कविराय म्हणविसिल जनांत कर्मे मनांत टाकुनि देहीं । राधिकारमण गोविंदा नको येऊं तिंदां माझ्या गेहीं ॥ ३ ॥

## लावणी ९१ वी.

बोलं तरि कायरे सांवळिया मी ॥ ध्रु० ॥ येसि जासि सासू । मोठी बाट सासू । किति वेळ जारा धरुं पायरे । बोलं० ॥ १ ॥ दाऊनियां खोट्या रंगा । झोंबसि तूं माझ्या आंगा तुझ्या वादा उठ जायरे । बोलं तरि कायरे० ॥ २ ॥ खो । संसारीं । बरे नव्हे कंसारी । यदुवंशीं केला कीर्तिचा शि॥

दुजे नाहीं काम गेला कुब्जेच्या वऱ्हाडा । येऊं नये दारा कविराय रे । बोलुं तरी कायरे सांवळिया मी ॥ ३ ॥

## लावणी ९२ वी.

श्रीरंग गोपिकोत्संग धरुनि करि रंग हरी हा बाई । कुंजांत मातला वसंत सांगु मी काई ॥ ध्रु० ॥ तो कंजरसाचा पुंज बांधिला गुंज तशा मधिं मुरली । अति मंजुळ हरिनें वदनसरोजीं धरली । थयिं थयिं नूपुरें वाजती चरणीं झणत्कृति भरली । त्या रसिकव्रजांतिल सुंदर तितुकी सरली । अति मंद शितल सुगंध जाति निष्पंद मरुत्कृति भरली । ती शोभा नच वर्णवे रमा अवतरली ॥ चाल ॥ रंगांत गोपिच्या पडल्या, किति उड्या । किति रासमंडळीं जडल्या, होत्या सड्या । किति श्रीहरिच्या तोंडीं देति विड्या ॥ चाल प० ॥ या सार सुखा नाहिं पार काय संसार हरीच्या पायीं । या चित्तवृत्तिला दुजें सुचेना कांहीं । श्रीरंग० ॥ १ ॥ तूं जरी रुसुनियां घरीं मंचकावरी बैसलिस भामा । तरि काय हरीला उण्या सुरसिका रामा । हा भाग तुझा तरी लाग नको धरुं राग रिझवि गुणधामा । जी रसिक नव्हे ती स्त्री न म्हणावी पामा । किति मुली मिळाल्या हुलीस त्याच्या कुळीं किं कुशला वामा । श्रीमाधवसंगें गडे पुरविती कामा ॥ चाल ॥ किति गुलाल रंगें, भिजविल्या । किति मानवती मदभंगें, निजविल्या । किति रतिसुखसंगें, रिझविल्या ॥ चा० प० ॥ हा हाट हरीचा मांडिला वाट सुचेना कांहीं । या मुखें वदूं किति पिचकाऱ्यांची श्रीरंग० ॥ २ ॥ मधुकरी पंकजावरी तशा एकसरी धांवल्या । गेलि उमा रमा सखु साळू मैना चिमणी । चल ऊठ जाऊं पडूं नये तूट हरीच्या चरणीं । या परि मग समजुन

गेल्या दोघी गडणी । त्यापाशिं मिळाल्या रसीं उतरल्या नंदजाचरणीं । हा स्त्रीजन परि भगवत कृपानिधि करणी ॥ चा० ही वसंतमाधव होरी. कोणि शिका । जरि गातां हरिचा थोमवभी कां । जर वर्णन करितां चोरी, करुं नका ॥ चा० प० ॥ पर्व पावलें सर्व नको धरुं गर्व तरी कविराया । धनवान कोणाचे बाप कुणाची माया ॥ ३ ॥

# लावणी ९३ वी.

या प्रपंचिं सौख्य तुला कायरे ॥ ध्रु० ॥ देणेंकरी ओढि मुलेंबाळें तोडिती । कर्कशा हे रांड ती साऱ्या वीळ भांड ॥ १ ॥ रोगें तनु पीडिती इंद्रियें हीं सोडिती । अनुभव या रीं कविराया जागती ॥ २ ॥

# लावणी ९४ वी.

चाल ॥ पती गेले हो गेले काठेवाडी ॥ गिरनार अबूच्या पहाडीं ॥

या भवांत सुख पाहसी हें काय ? ॥ ध्रु० ॥ श्रम दिननिशीं विकरसी । कधीं हरिपदगंगेंत नाहासी । मन करुनी सुमन कधिं वाहस, हरिपदिं होउनी गाय ॥ १ ॥ हितवती नरतनु, विफल गमावुनी भुललासि किति तरी वैभवविपिनीं । फट फट निशिदिनीं खटपट व्यर्थचि जाय ॥ २ ॥ नटशिल किती जनीं अभिमान उभा मनीं, कधिं होसि नम्रपणी शरण कविराय ॥ ३ ॥ या भवांत सुख पाहसी हें काय ॥

# लावणी ९५ वी.

चाल ॥ पती गेले हो गेले काठेवाडी । गिरनार अबूच्या पहाडी ॥

संत थोडे थोडे थोडे थोडे ॥ ध्रु० ॥ कलिराजाचें राज्य हो यतीस बसाया घोडे । उंट पालख्या लाल बनाती

े जोडे जोडे ॥ १ ॥ तुळसी काष्ठें गळयांत असुनी दार-
ाचे ओढे । नेणती कांहीं पाया पडती खोडे खोडे खोडे खोडे
। २ ॥ त्यास कसे हो कविरायाचे शब्द लागती गोडे । अपक्क
जन बहु जगांत हिरवे दोडे दोडे दोडे दोडे ॥ ३ ॥

## लावणी ९६ वी.

दोदिवसांची, ननु हे साची, सुरतरसाची, करूनि मजा ।
जा करितां मनिं उमजाना हें सुख न पुढें पडेल वजा ।
ई सावध व्हा ॥ ध्रु० ॥ आज उद्यांचा पूर नद्यांचा वयल-
द्यांचा बहर नवा ॥ उलट्या झाल्या कुलटा रांडा मग कोठिल
शो माल पुवा ॥ पाट बसाया ताट रुप्याचें दाट त्यामध्यें दूध-
वा ॥ धना वयाला बसेल घसरा मग विसरा हो गोड खवा ।
ंडापोरें वंचकचोरें जंवर मिळवितां तंवर थवा । शितें तंवर तीं
ं भोंवतीं कोण कुणाचा सखा जिवा ॥ जोंवरि पैसा तोंवरि
ा मंचाकिं म्हणतिल ध्याल हवा ॥ बेटाबेटी हातीं नरोटी देतिल
। खूप समज ठिवा ॥ पात यांत कें घात होतसे हात जोडितों हरिसे
जा ॥ फुका सुखाला मुकाल कथितों न कालचा दिन आज दुजा ॥
ं दिवसांची ननु हे सा० ॥ १ ॥ भाई सावध व्हा कनकधनाचा
मदनाचा वोसरल्यावर रंग फिका ॥ रुका न पदरीं विकाल घर मग
गम भरजरि कुठुन हुका । गजरथघोडा कलगी तोडा पायीं जोडा लाल
। तोडा जाऊनी खोडा येईल बसेल एखादा धरमधक्का ॥ सुगंधशाला
दुशाला गरम मसाला पान पक्का । हारतुरे हे बरे न पुढती
हाल खळाल बुका । कोकशाला नाटकशाला दासी यांचा
ल मुका । कामुक होऊनि कां मुकतां परमार्थसुखाला देह
। कदमसुलाजायांत भुला जा तुम्हां न लाजा मनिं समजा ।

दूत यमाचे मूत आणितील नेला तुमचा बाप आजा। दोदिवसांची० ।। भाई सावध व्हा ।। २ ।। पुरे करा या मौजा तेथुनि फौजा झाल्याची रवाना । यमदूताची ढाल विनीवर बाल सफेदी देखाना । पुढें यमाचे खडे दूत हे बडे हरामी समजाना । मारा मारतिल फार कुणी मग मामा काका गौसेना । रांडा आतां मांडा चारिति खांडा म्हणतिल करा चुना । मूल कुणाचें भूल तुह्माला चूल चालती तंवर म्हणा । तडका येतिल सारे अडका हुडकायाला मरतांना । पीठ गिळेना मीठ मिळेना ऐसें करितिल ऐकेना । वेडा होईल परिजन वेडा ह्मणातिल पढा आठिव जा । अडला भूवरि पडला मग तुह्मी रडला न म्हणा काळ खुजा । दो दिवसांची० ।। भाई सावध व्हा ।। ३ ।। सुभा करुनि मनसुभा येखादा उभा करा परिवार भरा । काय तुह्माला यांत साचले आंत वाचलें आयु धारा । दारजनाला हार नगांचे भार मुलिस मुलग्यास तुरा । घ्याल पुन्हा जरि घ्याल न देतिल तुम्हासि त्यांतिल जरा चुरा । कां मरतां घनलोभें फिरतां पुरता याचा शोध करा । कोण तुम्हाला वाली तो वनमाली लाविल पैलतिरा । लोहघनाच्या जाड कवाडा आड बसा कीं बाडा चिरा । काळ सखत पाताळ तळांतुनि काढिल अंवुधिमाजि शिरा । फार कशाला सार सांगतों बारबार जन्मा नव जा । कविरायाचा बोल नव्हे कीं फोल डोल ध्यानीं उमजा । दो दिवसांची० । भाई सावध व्हा ।। ४ ।।

## लावणी १७ वा.

भला जन्म हा तुला लाधला खुलास हृदयीं बुधा । धरिस तरि हरिचा सेवक सुधा ।। ध्रु० ।। चराचरीं गुरु तरावयाला न शिरावरि हरी । जरा तरी समज धरी अंतरीं । हटातटानें पट

रंगवुनि जटा धरिशि कां शिरीं । मठाची उठाठेव कां तरी । वनांत अथवा जनांत हो कां मनांत व्हावें परी । हरीचें नांव भवांबुधीं तरी । चा० ॥ काय गळ्यांत घालुनि तुळशीचीं लांकडें । हीं काय भवाला दुर करितिल माकडें । बाहेर मिरविशी आंत हरिशीं वांकडें । अशा भक्तिच्या रसा रहित तूं कसा म्हणविशी बुधा । हरिरस सांडुनि घेसी दुधा ॥ भला० ॥ जाळ गळ्यामाधिं माळ कशाला व्याळ काम कोपला । आंतुनि बाहेर म्हणविशी भला । वित्त पाहतां पित्त येतसे चित्त पाहिजे मला । असें हरि म्हणतो नुमजे तुला । दांभिक वर संभावित अभ्यंतरीं नाहिंस बिंबला । बहिर्मुख नर नरका लाधला ॥ चा० ॥ तूं पोटासाठीं करि खटपट भलतिशी । परि भक्ति रसाविण हरि भेटेल काय तुशी । काय मौन धरुनियां गोमुखिला जाळिशी । स्वार्थसुखें परमार्थ बुडविला अनर्थ केला मुधा । न जाणसि कांजी म्हणसी सुधा । भला० ॥२॥ शिळा टोपिवर शिळा पडो या बिळांत करिसी जपा । तथापि न होय हरीची कृपा । दर्भ मुष्टिच्या गर्भि धरुनियां निर्भर पशुची वपा । जाळिशी तिळा तांदुळा तुपा । दंडकमंडलु बंड माजविशी मुंड मुंडिशी तपा । न सार्थक लटक्या साऱ्या गपा ॥ चा० ॥ ही बार बार तलवार येइल काय पुन्हा । ह्या दुर्लभ नरदेहांत ठेविशी कुण्हा । भगवंत भुकेला भक्तीचा पाहुणा । वर्म कळेना धर्म घडेना कर्म चित्त न द्विधा । सदा हरि कविरायावर फिदा । भला जन्म हा तुला० ॥ ३ ॥

## लावणी ९८ वी.

नर जन्मामधिं नरा करुनि घे नर नारायण गडी । तरिच हे सार्थक मानवकुडी ॥ ध्रु० ॥ बा चौऱ्यांशी लक्ष वेळ संसार पडला

गळां । चिंतेचा पिकला मळा । दार धनाचा लोभ टाकुनी झटकर हो वेगळा । हा कसा उकलिशी पिळा । धनानिमित्तें जनापुढें तूं दाविसी नाना कळा । किती तुला मुलाचा ळळा ॥ चा० ॥ तूं पडूं नको याचे भरीं । तुझ्या हें खापर फुटतें शिरीं । तुला मी गोष्ट सांगतों खरी । आतां कर तांतडी । ही पुन्हा नये बा घडी । नरजन्मामाधिं नरा० ॥ निपट बावळा या विषयाच्या मागें लागसि कसा । कां होसी बा धड पिसा । वयोधनांची किती चंचळ गति कां धरिशी भरंवसा । हें सकल मनाला पुसा । उदरासाठीं दुर्धनिकांच्या पुढें पसरिशी पसा । किती उगाळिशील कोळसा ॥ चा० ॥ हें तुला शिकविलें कुणीं । दयाळू नरनारायण धनी । अझुनि तरि करी ही घोकणी । विषवल्लीची जडी । तूं म्हणशिल साखर खडी । नर जन्मांमाधिं नरा० ॥ २ ॥ नवस कामना करुनि मनामाधिं म्हणशील शील पुरुषोत्तमा । दे संतत विपुला रमा । विषयवासना तुला तुटेना मानसिं या संभ्रमा । काय पुढें बोलशील अधमा । किती प्रपंचामध्यें फिरुनियां पावसि विफल श्रमा । कां करिशी भजनोत्तमा ॥ चा० ॥ हें कसें तुला भावलें । करावी अचळा दारामुलें । ळेना पुढती हें बाहुलें । कविरायाची उडी दाविली भवार्णवाची । ‌डी । नरजन्मांमाधिं नरा० ॥ ३ ॥

# 'लावणी ९९ वी.

ऐक सज्जना अरे मनमोहना संपत पाहतां कवणाची । जाइल काया जाइल माया उसणी आणिली पांचांची ॥ ध्रु० ॥ कौरव गेले पांडव गेले वदली वाणी व्यासाची । छप्पन कोटी यादव गेले काया उरली कृष्णाची ॥ १ ॥ रावण ज्ञानी तो आभिमानी खंडें केली वेदांचीं । तेहतिस कोटी बंदि घातले घडि-

घडि त्यांना तो जाची ॥ २ ॥ सूर्यवंशीं राम जन्मला केवळ माय भक्तांची । हुनमंतानें अब्धि लंघिला नगरी जाळिलि सोन्याची ॥ ३ ॥ चापपाणी बाण वर्षतां कुडी पाहिली बा त्याची । रावणाची शिरें मोकळी काग हो त्याला टोंची ॥ ४ ॥ अठ्यायशीं हजार ऋषिवरामध्यें वार्ता मार्कंडेयाची । चौदा कल्पें उष्ण सोशिलें नाहीं छाया गुंफेची ॥ ५ ॥ लोमहर्षणा लोभ झडे तै संख्या पुरे आयुष्याची । ऐसे ऐसे होउनि गेले काय कथा हो आणिकाची ॥ ६ ॥ कितिक येती कितीक जाती घिरटी होते काळाची । ज्यांचे गांठीं पुण्य नाहीं यम हो त्याला बहु जाची ॥ ७ ॥ सावध व्हावें भजन करावें भक्ति करावी देवाची । आतां परिही गोष्ट आयका नारायण श्रीरंगाची ॥ ८ ॥ ऐक सज्जना अरे मनमोहना० ॥

## लावणी १०० वी.

बा काय घालिशी संसृतिचा पिंगा । या मानव देही भजरे श्रीरंगा ॥ ध्रु० ॥ चौऱ्याशीलक्ष हे फेरे फिरुनि सारा । बा आलासि येथें नरतनुसंसारा । हे पुत्र कुणाचे कन्या आणि दारा । ही काय मिळाविसी भंवताली बारा । अविवेक सुटला तुफान हा वारा । बा कसा उतरशिल भवांबुधिपारा ॥ चा० ॥ स्त्री म्हणशील माझी तरि हे परावी । बा सन्मति आतां कधीं रे धरावी । हे विषय वासना मनिंची नुरावी । यासाठीं सांगतों धरि सज्जनसंगा । हो सावध ना तरि काळ करिल दंगा । बा काय घा० ॥ १ ॥ या जगीं पसरली श्रीहरिची माया । तूं म्हणशील माझी तनु सुत धन जाया । भ्रांतिनें तपेलें पाहशील वुडवाया । ही पुन्हां मिळावी तुला कुठून काया । या आशातृष्णा मिळुनि

आया बाया । तुला पाहती सफई बुडवाया ॥ चा० ॥ ही रांड दुराशा नकोरे धनाची । धरि लज्जा कांहीं आपुल्या मनाची । दुर्दशा प्रपंचा मधिंरे जनाची । हा लोभ देहिंचा सुख बाहेर अंगा । बा आंतुन लागला काळ भिरडभुंगा । बा काय० ॥ २ ॥ परिणाम आपुला होईल हा कैसा ॥ हें ज्यास कळेना तो नर पशु तैसा । तुज कामुक लोभ स्त्रीचा जो ऐसा । ते वंचक म्हणतिल मंचाकिं हो बैसा । हें हाड उगाळुनि जिस देशील पैसा । ती तुला मानिते निज सेवक जैसा ॥ चा० ॥ बा मुक्ती तुझ्या घरची बुडाली । साधु जनामध्यें पतही उडाली । अविवेकें सन्मति सगळी दडाली । मृगमद हे टाकुनि करिं घेशिल हिंगा । कविराया चतुर परि कलि पडला बिंगा ॥ ३ ॥ वा काय घालसी० ॥

# लावणी १०१ वी.

हरिच्या पायीं गड्या न करशिल किति प्रपंचग्रामध्यें लगट । नरपशु तनु मानसिल सगट । फट फट फट ॥ ध्रु० ॥ कोण कुणाचा प्रपंच वेड्या कां भरलासी उगाच भरीं । वंचक सारे दूर करीं । हॉ तुज अंतीं लोटुन देतिल यांत पडेना तुझी पुरी । हरिपद नौका जवळ करी । या घोरानें फुकाच मरशिल कसें कळेना तुला तरी । कां घेशिल हा भार शिरीं । संतजनाचे पाय धरी बाहे देखत भूल खरी । बुडशिल माया काय वरी । अनुदिनिं कथितों तुला स्वहित मी मधुरिपुगुणकिर्तनीं झगट । तनुधन खोटें जरी तगट । फट फट फट । हरिच्या० ॥ १ ॥ संतजनाचा संगम धरशिल तरि चौऱ्यायशी तुझी चुकल । ना तरि हें सारेंच झुकल । जोंवरि मिळविशि पैसा तोंवरि कुटुंब सारें तुझें वकल ।

परिणामीं हें कसें विकल । वृद्धपणामधिं अशक्त होशिल आंगावरला केस पिकल । रांड कशी मग जवळ टिकल । कांहीं धरावी जरा अकल । कर बुद्धीला बरि शिकल । हें जग मायामधीं नकल । यासाठीं बा सावध करितो तुला कळेना आहे प्रगट । वय गेल्यावरि होशिल मुगट ॥ फट फट फट ॥ हरिच्या पायां० ॥ २ ॥ तूं म्हणासिल ही दौलत माझी सारें मज भोंवतें कटक । कां घेसिल ही करून अटक । स्त्रीच्या लोभें अनंत चकले तुला लागली इची चटक । या मोहांतुनि दूर सटक । दों दिवसांची जाइल भरभर तोंड करशि पांढरें फटक । सारें होतिल तुला तुटक । हरिभजनाची लाव लटक । भगवज्जन यामाजि घटक । त्यांला जाउन जरा हटक । तूं तरि डोळेझांक करिशि हे माया मोठी आहे चिकट । कविरायाची तऱ्हा बिकट । फट फट कट ॥ हरिच्या पायीं० ॥ ३ ॥

## लावणी १०२ वी.

अरे सख्या समज धर कांहीं । हरिवांचूनि संसारीं । कुणाची भर करशिल सारी ॥ ध्रु०॥ अरे सख्या मानसिल माझे धनसुत हे मतिमंदा । मनामध्यें न धरशी गोविंदा । अशा नरदेहीं स्वहिताचा कर धंदा । नको मन विषयावर तिंदा । निदानीं तुजला । तारिल हा कंसारि । इतर भोंदु न दुजा तारी । समज धर कांहीं अरे सख्या समज धर० ॥ १ ॥ अरे सख्या जाडिशिल पैसा धांवुनिया दिनराती । परावी घरीं बैसून खाती । विचारुन पाही कुण आहे सांगाती । तुला वाटते ही मज गाती । धरावा चित्तीं बा एकाचि गिरिधारी । म्हणू नये दुसरा शेजारी । समज धर कांहीं अरे सख्या समज धर० ॥२॥ अरे सख्या ओढिताल सारे धन नाहीं करिं अडका ।

जरेनें कच होतिल सडका । कुणाच्या दारीं बा लोळशि मग रडका । शरीरीं गद देतिल थडका । स्वहित कविराया विसरुनिया अवतारीं । कुणाची तरि करिशिल वारी । समज धर कांहीं अरे सख्या समज धर० ॥ ३ ॥

# लावणी १०३ वी.

खोडा हा संसार जनाचा । सारा लोभचि दारधनाचा ॥ ध्रु० ॥ कोणाला अनुताप घडेना । कोणीही साधुपथांत पडेना । कोणाचा अभिमान झडेना । कोणाची मतिही मुरडेना । कोणी श्रीहरिला आवडेना । कोणावांचुनि कोणी अडेना । जपाला काय करितो पुण्य कळेना पाप । मूढ असे हे नरकीं पडती आपोआप । कांहीं मार्ग न साधुपणाचा । खोडा हा ॥ १ ॥ नाना जन्म अशाच भवाला संपादुनि कोणी न निवाला । कांहीं लाज नसोचि जिवाला । भोगूं पाहती या विभवाला । हर्षें मागति सांबशिवाला । मोठ्या संततिच्या प्रभवाला । कुपामाजीं अमार्गें जसे पडावे अंध । विषयीं पडुनी पावतसे भवाला बंध । दगा नेणतिया निधनाचा । खोडा हा सं० ॥ २ ॥ मायापाश न कसा कळावा । आतां काम कधीं आकळवा । ऐसा कायही काय ? मिळावा । मोहाच्या चरकांत पिळावा । याचा आरिगण कैं निखळावा । दारा घालति यास कळावा । प्राकृत जन हे मानसिं धरिति नाना काम । कन्यासुतादि वदनीं कैंचें हरिचें नाम । कोठें हो कविराय मनाचा । खोडा हा संसार० ॥ ३ ॥

# लावणी १०४ वी.

क्षणभरि गारे कोणी क्षणभरि हरिच्या नामा ॥ ध्रु० ॥ निशिदिनिं धुंडितां परि सुख नाहीं । उगिच तनु दंडिता त्यांत न कांहीं । भगवें

गुंडाळितां खवळती सहाही । यामुळें सांगतों सोडा मोडा कामा । क्षणभरि गा० ॥ १ ॥ कां मनिं वाहतां ही भवाचिंता । दिननिशी पाहतां अभिनव संता । सुखमय राहतां जरि अनहंता । मोहुनी गुंतला खोट्या मोठ्या रामा । क्षणभरि गारे को० ॥ २ ॥ धनसुत बायका ठका या खळसगा । निवटुन आयका या कीर्तनरंगा । मन्मथसायकांचा हा दंगा । जा किरे कविरायाच्या साच्या धामा । क्षणभरि गारे कोणी क्षणभरि गारे हरिच्या नामा० ॥ ३ ॥

# लावणी १०५ वी.

येउनिया नरजन्मासी कांहीं तरी जाणवारे ॥ धृ० ॥ रक्षुनिया धनसुतदारा निजकारणें शोषिलीं । भवतालीं मिळवून वारा हीं चोरें पोषिलीं । ना देतिल तुजला थारा त्वां मोठीं तोषिलीं । किती सांगू मानवारे । येउनियां नरजन्मासी ॥ १ ॥ संसारचि सारा खोटा कां होसी बावरा । या उदमा येइल तोटा बा कांरे हांवरा । काळाचा बसल्या सोटा मग ह्मणशील आंवरा । दुर्मतिला खाणवारे । येउनिया नर० ॥२॥ तूं म्हणासिल माझी रामा सुकुमारी गोरटी । परि परिणामों तुझिया येइल काय चोरटी । वंचुनियां कवडी दामा घेतिल हीं पोरटीं । कविराया मानवारे । येउनियां नरजन्मा० ॥ ३ ॥

# लावणी १०६ वी.

संसार कुणाचा गड्या काय खटपट करशिल बाही ॥ ध्रु० ॥ हा घोर तुटेना तुझा साधुचा कधिं संगम धरिशीरे । मानवा नवाजिक तनु मिळाली परि विफळा करसिरे । रांडेच्या नादीं भरुन कुणाचीं किती पोटें भरसीरे । अविचार करुनियां असा जरासा तरि लाजसि कांहीं । संसार कुणाचा ॥ १ ॥ हा भार धरुनियां शिरीं प्रपंच्यामध्यें बुडशिल कैसारे । धनिकाच्या मागें पुढें फिरुनियां किती मिळविसि पैसारे । अजुनि

कळेना कसा भास हा मृगजळिंचा जैसारे । या दारसुनांच्या भरिं भरुनियां सुख तुजला नाहीं । संसार कुणाचा० ॥ २ ॥ तू कोण कुणाचा नरा कुणाची नरतनु जातीरे । हा प्राण करुनियां पिसा वयाची किति करसिल मातीरे । बा काय तुला भरंवसा कुणाच्या तरि नाहीं कांहीं हातींरे । कविराय करुनि घे सखा सुखाचा निधि होसिल पाहीं । संसार कुणाचा० ॥ ३ ॥

## लावणी १०७ वी.

पहा विचारुनि सार असार वचन मनांत धरा न धरा । काम क्रोध हे मारा मग तुम्हीं साधन अन्य करा न करा ॥ ध्रु० ॥ नाशशील संसार अशाचा मोह मनीं धरिला लटका । काळ सदा सर्वत्र हिंडतो निर्दय बांधुनियां पटका । किती गज हय खर पक्षी सर्प कपि सारमेय योनिंत भटका । मासपक्षसंवत्सरमानें काळ म्हणे भरली घटका ॥ पहा विचा० ॥ १ ॥ पदीं लागतों सत्य, सांगतों निश्चय मोडुनिया काडी । एकांतीं कृत पापपुण्य परि सर्व देव करितील चाडी । आत्मभावना अधिंच करावी संसृतिची झाडाझाडी ॥ समजा मनिं मग कसा लागतो ज्ञानदीप जळतां दाटी ॥ पहा वि० ॥ २ ॥ विधिहरिहर पुरुषोत्तम ईश्वर सुरेश्वर नर मानव फसवी । सारे जाणते तरती इतरां नेउनियां नरकीं बसवी । टाकुनि भार्या सद्गुरुपाया भजतां मोक्षपदीं ठसवी । जनिं गंगाधरसा स्मर जिंकुनि दुर्लभतर नर यक्ष बसवी ॥ ३ ॥ पहा विचा० ॥

## लावणी १०८ वी.

श्रीनाथ सद्गुरुपदा, भजा आपदा काव्यसंपदा, जोड कंसारी कर विचार पाहे काय आहे संसारीं ॥ ध्रु० ॥ आहे संपत जोंवरी, सर्व तोंवरी, आप्त सोयरीं, चहाती धनधामा । गणगोत येति मग

धांवुनि काका मामा । विषयामधीं होऊनि दंग, उडविशी रंग, निशिदिनीं संग, चढावेशी कामा । तनु धन मन खर्चुन तरुण मोहिशी रामा । किती यामधीं आशिल नटुन, रहा दूर हटुन, गुरुपदीं झटुन, साध निज प्रेमा । कांहीं उमज शेवटीं कोणि नये बा कामा ॥ चाल ॥ या दुष्कर्मामधीं सारें वय खचल । हा विचार बारे आतां कधिं सुचल । नरदेहकांच ही न कळे कधिं पिचल । धरि सद्गुरुची तूं कांस धरी सहवास होउनी दास दुष्कृती सारी । श्रीनाथसद्गुरुपदा० ॥ १ ॥ भलताची करिशी अधर्म सोडुनी कर्म कळेना वर्म, आहे गुरुपाशीं । गुरुकृपेंचि येशीं बारे नांवरुपाशीं । सुस्वभाव निजमनीं भाव तरि च निभाव, धरी दृढ भाव, सुसंतापाशीं । ते समूळ छेदितिल प्रपंचसंतापासी । गुरुपाय न करतिल काय, रक्षिती काय मायबापाशीं । त्या शरण जाच पडूं नको यमाच्या पाशीं ॥ चाल ॥ या प्रपंच घोटाळ्यांतुन रहा तुटक । किति जन्मभरी विषयाची तरी चटक । आतां पुरे पुरे डोहांतुनि चल सटक । हें सर्व मायेंचे कटक, यांतुनि इटक करुनि घे अटक, नरतनु सारी । विषयाची कशी अजुनि नयेचि शिसारी । श्रीनाथ सद्गुरुपदा भजा० ॥ २ ॥

# लावणी १०९ वी.

झाला पहा हो मानव कीं सोडा धना तुम्ही कामिनी भक्ती ही लागो हरिपदीं ॥ ध्रु० ॥ भाग्याच्या पडता भरीं आधीं अंतरीं कास याला धरशी । विषयाची न सुटे आशा वाटे यशा घालावया करशी । तारुण्य नटशी किती दिवसांची रति मानवा कां मरशि । अरे कांहीं जाण व्हा ॥ झाला पहा हो० ॥ दैवानें मानव जनु त्यांतही तनू साधनाला फुटकी । मोहानें धनकामिनी आणितां मनीं भाव नाहीं लटकी । वंदा या पुरुषोत्तमा

मानसीं रमा जाणुनि ध्या कुटकी। मदनाचे संगती। झाला पहा रिं हो मानव० ॥ २ ॥ या रामा अति वावड्या मानितां वड्या साखरेच्या स्वमनीं। होता भवसंगमीं वाउगें श्रमी कल्पनेच्या भ्रमणी संसारीं। कविराय हा वाटतो पहा वासनेच्या दमनीं। भवपाशीं गुंतला ॥ झाला पहा हो मानव कीं सोडा धना तुम्ही कामिनी० ॥ ३ ॥

# लावणी ११० वी.

**चाल** ॥ केशव करणी अघटीत लीला नारायण तो कसा ॥ जयाचा सकल जनावरी ठसा ॥

मृगजळवत् जग उद्भवलें हें जाण सर्व माया। देखत भूल हें समजुन कां भुलशिल वाया ॥ ध्रु० ॥ हो सावध हो सावध मूर्खा भुलुनि नको जाऊं। मदांध होउनि परस्त्रियांचीं मुखें नको पाहूं ॥ चा० ॥ मी कोण कुठिल हा शोध करी पामरा। हा विवेक चित्ती कांहीं ठसूं द्या जरा। विषयास भुलुनि करशिल नाना तऱ्हा ॥ चा० प० ॥ विकळ पडुन हें क्षणांत जाईल बुदबुदवत काया ॥ देखत० ॥ १ ॥ कोणी नव्हे कुणाचें हा तूं विचार करी चित्तीं। अकस्मात यम घाला घालिल मग फसशिल अंतीं। चित्रगुप्त यमदूत सभेप्रति येउन तुज पापें। पुसतील जेव्हां काळरूपि ते मग होईल फें फें ॥ चा० ॥ मग स्मरेल तुज हें त्या वेळेस सांगणें। मग देवही न करी आठवितां धांवणें। मग नाहीं फळ वांचुनिया धिक धिक जिणें ॥ चा० प० ॥ काम क्रोधादिक षड्रिपु तुज वसले फसवाया ॥ देखत ॥ २ ॥ नाना योनी फिरता प्रभुला तुझी करुणा आली। तरावयाला यांतुनि तुजला नरकाया दिधली। याला

या । चाउंथ्या हा काय चोथा म्हणू नये कीं सखया । अरे कवि- । तूं जगतिच्या पहा वदनासीं ॥ क्षणभरि चा० ॥ ३ ॥

## लावणी १३२ वी.

**चाल** ॥ पतीं गेले हो गेले काठेवाडी ! गिरनार अबूच्या पहाडीं । !

दैवें ही गांठ बया बाईची,* मज पडली माची ॥ ध्रु० ॥ ◌विता इज संगें रंगा आली, नानाविध चाली । वाणी काय ◌रिक्षा झाली, गाणारी धाली । ऐशि मति नरांत विरळ रसाची, ◌ायकांत कैंची ! । दैवें ही गांठ० ॥ १ ॥ आहे घरोघरीं पुण्या- ◌भिं गाणें, परि खोटें नाणें । आलाप कंठामधिं घेति किराणे, हे ◌ाजिरवाणें । पुण्याविण कविता नच येयाची, शूद्रास कशाची । ◌वें ही गांठ० ॥ २ ॥ कवितारस मनांत झडकरि यावा, पुण्याचा ◌वा । दाता परि नीरस काय करावा, जन मार्मिक व्हावा । धन्या ◌त्कविता कविरायाची, रसिकता बयाची । दैवें ही गांठ बया ◌ाईची, म० ॥ ३ ॥

## लावणी १३३ वी.

**चाल** ॥ मनुजा सुखदायक हरीला गावे ॥ तत्पदीं लागावें ॥

कोण्याग सुभगाची मदनमंजरी । सांग सखे सुंदरी ॥ ध्रु० ॥ इच्या सौंदर्याची सीमा । झाली गडे रतिहुनि अति उत्तमा । पाहुनिया मुखचंद्रमा । सखे गडे अमा गमति पौर्णिमा । काय अधराची रक्तिमा । लाजवी नव कुंकुम विद्रुमा । अंगिं वसन जिच्या ◌जरी । कोण्याग सुभ० ॥ १ ॥ मज वाटली विद्युल्लटी । भालिग

---

* रामजोशाच्या लावण्यांस ज्या चाली आहेत त्या या बयाबाईपासून ◌ांना लाभल्या.

रुपाची उतरली भटी । उरिं कंचुकि घट तटतटी । टिळक ल… सुधारस घटी । पाहुनी कृशा तव कटी । हरीचा कृश कटिमद … पटी । अशि अनंत गुणगुर्जरी । कोण्याग सु० ॥ २ ॥ शिरिं … नवमल्लिका । झटति वर मधुकर रस कौतुका । नयनाननखं… रंजिका । मधुर कंठांत लाजवी पिका । अशि वर्णिल कोण सद्लिक… इतर कवि कविरायाहुनि फिका । मज वाटतसे निर्जरी । कोण… सुभगाची मदनमंजरी । सांग सखे सुंदरी ॥ ३ ॥

REFBK-0000453
REFBK-0000453

समाप्त.